म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा. वा
दा. क्र. : २१२१

वा. वा.
२१२१

BVBK-0402121

BVBK-0402121
2929 C110116

**परिचय**

सोनगांवचीं आठदहा चुणचुणीत, हुशार, चार इतर पोरांसारखींच भांडखोर पोरें. त्यांना सहली काढायचा मोठा नाद आहे. संक्रांतीची सुट्टी, म्हणून मग तीं कोसलाईच्या टेकडीवर सहल काढायचा विचार करतात.

दुसऱ्या दिवशीं शाळेला संक्रांतीची सुटी होती, हें ऐकल्याबरोबर आमचा गोपाळांचा मेळा हर्षानें नुसता गद्गदायमान झाला. उगीच नव्हे तो आनंद ! विनाकारण आनंद मानून घ्यायला आम्ही कांहीं आतां लहान राहिलों नव्हतों. मला चांगलें पंधरावें वर्ष लागलें होतें. चव्हाण गुरुजींनीं सांगितलें कीं, शिवाजी महाराजांनीं बाराव्या वर्षी प्रतिज्ञा घेतली होती म्हणे रायरेश्वरावर ! शंकराचार्य, ज्ञानेश्वरमहाराज आणि आपले ते—जाऊं द्या. आठवत नाहीं आतां. हो ! अन् त्यांत आम्हीं जेव्हां ऐकलें कीं, गेल्या युद्धांत १४।१४ वर्षांचीं जपानी पोरेंही लढलीं, तेव्हां बरीक आम्हीं ठरवून ठेवलें होतें, कीं आतां कधीं युद्ध झालें कीं आपण सगळ्यांनीं लढायला जायचें ! गणूभाईच्या घरीं येणारा 'नवाकाळ' रोज पाहात असूं आम्ही, जवळ कुठें युद्ध सुरू होतें आहे कीं काय तें बघण्याकरतां. पण अजून कांहीं बेटें तें जमून आलें नव्हतें.

आतां श्री. दादा दांडेकर म्हणजे माझे वडील व श्री. बंडोपंत दांडेकर म्हणजे बगड्याचे वडील कधीं कधीं आमच्या या उत्साहाचें हरण करायचे

म्हणा ! परवांचीच गोष्ट घ्या ना ! मी, बगड्या अन् शिन्या बगड्याच्या घरीं अभ्यास करीत करीत एकमेकांना सेनापति, सेनाखासखेल, दर्यासारंग म्हणून पदव्या देत होतों. तोंच बंडोपंत अळवाचा गड्डा उकरीत होते, ते बगड्याला ओरडले, " बग्या, रे बगड्या ! "

आमचा पदवीदान – समारंभ चालला असल्यामुळें आम्हांला कांहीं ऐकूं आलें नाहीं. आमची म्हणजे माझी भगिनी चि. कु. माई आली होती बगड्याच्या आईला डाळिंब्या निवडूं लागायला. ती पोरटी घरांतून ओरडली, " काका ! हे शेनापति अन् शेनाखासखोल—इश्श मेलं येतहि नाहीं काय तें ! तर चिडवताहेत हो एकमेकांना ! "

मग मात्र मी तिच्यावर डोळे काढीत तिला म्हणालों, " अॅ हॅ ! दिसतंय् का ? कीं डोळे ठेवून आल्यात घरीं ! आम्ही इतिहास वाचतोंय म्हटलं शिवाजीमहाराजांचा ! त्यांच्या सैन्याची व्यवस्था वाचतोंय् ! "

तोंच बंडोपंत चिखलानें भरलेले हात घेऊन घरांत आले. ते आल्या-बरोबर माइटलीला जोर चढला. अन् ती म्हणते काय, " नाहीं हो काका ! हा अप्पा किनई, बगड्याला म्हणतोय शेनापती; अन् तो त्याला म्हणतो आहे शेना–शेना काय बरं ? काय रे म्हणत होतास बगड्या ? सांग कीं रे ! "

आतां काय करावें या कारटीला ! बरें ! नुसते डोळे वटारण्यापलीकडे आम्ही कांहीं करूं शकत नव्हतों ! तोंच बंडोपंत म्हणाले, " अहो सेनापति ! नाकांतल्या गंगायमुना चांगल्या शिंकरतां येताहेत का ? चालले सेनापति व्हायला ! "

मी बाजू सावरण्याचा यत्न करीत म्हणालों, " पण काका, जपानांत–"

" एक अक्षरसुद्धां सांगूं नकोस मला ! जपानच्या गोष्टी कुणी बोला-व्यात ? तुमच्यांत आहे का तेवढी अक्कल अन् शहाणपणा ? आहे का तसलें शरीर ? काय लेको गोष्टी सांगतां जपानच्या ! अजून दोनशें वर्षे पाहिजेत

जपान अन् इंग्लंडची बरोबरी करायला ! तुम्ही लेको कुठें तरी मास्तर व्हायचेत, नाहीं तर कारकून !”

तात्पर्य, सगळे आमच्या निश्चयावर पाणी ओतण्याचा प्रयत्न करीत होते, पण आम्हीही तसलेच खमंग होतों ! आम्हींही ठरवून टाकलें होतें, कीं खूप हिंडायचें शिवाजीमहाराजांसारखें. शरीर काटक बनलें पाहिजे ना ! अन् कोणी कांहीं का म्हणे ना, लढाई सुरू झाल्याबरोबर लढाईला जायचें.

आणि म्हणून तर आम्हांला उद्यां संक्रांतीची सुट्टी आहे, असें कळतांक्षणीं नमूद करून ठेवण्याएवढा आनंद झाला. कारण वाटेल त्या वारीं सुट्टी येणें, आणि शनिवारीं सुट्टी येणें या दोन गोष्टींत किती फरक आहे, तें आमच्या अडाणी हेडमास्तरांसारख्या ब्रह्मराक्षसाच्या हातचा प्रसाद ज्यांना नियमितपणें रतिबासारखा खायला मिळत असे, त्या आम्हां भाग्यवानांशिवाय दुसऱ्या कोणाला मुळींच कळायचें नाहीं.

तर तात्पर्य काय कीं— मी आतां मोठा झालों असल्यामुळें मला इसापासारखें कोणत्याहि गोष्टीचें तात्पर्य काय तें सांगायची संवय झाली आहे. पण आमच्या घरच्यांना हें कळेल तेव्हां ना ! ते मला अगदीं नेहमीं— जाऊं द्या झालें ! मान सांगावा जनाला, अन् अपमान सांगावा मनाला !— तर तात्पर्य असें कीं, दुसऱ्या दिवशीं शनिवार होता, अन् त्या दिवशीं शाळेला सुट्टी होती !

शाळा सुटली, अन् आम्ही सगळे घरीं निघालों. आम्हीं म्हटलें कीं नांवें सांगितलीं पाहिजेत ! मी म्हणजे श्री. अप्पा दांडेकर, बगड्या दांडेकर, शिन्या शिंदे, सद्या फाटक, गोगटे, दत्तू फणसाळकर, कांतिलाल, चिमण्या, आपटे, बाळकू जोशी, ज्ञानबा नवले, कदम, शिंगरे, शिदू माळी हे सगळे. आमचा घोळका बाहेर पडला, तसे कदम अन् चिमण्या धांवत धांवत मजजवळ आले, आणि माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले— “ अप्पा ! उद्यां सुट्टी ! ”

" हो. अन् परवां रविवार ! तेरवां सोमवार म्हणजे बाजारामुळें अर्धा दिवस सुट्टी ! "

" मग ? " तेवढ्यांत शिन्या पुढे होता, तो थांबून म्हणाला, " कुठला बेत ठरतोय् उद्यांचा ? ठरवा कीं कुठला तरी ! "

" अप्पा, " फणसाळकर नखें कुरतडीत म्हणाला, " तुला माहीत आहे का ? आपल्या खडसगांवीं क्रिकेटचे सामने होणार आहेत ते ? "

" हो ऽऽ ! माहीत आहेत कीं ! माहीत नसायला काय झालें ! "

" नव्हे रे ! मी म्हणतों आपण टीम नेऊं या कीं तिथें ! "

" कसली ? क्रिकेटची ? "

" हो ना ! "

" अन् मग करडगांवीं त्याच दिवशीं हुतुतू, खो खो अन् कुस्त्यांचे सामने आहेत त्याला जाऊं या नाहीं म्हणालास ? दत्त्या ! धिक्कार असो तुला ! अजून साहेबाचा क्रिकेट आवडतो ना तुला ? "

" मग ? काय झालें त्यांत ? सगळेच तर खेळतात. किती छान खेळ असतो तो ! "

" तर तर ! " बगड्या पाठीमागून येऊन आमच्यांत मिसळून म्हणाला, " किती छान ! साहेबाचा ना तो ? साहेबाचें सगळेंच चांगलें असतें दत्तू ! साहेब चांगला, मेमसाहेब चांगली, त्याच्या बाता चांगल्या, त्याचा क्रिकेट चांगला, त्याचें कुलुंगें कुत्रें चांगलें, त्याचें तोंडांतल्या तोंडांत बोलणें चांगलें, त्याचें रोज दारू पिणें चांगलें, त्याचें बायकोबरोबर नाचणें चांगलें ! सगळेंच चांगलें ! मग काय काय करतोस उद्यांपासून ? म्हणे क्रिकेट चांगला ! काय चांगलें असतें रे त्यांत ? "

" मग उगाचच वाटतें सगळे खेळतात ? " दत्तू ओशाळून जाऊन म्हणाला.

" सगळे कां खेळतात हें नको विचारूंस मला ! काय चांगलें असतें

तेवढें सांग म्हणजे झालें. एक तर अकरा माणसांशिवाय कुणाला खेळायला परवानगी नाहीं त्यांत. एकानें तासनूतास वांकून उभें राह्यचें. एकानें चेण्डू फेकायचा. ते बहुतेक सगळे हुकतात. बॅटेजवळ जातील त्यांना बॅटवाल्यानें शत्रूसारखें ठोकून काढायचें. तो चेण्डू जिकडे जाईल, तिकडल्या गड्यानें वेड्यासारखें त्याच्यामागें धांवत सुटायचें. तेवढ्या वेळांत बॅटवाल्या जोडीनें दोन्ही स्टम्पस्च्यामध्यें पळत सुटायचें, अन् "पळा पळा कोण पुढें पळे तो," याची परीक्षा द्यायची ! बाकी सगळ्या गड्यांनीं दिवसा आकाशांतले तारे शोधीत किंवा कावळ्यांचीं पिसें मोजीत जांभया देत डोक्यावर हात ठेवून उभें राह्यचें. या सगळ्यांत काय चांगलें आहे तें मला सांग !"

"अन् त्यामुळें खेळाडू वृत्ति निर्माण होते, आपल्या पक्षाकरतां प्रत्येक जण झटतो— "

"मग ? आमच्या हुतुतूंत नाहीं वाटतें हें निर्माण होत ? क्रिकेटकरतां अवाच्या सवा खर्च होतो, हुतुतूला एक पैही खर्च लागत नाहीं !"

"पण हुतुतूंत नाहीं वाटतें अकरा गड्यांचा नियम ?"

"नव्हे महाराज ! बावीस गड्यांनीं एकदम खेळायचें असतें ! अन् राहिले तें मांडा कीं दुसरा डाव ! कोण नको म्हणतोय् तुम्हांला !"

"राहूं दे रे बगड्या !" मी शिष्टाई करीत म्हणालों, "दत्तू ! तूं आपला एकटा क्रिकेट खेळ हो ! आम्ही सगळे जाऊं उद्यां कोसलाईवर. बगड्या, शिन्या, चलायचें ना ?"

"आपल्याला काय, तूं ठरवशील तिकडे चलणार आम्ही सगळे ! तूं जाहीरच कर, कीं आमच्या शिदोऱ्या तयार !" शिन्या म्हणाला.

"मग बगड्या, कोसलाईवरच जाऊं या हं ! आपल्या चव्हाण गुरुजींनीं सांगून ठेवलंय ना आपल्याला 'मी बरोबर येईन' म्हणून ? त्यांना सांगायला कोण जाईल ?" मीं विचारलें.

"हा कदम सांगेल गुरुजींना. त्यांच्याजवळच राहतो तो. मग किती

जण चलणार ? " बगड्यानें पृच्छा केली.

जवळ जवळ सगळ्यांनीं हात वर केले. दत्तूनेंही केला. दत्तूला खिजवीत चिमण्या म्हणाला, " दत्तू ! हें रे काय ? "

" काय ! "

" वा ! तूं तर क्रिकेट खेळणार आहेस उद्यां ! महाराजकुमार ऑफ सोनगांव श्री. दत्तोपंत फणसाळकर सुप्रसिद्ध क्रिकेटपटू, हे उद्यां एकटे क्रिकेट खेळून दाखवणार आहेत, तेव्हां सगळ्यांनीं ग्राउंडवर जमावें हो ऽऽ !" चिमण्या आपल्या पिशवीचा धबधब आजाज करीत वात्रटासारखा ओरडला.

बगड्याला कांहीं बरें वाटलें नाहीं तें. तो चिमण्याच्या पाठीवर हात ठेवीत म्हणाला, " चिम्या, कोणाला चिडवावें कसें, कुणाला तोडावें कसें, घालूनपाडून बोलावें कसें, तें भारी चांगलें कळतें हो तुला ! दत्तू, तूं याच्याकडे लक्ष देऊं नकोस रे ! तूं आपला चल ! चलशील ना ! "

दत्तू अगदीं काकुळती आल्यासारखा झाला होता. तो बगड्याचें बोलणें ऐकून जरा सांवरला, अन् म्हणाला, " हो ! येणार आहें तर काय ! तुम्हांला सोडून मी असतों कां रे बगड्या कधीं ? जिथें जिथें तुम्ही गेलां होतात, तिथें तिथें मी आलों होतों कीं नाहीं ? मला क्रिकेटचें सुचलें, म्हणून मी म्हणालों; तुम्हांला कुणाला नाहीं आवडत, तर काय मी एकटा क्रिकेट खेळत बसणार आहें ? "

" नाहीं रे दत्तू ! तूं चल आपला. मी गम्मत केली हो तुझी मघांशीं ! " मी पश्चात्ताप पावून म्हणालों.

" पण सकाळीं सहाला निघायचें बरें का. सगळ्यांनीं मारुतीच्या देवळा-जवळ जमायचें. शिदोऱ्या घेऊन. " बगड्यानें पुकारा केला.

आम्ही सगळे घरोघर गेलों. मी घरीं पाटीदप्तर ठेवलें, अन् पाय धुवीत आईला म्हणालों, " आई, आम्हांला दशम्या करून दे उद्यां. आम्ही जाणार आहोंत सहलीकरितां. "

आई बसली होती फुलवाती करीत. ती म्हणाली, " सहलीला जाणार आहांत ? हा मेल्यांनो ! उद्यां संक्रांत नाहीं का पुजायची ? उद्यां कुठें जाणार ? कांहीं नका जाऊं उद्यां ? "

आतां काय करावें या आईला ? सगळ्यांचें आमचें ठरलें अन् ही आतां नको म्हणते ! म्हणे ना का ! आपण जाऊं दादांना विचारून. पण शिदोरी ? दादा काय स्वयंपाक करून शिदोरी बांधून देणार आहेत ? ऊंऽहूं ! आईलाच वळवलें पाहिजे कांहीं युगत करून. मग आईसमोर बसून कापूस उचलीत अन् फुलवात करण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालों, " नको तर राहूं दे. मी आपला घरींच अभ्यास करीत बसेन. हो, दळण आणायचें आहे ना गिरणींतून ? मग दे कीं ? "

माझ्या मुखकमलांतून बाहेर पडलेले ते शब्द ऐकून आई अगदीं आनंदित झाली ! कारण तिचा हा सत्पुत्र आपण होऊन कोणतें काम करील कीं विचारील ? रामा–शिवा–गोविंदा ! आई मजविषयीं कौतुक वाटवीत म्हणाली, " नको हो अप्पा ! दमून आला आहेस शाळेंतून अन् आतां कशाला दळणाला जातोयस उगीच ! आणील माई अन् आबा. कांहीं खातोस का तूं ? "

लागला सुरुंग किल्ल्याला ! आतां आणखी जरा ओढून धरलें पाहिजे. " कशाला माई अन् आबा ? तीं नाहीं वाटतें शाळेंतून आलीं ? मीच जातों. " मी कामसूपणाचा आव आणीत म्हणालों.

" जळ्ळी त्यांची शाळा ! चार फाडे शिकविले अन् ' ग म भ न ' सांगितलें कीं झाला अभ्यास आबाचा. अन् दोन गाणीं शिकिवलीं, अन् शिवायला शिकिवलें दोन टाके, कीं संपलें माईबाईचें शिकणें ! हें काय हें ? आम्हांला नाहीं वाटतें गाणीं अन् शिवायला शिकिवतां येत ? आपली त्या दिवशीं आली अन् म्हणे, ' मला तूप, साखर अन् रवाच दे ! शाळेंत शिरा करायला शिकिवणार आहेत म्हणे ! ' ती मेली धमाली मास्तरीण, तिला

खायचा असेल शिरा, म्हणून पोरींना शिरा शिकवियेय ! घरीं नाहीं वाटतें आम्हांला शिरा करतां येत ? ”

मी मुद्दामच जोरजोरानें हंसत म्हणालों, “ खाशी ! रोज शिकवीत जा म्हणावें शिरा करायला ! आम्हीही येत जाऊं खायला ! मजा आहे झालें ! अन् तुझ्याजवळ शिकायचें तें शाळेंत कुठें जाते मायडी शिरा शिकायला ? आई, तूं कर ना ग एकदां शिरा ! अन् ती केळफुलांची भाजी ! ओ हो ! अगदीं तुझ्यासारखी केळफुलांची भाजी जगांत अगदीं कुणाला येत नसेल ! ती भाजी कर कीं ग उद्यां ! ”

“ करीन हो उद्यां ! झालंय एक केळफूल काढायला. ”

“ पण मी उद्यां चव्हाण गुरुजींकडे जाऊं का ग अभ्यासाला ? किती छान शिकवितात ते ! अन् केव्हांही जा वाटेल तें विचारायला ! ”

“ जा हो ! भारी चांगला आहे बिचारा. तोच ना ? बगड्याच्या वरीं किल्ला करूं लागायला आला तो ? ”

“ हो तेच. ”

“ मग आपल्या घरीं फराळाला बोलाव कीं एकदां. ”

“ केव्हां बोलावूं ? पण जेवायलाच सांगूं या ना आई त्यांना ! एकटेच आहेत ते इथें. सांगूं या का ? ”

“ हो. मग उद्यांच कां सांगेनास ? ”

आतां आली सुरुंगाला वत्ती द्यायची वेळ. कांहीं तरी आठवल्यासारखें करून अन् वाईट वाटून घेत मी म्हणालों, “ ऊं हूं ! उद्यां नाहीं यायचे ते ! ”

“ कां रे ? ”

“ उद्यां ते जाणार आहेत सहलीबरोबर. बगड्या, शिन्या, चिमण्या सगळे जाणार आहेत त्यांच्याबरोबर. मी आपला घरींच करीत बसेन अभ्यास. गणितें करायचीं आहेत उद्यां.”

“ सगळे का जाणार आहेत ? इश्श ! मग तूं जा कीं ! तूं कां चुलकोंबड्यासारखा बसतोय्स घरीं ? ” इति आई.

“ मी जाऊं ? अन् मग दशम्या करून द्याव्या लागतील सकाळींच ? ”

“ मग देईन कीं ! त्यांत काय मोठेंसें ? उद्यां संक्रांतीचें लवकरच उठायचें आहे. अगोदर अंग धुऊन तुझ्या दशम्या देईन करून ! ”

बुरुज उडाला ! जें कुणी हें पुस्तक वाचतील, त्या माझ्या प्रिय मित्रांनीं हा उपाय करून पाहावा !

## अभ्यास

१. बगड्याचें क्रिकेटविषयींचें मत वाचून तुम्हांला काय वाटलें ?

२. तुम्हांला सहलीला जायचें आहे, आणि तुमच्या थोरल्या भावानें तुम्हांला नको म्हटलें. तुम्ही काय युक्ति करून त्याची परवानगी मिळवाल ?

# कोसलाईवर भटकंती

**परिचय**

ते सगळे मैतर त्यांचे शिक्षक चव्हाण गुरुजी, यांचेबरोबर कोसलाईच्या टेकडीवर जातात. तिथें इकडे तिकडे उनाडणें झाल्यावर मग गप्पा मारतांना चव्हाण गुरुजी त्या मुलांना आपण केलेल्या निरनिराळ्या सफरींविषयीं माहिती सांगतात. ती चटकदार माहिती ऐकून मुलांच्या मनांत किल्ले पहाण्याची इच्छा निर्माण होते.

त्या दिवशीं रात्रीं मी लवकर झोंपलों, अन् दादा उशीरां घरीं आले. यामुळें आमचा सहलगमनाचा बेत कांहीं दादांना कळला नाहीं. दुसऱ्या दिवशीं आई पहाटे उठली, अन् अंग धुऊन वेंकटेशस्तोत्र म्हणत घरांत आली. पहात्येय् तों चांगले साडेपांच होऊनहि मी झोंपलेला! तशी मला हांक मारीत ती म्हणाली,

" अप्पा ऽ ऽ! अरे अप्पा ऽ! बालकाचे सहस्र अपराध! अरे उठायचें नाहीं का तुला? सहलीला जायचंय् ना?"—" माता काय मानी तयाचा खेद —"

पटकन् मी जागा झालों. आणि लवकर न उठविल्याबद्दल आईला रागें भरत प्रातर्विधीला पळालों. कसेंतरी शौचमुखमार्जन उरकलें, अन् पाण्याचें तपेलें तापत होतें, त्याच्याशीं येऊन शेकत बसलों. पाणी अजून तापलें नव्हतें. आतां काय करावें या पाण्याला?

मग सुचली एक युक्ति. थंडीमुळें पाण्याचें आकुंचन झालें असल्यानें तें

लवकर तापत नव्हतें म्हणून पाण्याचें उष्णतामान वाढविलें तर परत त्याचें प्रसरण होऊन तें लवकर तापेल, हें अगदीं उघड होतें. म्हणून मग चूल फुंकायची लोखंडी फुंकणी चुलींत घालून चांगली तापविली, अन् ती वरच्या तपेल्यांत बुडवून पाण्याचें उष्णतामान वाढवूं लागलों, तों आई आली. तिनें माझा तो उद्योग पाहून मला प्रेमानें संबोधून म्हटलें,

"अप्प्या ! हा मेल्यांनो ! चुलीखालीं जाळ लागत नाहीं नीट, अन् फुंकण्यारे काय बुडवतो आहेस पाण्यांत ?"

मी माझा तो सायन्सचा प्रयोग आईला समजावून सांगूं लागलों, तों मला झिडकारीत आई म्हणाली, "जळ्ळं तुमचं सायन्स का फायन्स ! तपेल्यावर झांकण ठेवाऽचं, अन् चांगला दणकून जाळ लावाऽचा खालीं. आत्तां तापेल पाणी. तों हा आपला खेळच करीत बसलाय् !"

आतां हा आमचा आयांचा समाज कधीं सुधारणार ? कधीं त्या सायन्सचा उपयोग स्वयंपाकांतहि करूं लागणार ? तात्पर्य, यामुळेंच आमचा समाज—! जाऊं द्या. मी इतका विचार करीत आहें, तोंच दादा आले, अन् म्हणाले,

"काय अप्प्याजी ! कुठें जाणार आहे तुमची सहल ?" मला वाटतें, त्यांना आईनें सांगितलें असावें.

"कोसलाईवर." मी आईच्या उपदेशाप्रमाणें लांकडें सरसावीत म्हणालों.

"कोण कोण जाणार आहेत ? बगड्या, चिम्या, शिन्या, सगळे गण बरोबर असतीलच ! आणखी कोण चव्हाण मास्तर आहेत वाटतें बरोबर ? अरे अप्पा, मग असें कर, आबालाही घेऊन जा बरोबर. खाऊं दे त्याला जरा डोंगराची हवा. आहे मोठें माणूस बरोबर. उठला का तो ?"

आहे ? ही आणखी एक नवी आफत ! आतां या आबटल्याला घेऊन जायचें म्हणजे केवढें संकट आहे ? एक तर त्याच्यानें एवढें चढवायचें नाहीं;

बरें, दुसरें असें कीं आम्ही सारखेवारखे मैतर बरोबर असतां त्यांत या पोराचा कशाला घोळ? मला असा राग आला दादांचा! पण करतां काय? दादा पडले ना ते? कांहीं बोलतांही येत नाहीं.

शेवटीं एकदांचे साडेसहाला मी व चि. आबा असे दोघेजण घरांतून बाहेर पडलों. आबाच्या दशम्या मलाच घ्याव्या लागल्या. अन् नुसत्या दशम्याच का? छे हो! त्याचा विटीदांडू, धनुष्यबाण, गलोल हें सगळें. मी त्याला अजागळ म्हणून टोलवून देणार होतों. पण त्यानें दादांच्या समोर पसरलेंन् भोकाड! करतां काय? आम्ही मोठे भाऊ पडलों ना! शेवटीं दादांचा उपदेश, आब्याच्या दशम्या, विटीदांडू, धनुष्य, हा सगळा सरंजाम घेऊन श्रीमान् अप्पा दांडेकर एकदांचे रस्त्याला लागले.

पण मी म्हणतों, हीं नातीं बदलून नाहीं का टाकतां यायचीं? जेव्हां तेव्हां एकानेंच काय म्हणून थोरला भाऊ व्हायचें? आमच्या शाळेंत वर्ग-प्रमुखाच्या पाळ्या बदलतात, तशा याही पाळ्या बदलाव्यात कीं! आतां आमच्या घरीं माझ्यावरच मोठा भाऊ होण्याची सक्ती कां? एक वर्ष मी मोठा भाऊ. पुढल्या वर्षीं आबा, त्याच्या पुढल्या वर्षीं वडीलकीचा मान माईकडे. आई अन् दादाही वडील भावाचा अन् वहिणीचा पार्ट करीनात का एक एक वर्ष! आमची मुळींच हरकत असणार नाहीं.

म्हणतात, मी अगोदर जन्मलों! बरं, जन्मलों म्हणावें. पण हा काय माझा अपराध आहे? अन् मग आई अन् दादा तर माझ्याही अगोदर कितीतरी वर्षें जन्मले! पण गंमत अशी आहे कीं, हें बोलायचें कुणी? जेव्हां तेव्हां कांहींही खायची, नाहींतर गंमतीची गोष्ट आली, कीं नेमकें आमच्या भगिनीला माझें वडीलपण आठवतें. परवां ऊंस आणला, तर आपलें त्याचें वाढें माझ्या वांट्याला! कां तर म्हणे मी वडील भाऊ!

असा राग येतो! एखाद्या सभेचा अध्यक्ष जसा राजीनामा देतो, तसें वाटतें कीं, आमच्या आळीची सभा करावी, अन् त्यांत भाषण करून

आपल्या वडीलकीचा राजीनामा देऊन टाकावा! मीं तर ' देवाला विनवणी ' या नांवाची एक कविताही जुळवून ठेवली आहे. तिचा पहिला चरण नमुन्यादाखल म्हणून पुढें देतों.

**धांव देवराया येऊं दे करुणा ।**
**तुझा भक्त बुडे वडील्‌कींत ॥**

मी आतां कविताहि जुळवूं लागलों आहें, हें इथें नमूद करून ठेवतों.

असो. तर मी काय सांगत होतों? हो! आम्ही दोघे मारुतीच्या देवळाकडे निघालों. वाटेंत आबाजीराव असे खुलले होते! हजार प्रश्न विचारलेन् त्यानें मला.

" आपल्याला कोसलाईवर जायचें ना रे अप्पा?"

" हो."

" कोसलाई म्हणजे डोंगर आहे, नाहीं रे?"

" हो."

" डोंगर अन् पर्वत हे भाऊ आहेत, नाहीं रे?"

" होय, चुलत भाऊ."

" मग हिमालय पर्वताचा हा डोंगर चुलत भाऊ होय रे?"

" हो."

" अप्पा, देवानें डोंगर कशाचे केले रे?"

" मातीचे अन् दगडाचे."

" अन् मग एवढी माती अन् दगड कुठून आणली असेल देवानें? त्याला मजूर किती लागले असतील? अन् अप्पा, हा एवढा मोठा डोंगर करतांना देव कुठें बसला असेल रे?"

" तुझ्या टाळक्यावर! आतां गप्प बसतोस कीं, देऊं एक थोबाडींत?"

' थोबाडींत 'चें नांव ऐकल्यावर मात्र आबा मारुतीच्या देवळापर्यंत गप्प बसला. तिथें जाऊन पहातों, तों बहुधा सगळे गडी जमलेले. चव्हाणही

येण्यांतच होते. त्यांचा निरोप आला होता तुम्ही पुढें व्हा म्हणून. मला पाहतांक्षणीं कांतिलाल ओरडला, "अप्पा, वाजले किती?"

मी उशीर कां झाला, हें सगळें सविस्तृत आणि साग्रसंगीत ऐकविण्याच्या मागें होतों. पण मला बोलूं देतील तर ना! बहुधा सगळ्यांनीं माझ्या पाठीवर हात आपटून घेतले. कुणी कुणी आपटतांना हात मिटून घेतले होते. आतां माझ्या पाठीच्या हाडांच्या पिंजऱ्यावर आपटून त्यांचेच हात दुखायला लागले असतील, ती गोष्ट वेगळी.

अन् मग सुरू झालीं एकेकाचीं भाषणें.

"अप्पा अलीकडे पुढारी होऊं पहातोय." बगड्या.

"अन् पुढाऱ्यानें प्रत्येक पाळीला ठरलेल्या वेळेपेक्षां उशीर करायचा असतो." चिमण्या.

"जेवढा अधिक उशीर तेवढा मोठा पुढारी." शिन्या.

"अरे जारे! कुणी तरी घाणेरीच्या फुलांची माळ आणा! आपल्या पुढाऱ्यांकरितां पाहिजे." कांतिलाल.

"कवठांची चालेल का? मपल्या घराजवळच्या कवठीचीं लई कुजकीं कवठं पड्लींत!" रतन न्हावी.

"आन् मंग! भग्या परटाचं नाहींतर जुन्या कुंभाराचं घोडं श्री आना कुनी तरी, आपल्या सोनगांवच्या फुडाऱ्याकरतां" माधव शिंदे.

त्यांच्या या योजनांच्या माऱ्यानें माझा पार काला व्हायला आला. असें वाटलें, कीं कुठें तरी पळून जावें. पण इतक्यांत देवच धांवला म्हणानात माझ्या मदतीला! गळ्यांत एक पिशवी, कॅमेरा, अर्धी पॅन्ट, पायांत वहाणा, अशा वेशांत चव्हाण गुरुजी येऊन हजर झाले. ते आल्याबरोबर सगळे गप्प! चव्हाण हंसत हंसत म्हणाले,

"कां रे गप्प बसलांत सगळे? मला लाजलांत होय? छे छे! लाजाय्-बिजाय्चें कांहीं काम नाहीं. मी तुमचा गुरुजी शाळेंत. बाहेर तुमचा थोरला

भाऊ. अगदीं मनमोकळेपणें चालूं द्या तुमच्या गप्पा अन् थट्टा. काय अप्पा? आले का सगळेजण?"

"आले गुरुजी! तुमचीच वाट पाहात होतों."

"चलायचें तर मग."

चव्हाणांनीं त्यांच्या मनगटावरच्या घड्याळांत पाहिलें. साडेसहा वाजून दहा मिनिटें झालीं होतीं. चव्हाणांच्या मागोमाग आम्ही सगळे निघालों.

गांव संपला, अन् रान सुरू झालें. हिंवाळ्याचे दिवस. दंवानें सगळी जमीन भिजून गेली होती. प्रत्येक गवताच्या काडीवर पांच सात तरी दंवाचे थेंब पडले होते. दंव पाहून एकेकाला कल्पना स्फुरायला लागल्या. कदम म्हणाला, "जसे कांहीं कोंबड्यांना दाणे टाकले आहेत सगळीकडे."

"ए कोंबडीवाल्या! गप्प बैस कीं! कोंबडयांना असे रानभर दाणे टाकतात वाटतें? मला तर असें वाटतें, कीं देवानें आपलें धान्य वाळवण्याकरतां पसरलें आहे चंद्राच्या प्रकाशांत," बगड्याला कल्पना झाली.

"अहो धान्यवाले, धान्य असें गवताच्या काडयांवरून वाळत टाकतात वाटतें?" इति श्री. अप्पा दाण्डेकर. नाहीं तरी मला मघांशी बगडयानें चिडविल्यापासून त्याचा रागच आला होता. या पाळीला बरी संधि मिळाली.

"बरोबर आहे अप्पाचें." पोरें ओरडलीं, "बगडयाराव, तुमची कल्पना चूक!"

"माझी चूक तर चूक." बगडया म्हणाला, "पण अप्पाजीराव, तुम्ही सांगा कीं!"

"मी?" मी शेफारून जाऊन म्हणालों, "हो! त्यांत काय आहे? आंब्यावर जसा मोहोर येतो ना, तसा फुलोरा आला आहे गवताला."

"बरोबर!" बगडया खंदचटपणानें म्हणाला, "जमिनीलाही फुलोरा आला आहे. फुलोऱ्यानंतर जमिनीला ढेंकळांची कोंवळीं कोंवळीं फळें येणार, अन् मग श्रीमंत अप्पाजीराव दाण्डेकर त्या कोंवळ्या ढेंकळांची भाजी करून

खाणार !"

पोरांना काय? जो हरेल, त्याच्या नांवानें टाळ्या पिटायच्या. सगळीं ओरडलीं, "ओहो! सोनगांवचे ढेंकळेखाऊ पुढारी श्रीयुत अप्पा दाण्डेकर की जय !"

चव्हाण गुरुजी एकटेच पुढें चालले होते. ते म्हणाले,

"काय रे गड्यांनो! दंवावर कल्पना स्फुरताहेत का एकेकाला? मी तुम्हांला एक कल्पना सांगतों. फार गोड आहे ती. मैथिलीशरण गुप्त या नांवाचे एक फार मोठे कवि आहेत. ते म्हणतात,

**"है बिखेर देती वसुंधरा मोती सबके सोनेपर।**
**रवि बटोर लेता है उनको सदा सबेरा होनेपर ॥**

रात्रीं धरित्रीमाता चहूंकडे सगळे झोंपले आहेत अशा वेळीं मोती पसरवून देते. अन् सूर्य उगवला कीं, तो ते सगळे मोतीं गोळा करून घेऊन जातो ! किती गोड कल्पना आहे !"

आम्ही सगळे मैथिलीशरणांच्या या ओळींवर बेहद्द खूष झालों, अन् त्या खूष होण्यांत परस्परांचे टोमणेही विसरून गेलों.

थंडीची वेळ असल्यानें सगळेजण झपाट्यानें चाललों होतों. आबा तर आमच्यापुढें वारा प्यायल्यासारखा नुसता पळत होता. एकूण माझा त्याच्याविषयींचा अंदाज चुकला म्हणायचा ! पण रात्रीं कळेल बच्चंजीला. पाय दुखतात म्हणून रडून हा रात्रभर आईला जागवणार, असें भविष्य मी माझ्या मनाशीं अगदीं पक्कें करून टाकलें !

डोंगर चढायलाहि फारसा वेळ लागला नाहीं. वाटेंत लागल्या गुहा. त्या गुहांजवळ आम्ही सगळे भ्याल्याची हकीगत, शिन्यानें मारे नकला करकरून सगळ्यांना ऐकवली. सगळे पोट धरधरून हंसले. अगदीं चव्हाण गुरुजीसुद्धां. त्या दिवशीं मीं बरोबर आणलेली पांढरीची काठी, रामरक्षेचें पुस्तक, खिळे, माझ्या जानव्याची ब्रह्मगांठ, हें सगळें पुराण त्यानें अगदीं तिखट, मीठ,

मिरची, मसाला लावून सांगितलें. असा राग आला त्याचा ! पण करतां काय ? पहिलवान पडले ना हे ! जाऊं द्या झालें !

कोसलाईच्या देवळाजवळ पोहोंचल्यावर सगळ्यांनीं आपापल्याजवळचीं गांठोडीं उतरवून खालीं ठेवलीं. चव्हाण गुरुजी म्हणाले,

'ऐकलेंत काय रे, आठ झाले आहेत. दहा वाजेपर्यंत तुम्हा सगळ्यांना भटकायला परवानगी. पाहिजे तर माझ्याबरोबर या, पाहिजे तर एकेकटे जा. पण दहा वाजतां मात्र सगळ्यांनीं इथें जमायचें. मग तळ्यावर स्नानें उरकूं. नंतर अंगतपंगत. जेवणें झाल्यावर उन्हें जरा कमी होईपर्यंत गप्पा मारीत बसूं. संध्याकाळीं दोन तास खेळूं आणि मग घरीं परतूं."

आबा चव्हाणांना म्हणाला,

"अहो, अहो ! मी तुमच्याबरोबर चलतों ! हां ?"

चव्हाणांनीं त्याला बोरें शोधून देण्याचें कबूल करून आपल्याबरोबर घेतलें. बरी पीडा टळली ! मी, शिनू, दत्तू, असे तिघे बोरांच्या शोधांत बाहेर पडलों.

डोंगरावरून पायथ्याच्या गांवाची अन् शिवाराची शोभा अशी छान दिसत होती ! जणूं काय पिवळीं, काळीं, अन् हिरवीं ठिगळें जोडलेली गोधडीच पसरली आहे खालीं ! मी म्हणालों,

"शिनू, चल आपण जरा सृष्टीचें अवलोकन करूं."

पण माझ्या 'अवलोकना'ची थट्टा करीत शिन्यानें मला बोरांच्या शुद्धीकडे ओढलें. बोरांची शुद्धि म्हणजे बोरांचा शोध किंवा तपास. हा दत्याचा शब्द आहे. तो म्हणतो मारुतीनें सीताशुद्धि केली म्हणजे सीतेचा शोध केला. तशी बोरशुद्धि म्हणजे बोरांचा शोध.

दीड दोन तास खर्च करून आम्ही आंबटढाण बोरांनीं खिसे भरले. कांट्यांनीं कपडे फाडून घेतले, अन् कोसलाईकडे परतलों. रानफुलांचे गुच्छ, चिंचांचे आकडे, कवठें इत्यादि वस्तु घेऊन बहुधा सगळे परतले होते.

स्नानाच्या वेळीं खूप मजा आली. कान्तिलालला चव्हाणांनीं धरलें, अन् त्याच्या कमरेला पंचा बांधून त्याला लोटलें तळयांत. आबा म्हणायला लागला, ' मलाही तसें करा ! ' त्यालाही गुरुजींनीं धरून पोहवला. आम्ही सगळे जण खूप पोहलों.

अंगतपंगत बसली. शिन्याच्या घरचें कांद्याचें पिठलें, माझी वटाव्याची भाजी, रतन न्हाव्याचें वांग्याचें भरीत, चव्हाणांनीं आणलेली हरभऱ्याची उसळ, शिदू माळ्याची मुळ्याची भाजी हें सगळें एकत्र करून आम्ही जेवायला बसलों. श्लोक, अभंग, आर्या सुरू झाल्या. कुणी मध्येंच अडखळला, कीं सगळे ' पुंडलिकवरदे ' म्हणून ओरडायचे. चांगले तासभर जेवत होतों.

मग सगळे कोसलाईपुढच्या पिंपरीच्या झाडाखालीं बसलों. मध्यें होते चव्हाण गुरुजी. ते म्हणाले, " आतां कोण सांगतो रे गोष्टी ? "

गोष्टी सांगण्यांत तरी निदान माझा हात धरणारा कोणी नव्हता. मी गोष्ट सांगावी, असें शिन्यानें सुचविलें. मी थोडासा विनय दाखवून कोणती गोष्ट सांगावी याचा विचार करूं लागलों, तोंच वगड्या म्हणाला,

" गुरुजी, तुम्ही पुष्कळ किल्ले पाहिले आहेत. तेव्हां त्यांपैकीं कांहींची माहिती कां सांगत नाहीं ? " सगळे ' छान, छान ' म्हणून ओरडले. मग मलाही होकार द्यावा लागला.

मग चव्हाणांनीं एकेका सफरीची हकीकत सांगायला केली सुरुवात. पायीं केलेल्या सफरी, सायकलीवर केलेल्या, मोटारीनें केलेल्या, एकट्यानें केलेल्या आणि जोडीदार बरोबर घेऊन केलेल्या.

किती तरी किल्ले पाहिले होते त्यांनीं. अन् नुसत्या महाराष्ट्रांतलेच नव्हे तर चितोड, महेश्वर, धार संस्थानांतला मांडवगड, गाविलगड, रायचूर, असे किती तरी. अन् मग जेव्हां का एकेका किल्ल्याचें वर्णन सांगायला सुरुवात केली आहे त्यांनीं, आम्ही अगदीं थक्कच झालों ! एवढे मजबूत किल्ले आहेत महाराष्ट्रांत ? शेवटीं चव्हाण म्हणाले,

" काय सांगूं गड्यांनो ! एकेक किल्ला असा झोंकदार आहे ! अरे, देवगिरीच्या किल्ल्याची तर अशी कांहीं गंमत आहे, कीं एखादा चिखलाचा गोळा चहूंबाजूंनीं सुरीनें उभा कापावा, तशी अगदीं तासून काढलेली त्याची तटबंदी ! अन् आंत शिरायची वाट तर अशी अवघड आहे म्हणून सांगूं ! केवळ दोनच माणसें बाहेरच्या पांच हजारांना थोपवून धरूं शकतील, अशी व्यवस्था आहे त्या किल्ल्यांत.

" पण एवढें लांब कशाला जायला पाहिजे ! आपला लोणावळ्याजवळचा लोहगडच घ्या. एकूण दरवाजे तीन. पण हे तिन्ही एकावर एक असे बांधलेले ! वरून पाहतांना अशी कांहीं मजा दिसते !

" अन् या आपल्या छत्रपतींच्या किल्ल्यांवर उभें राहावें, घटकाभर आपलें मन आजच्या या पोशाखी जगांतून काढून तीनशें वर्षांपूर्वींच्या त्या मराठमोळ्या जगांत नेऊन उभें करावें. मग आपल्या या थोरल्या आईकरतां निकरानें तरवारी झुंजवणारे ते आपले मावळे उभे राहतात डोळ्यांपुढें. त्यांचें तें तेजस्वी जगणें आठवतें, त्यांचें तें तेजस्वी मरणें ध्यानीं येतें.

" मग असें वाटतें, कीं आपण जर त्या वेळीं असतों तर ! आपणही त्या मावळ्यांच्या गर्दींत मिसळून कोणत्या तरी लढाईंत झुंजतां झुंजतां या किल्ल्यांच्या शेजारीं, कुण्या वडा–पिंपळाखालीं जखमी होऊन पडलों असतों ! अचानक आपले छत्रपति घोडा दौडवीत येते, आपल्याला पाहून थांबते, पटकन् खालीं उडी घालते, आणि त्यांनीं आपला तो स्नेहानें ओथंबलेला हात आपल्या तोंडावरून फिरविला असता ! किती मजा झाली असती ! आपण त्याच क्षणीं उठून पुनः आपल्या राजाकरितां हें आपलें तुच्छ शरीर लढाईच्या खाईंत झोंकून दिलें असतें !

" हें सगळें दृश्य डोळ्यांपुढें उभें करण्याचें सामर्थ्य आहे या किल्ल्यांत ! गड्यांनो, तुम्हांला जुळलें, तर अवश्य पहा हे किल्ले ! निदान चार सहा मुख्य किल्ले तरी पहा ! "

ताडकन् बगड्या म्हणाला, " गुरुजी, ठरलें आमचें. तुम्ही आम्हांला किल्ले दाखवायचे, आणि आम्ही पहायचे ! "

## अभ्यास

१. घरांत तुम्ही थोरले भाऊ आहांत का ? तो थोरलेपणा तुम्हांला आवडतो का ? कारणें लिहा.
२. देवावर तुम्हांला कांहीं कल्पना सुचतात का ?
३. " बोराची शुद्धि, " असले नवे शब्द तुम्हांला घडवतां येतात काय ? करा बरें प्रयत्न !

# विंचूकांटा

---

**परिचय** नाना लटपटी करून तीं मुलें घरून लोहगड पाहण्याची परवानगी मिळवितात. पुण्यास येऊन 'लोकल ट्रेन'नें तीं मुलें चव्हाण गुरुजींच्या बरोबर मळवलीला उतरतात. तेथून मग वनशोभा पाहात पाहात तीं लोहगडावर जाऊन लोहगडाची पाहणी करतात.

अन् मग लोहगडची सफर करून येण्याकरितां आम्हांला काय काय करावें लागलें, तें सगळें कांहीं सांगत बसत नाहीं आतां. अहो, प्रत्येकाच्या घरची परवानगी मिळवतां मिळवतां नाकीं नऊ कीं दहा काय म्हणतात ते आले! या वडील मंडळींचा असा राग येतो एखादे वेळीं! यांना आपल्या गांवांत शिवाजी जन्मायला हवा, तानाजी हवा, सुभाषबाबू हवेत, गांधीजीही पुनः यांच्या गांवीं जन्मले, तर हे पेढे वांटतील.

पण ही सगळी मंडळी शेजारच्या घरीं जन्मली पाहिजे. यांचा बाळ्या अगदीं नाटकांतसुद्धां मारामारी, लढाई, असलें कांहीं करतां उपयोगाचा नाहीं! एकदां आम्ही 'भगतसिंगाची फांशी' हें नाटक जुळविलें. बगड्यानें केलें होतें भगतसिंगाचें काम. मुकट्यांचे अन् पैठण्यांचे पडदे लावून थेटर केलें. माई, काशी इत्यादि आमच्या भगिनींनीं आपापलीं पांचवारी ठिपक्यांचीं पातळें वुइंगा करण्याकरितां दिलीं. जाहिराती लावल्या, सगळें झालें, अन् नाटक सुरू झालें.

ही गर्दी जमली होती नाटक पहायला! दादा, आई, बण्डोपंत, काकू

सगळी मंडळी मोठ्या कौतुकानें नाटक ऐकत होतीं. बगड्या जेव्हां ह्याद घालून अन् काजळाच्या मिशा लावून भगतसिंग बनून आला, तेव्हां आईनें माईकडून स्टेजवर हारसुद्धां नेऊन घातला त्याच्या गळ्यांत! टाळ्यांचा नुसता कडकडाट झाला. बण्डोपंतांना तर ऐसा आनंद झाला म्हणून सांगूं! मला कांहीं आईचें हें काम मुळींच आवडलें नाहीं. नाटक जुळविलें मीं, म्हणजे तिच्या सख्ख्या पुत्रानें! अन् हार मात्र बगड्याच्या गळ्यांत! आपल्या पुत्राचें कौतुक करतील, मग त्या आया कसल्या! जाऊं द्या झालें!

तर हार घालतांना बण्डोपंतांनीं टाळ्या वाजविल्या. अन् शेवटीं त्याला खोटें खोटें फांशी द्यायची पाळी आली, तर काय आकाण्डताण्डव केलें त्यांनीं! भर नाटकांतून त्यांनीं बगड्याच्या थोबाडींत मारून त्याला ओढला! म्हणाले, “ गाढवा, फांशी जातोस? तंगडी मोडून टाकीन! ”

मी त्यांना समजावूं लागलों. म्हणालों, “ अहो काका, नाटकांत त्याला फांशी द्यावें असें जुळवलें आहे! न्यायाधीशाची म्हणजे माझी—कारण तें काम मीं केलें होतें—तशी आज्ञा आहे! ”

तर मला म्हणतात कसे बण्डोपंत, “ आग लाव तुझ्या नाटकाला. माझा पोर फांशी जातां उपयोगाचा नाहीं! ”

अशी आमची वडील मंडळी. जाऊं द्या झालें! त्यांपैकीं कुणीं जर हें माझें लिखाण वाचलें, तर परत आमची पाठ कांडली जायची!

एकूण आम्हांला रुसणें, फुगणें, न जेवणें, दळून आणणें, धाकट्या भावाला आपण होऊन खेळविणें, कुणीं न सांगतां पाणी भरून ठेवणें, शाळेंतला अभ्यास चोख करून ठेवणें, निमूटपणें घरांतला केर काढणें, आई दळायला बसली असतां तिला मदत करण्याचा आव आणणें, न चुकवितां संध्या करून नमस्कार घालणें, संध्याकाळीं वडील आरती करूं लागले, कीं चुकारपणा न करतां चांगली तालांत आणि मोठ्यानें झांज वाजविणें आणि शेवटीं चव्हाण गुरुजींचा वशिला लावणें इत्यादि सगळे

उपाय अंमलांत आणावे लागले.

अरेच्या ! मी मघांशीं म्हणालों होतों कीं, आमची उपाययोजना सांगत बसत नाहीं, आणि बहुधा सगळे उपाय ओळीनें सांगूनही टाकले ! त्या श्री. चिमणराव जोगांसारखाच मीही विसराळू बनत चाललों आहें एकूण !

अस्तु. तर आम्ही सगळे, म्हणजे चव्हाण गुरुजी, मी, वगड्या, शिन्या, सद्या, गोगट्या, दत्तू फणसाळकर, चिमण्या, कान्तिलाल, कदम, शिंगरे, शिदू माळी आणि आपटे इतकी मंडळी पुण्यास जाण्याकरितां मोटारींत बसलों, इथून प्रारंभ करतों. शिमग्याच्या पवित्र सणानिमित्त झाळेला पांच दिवस सुट्टी होती. त्या सुट्टींत आम्हीं हा बेत उरकून टाकला.

हो ! सगळेंच मुसळ कचऱ्यांत ! आमच्या दादांनीं या सफरीकरितां आमच्याबरोबर आबाला पाठविलें. त्यांना कशी काय स्फूर्ति झाली कोण जाणे ! बाकी या महिन्यांत आमच्या राशीचें भविष्य पुण्याच्या लवाट्यांनीं अगदीं वाईट लिहून पाठविलें आहे ! मी त्यांना कधीं तरी पत्र लिहून सांगणार आहे, कीं कमींत कमी माझ्या म्हणजे मेष राशीचें भविष्य तरी चांगलें लिहून पाठवींत जा ! त्या वाईट भविष्यामुळेंच आबाचें सगळें सामान मला माझ्या पिशवींत घ्यावें लागलें ! आमचे चव्हाण गुरुजीही आबावर खूष ! म्हणून मग कांहीं बोलायची सोय नाहीं.

मोटार सुरू झाली. माझ्याशिवाय इतर सगळे आनंदांत होते. आबा बरोबर असल्यानें मीच थोडासा दुःखी होतों. पण माझें तें दुःख तसेंच दडपून ठेवून मला आमच्या पुण्याच्या प्रवासाचें वर्णन केलें पाहिजे.

वारा वाहात होता. चिमण्या चिवचिव करीत होत्या. पेट्रोलची घाण येत होती. कावळे कावकाव करीत होते. ऊन पडलें होतें. मोटारमुळें धूळ उडत होती. ड्रायव्हर सारखा पोंगा वाजवीत होता. झाडांचीं पानें—

मला वाटतें, कीं इतकें पुरे. तर पुण्याला स्टँडवर उतरलों. रमेशला अगोदर पत्र पाठविलें असल्यानें तो स्टँडवर हजर होता. एकटे चव्हाण

गुरुजी त्यांच्या भावाकडे मुक्कामाला जायचे होते. बाकी आम्ही सगळ्यांनीं आजोबांकडे जाऊन तळ दिला. लोहगडविषयींच्या कल्पना करीत आम्ही रात्रीं अंथरुणावर पडलों.

"लोहगड म्हणजे लोखंडाचा गड. ह्या शब्दाचा तसाच अर्थ होतो. लोह म्हणजे लोखंड, असें आमच्या भाषा-परिचय पुस्तकांत लिहिलें आहे." गोगटे पाघळला.

"अहो विद्वान ! सबंध गड नसेल कांहीं लोखंडाचा ! त्याचे तट असतील लोखंडाचे म्हणून त्याला म्हणायचें लोहगड." चिमण्या गुरगुरला.

"मुळींच नव्हे ! त्याच्या तटांच्या पायांत लोखंड गरम करून ओतलें असेल." शिन्यानें आपली विद्वत्ता प्रकट केली.

"अहो अरण्यपंडित, मग तुमच्या व्याख्यांप्रमाणें सिंहगडच्या भोंवतीं सिंह धुमाकूळ घालीत असले पाहिजेत ! लोहगड नांव आहे म्हणून असा कांहीं तरी अर्थ करीत बसायचें नसतें ! लोखंडासारखा मजबूत म्हणून लोहगड." बगड्यानें आपलें मत सांगितलें.

आतां मला माझें कांहींतरी मत सांगणें भागच होतें. मी म्हणालों, "तसें नव्हे रे ! या लोहगडाच्या आसपास फार पूर्वकाळीं लोखंडाच्या खाणी होत्या. अशोकानें जो पोलादी स्तंभ ओतवला, तो याच खाणींतल्या पोलादाचा. म्हणून या किल्ल्याला म्हणायचें लोहगड."

माझें हें मत खोडून टाकण्यासारखी माहिती कुणाजवळच नसल्यानें सगळे गप्प बसले. रात्रीं अंतोबा म्हणाले, कीं आम्हाला लोकलनें जावें लागेल. या 'लोकल' शब्दाचा अर्थ कांहीं सकाळपर्यंत आम्हांस उमगला नाहीं.

पहाटे साडेपांचला चव्हाण गुरुजी येऊन हजर झाले. आमचे प्रातर्विधि उरकेपर्यंत आतोबांशीं त्यांनीं गप्पा मारल्या. आत्याबाईनें बटाट्याची भाजी आणि पुऱ्या करून दिल्या होत्या, तें ओझें पहिलवान शिनू, बगड्या आणि शिदू माळी या तिघांनीं घेतलें. सहा वाजतां आम्ही घरांतून बाहेर पडलों.

आम्हांला शिवाजीनगर स्टेशनावर जायचें होतें. घरून निघतांना आबा गुरुजींचा हात धरून निघाला होता. पण पुण्याचे डांबरी रस्ते पाहून त्याला मोटार चालवायची हुक्की आली. त्यानें गुरुजींच्या हातून आपला हात सोडवून घेतला आणि दोन्ही हातांनी छातीसमोर नसलेलें चाक धरून तोंडानें ' पॉंक – पॉंक ' करीत त्याची मोटार धूम निघाली.

सगळेजण मोठमोठ्यानें हंसूं लागले ! मी त्याच्यावर असा संतापलों ! आतां त्याला दोन-चार कौतुकाच्या शब्दांचा अहेर करणार, तोंच– त्याला असें कळून आलें कीं, आपली मोटार निघडली !

पटकन् तो थांबला. ड्रायव्हरच्या जागेवरून उतरल्यासारखें करून तो तोंड फिरवून उभा राहिला; आणि इंजिनचें झांकण उघडण्याचा अभिनय करून तो खालीं वांकून दुरुस्ती करायला लागला !

" काय झालें हो मोटारड्रायव्हर ? " चव्हाणांनीं हंसत हंसत विचारलें.

" मोटारगाडीचें विंजिन बिघडलें आहे. खऱ्या मोटारीचें विंजिन बिघडल्यावर ड्रायव्हर असेंच करतो. "

मोठ्या गंभीरपणानें हें उत्तर देऊन आबा परत मोटार-दुरुस्तीला लागला. सगळ्या जणांत हंशाचा नुसता कल्लोळ उडाला. मला कार्ट्याचा असा राग आला, कीं एक रट्टा घालावा गधड्याचा पाठींत ! पण—

तोंच एक टांगेवाला समोरून आला, तो आबाला ' बाजूला हो ' म्हणून सांगायला लागला. तट्कन् आबा उभा राहिला, अन् म्हणाला,

" बाजूला कसा होऊं ! माझी मोटार बिघडली आहे, दिसत नाहीं का तुला ? खरी मोटार बिघडली कीं आमच्या गांवचे गाडीवाले बाजूनें जात असतात. तूं बाजूनें जा ! "

फिदिफिदी हंसत आणि " बालहट्ट, स्त्रीहट्ट, राजहट्ट " असें कांहीं पुटपुटत टांगेवाला मुकाट्यानें टांगा बाजूनें घेऊन चालूं लागला. मग मात्र उशीर होतोसा बघून चव्हाण आबाजवळ जाऊन खालीं वांकून पहात

म्हणाले, " अरे बाबा, झाली दुरुस्त मोटार ! "

" असें का ? तर मग चला. " असें म्हणून आबानें हॅण्डल फिरविलें, आणि त्याची मोटार सुरू झाली.

टेशणवर गेलों. चव्हाणांनीं तिकिटें काढली. खूप गर्दी होती टेशणवर. गाडी आली, अन् कसेबसे आम्ही माणसांच्या पायाखालून शिरून डब्यांत घुसलों. या गाडीनें खूप " लोक " प्रवास करतात, म्हणून हिला " लोकल " म्हणतात, असा मीं ' लोकल ' शब्दाचा लक्षांत आलेला अर्थ सांगितला. लोकांच्या गर्दीचा अनुभव सगळ्यांनाच असल्यामुळें कोणी माझ्या त्या अर्थाविरुद्ध कांहीं बोलला नाहीं.

तीन-चार टेशणें गेल्यावर मात्र गर्दी कमी झाली. आम्ही कडेच्या बांकांवर कुणीं बसावें, याबद्दल वाद करीत होतों, तों आमचें उतरायचें मळवली टेशण आलेंसुद्धां. पटापट उड्या मारून सगळे खालीं उतरलों.

चव्हाण म्हणाले, " बरें का गड्यांनो, साडेआठ वाजायला आले आहेत. आपण जर सपाट्यानें निघालों, तर साडेदहाला किल्ल्यावर पोहोंचूं. तो पहा किल्ला. इथून कांहीं फारसा लांब नाहीं. मग चलायचें ना ? "

सगळे भराभर गुरुजींच्या मागें निघाले. आमच्यांत साहजिकच दोन टोळकीं झालीं. एका टोळक्याचा पुढारी झाला बगड्या, अन् दुसऱ्याचें पुढारीपण ओघानेंच माझ्याकडे आलें. वाटेंत रविवर्म्याचा शिळाप्रेस, भाजें-गांव या नांवाचे आपापल्या बुद्धीप्रमाणें अर्थ सांगत आम्ही चव्हाणांच्या मागोमाग पळत होतों. मधून मधून ते कांहींतरी माहिती सांगायचे. डावीकडे बोट दाखवून ते म्हणाले,

" तीं पाहिलींत का रे भाजेंगांवचीं लेणीं ? तीं डोंगराला लहान लहान भोंकें दिसतात ना, तीं. आपण संध्याकाळीं परततांना पाहूं. "

लेणें या शब्दावर आमचें कडाक्याचें भांडण झालें. माझ्या माहितीप्रमाणें लेणें म्हणजे दागिना. आणि बगड्या म्हणूं लागला कीं, लेणें म्हणजे गुहा.

-हाण आणि त्यांचें शेपूट आबा असे दोघे पुढें गेले होते. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत आम्ही शेवटीं भाषा विषयांत मिळालेल्या मार्कां-पर्यंत येऊन धडकलों, तोंच आमच्या त्या संवादाचा आवाज हवेंत तरंगत तरंगत चव्हाणांच्या कानीं जाऊन पोहोंचला. ते म्हणाले, " अरे, भांडतां कां? दोघेही बरोबर आणि दोघेही चूक."

" कसें काय ?" आम्ही दोघेही एकदम म्हणालों.

" लेणें म्हणजे नुसता दागिना नव्हे आणि नुसती गुहाही नव्हे. तर पर्वतावर खोदलेलें त्याच्या अंगावरच्या दागिन्याप्रमाणें शोभणारें सुंदर शिल्प म्हणजे लेणें."

असें असल्यामुळें आमचें युद्ध संपून तह झाला. थोड्याच वेळांत चढाला प्रारंभ झाला. चहूंकडे करवंदीच्या जाळ्यांची नुसती दाटी झाली होती. करवंदें जरी अजून कच्चीं होतीं, तरी कांहीं तीं फारशीं वाईट लागत नव्हतीं. यामुळें आम्ही सगळेजण तुराणी पेंढारासारखे करवंदीच्या जाळ्यांवर नुसते तुटून पडलों. गुरुजी म्हणाले, " अरे, आपल्याला उशीर होईल. करवंदें तोडायचीं असलीं तर येतांना तोडा."

पण गुरुजींचा हा उपदेश अनेकांना ऐकायलाच आला नाहीं. माझा कोटाचा खिसा करवंदांनीं गच्च भरल्यावर मी मात्र सगळ्यांना म्हणालों, " अरे, गुरुजी काय सांगताहेत ? चलतां कीं नाहीं सगळे ? त्यांची आज्ञा ऐकत नाहीं का ?"

चिमण्या करवंदांची शेवटची मूठ खिशांत कोंबीत मला म्हणाला, " अहो आज्ञाधारक ! एवढा वेळ आपण काय करीत होतां ? तुमचा खिसा दाखवा बघूं !"

मला चिमण्याचा असा राग आला ! पण माझा खिसा करवंदांनीं भरला असल्यामुळें कांहीं बोलायची सोय नव्हती ! तात्पर्य असें कीं, आमच्या समाजांत दुसऱ्याचा पाणउतारा करायची ही अशी वाईट संवय जडलेली

आहे. अस्तु !

भोंवतालची सृष्टिशोभा फार सुंदर होती, पण चढ लागल्यामुळें ती आम्हांला फारशी पाहतां आली नाहीं. कारण त्या सृष्टिशोभेपेक्षां आमचे तांबडेलाल झालेले आणि घामाचे ओहोळ वाहूं लागलेले चेहरेच अधिक पाहणीय झाले होते. त्यांत कांत्याची तर नुसती रेवडी उडायला आली होती ! दर दोन मिनिटांनीं तो खालीं बसायचा. शेवटीं कसेंबसें त्याच्याजवळचें ओझें आमच्याजवळ घेऊन आम्ही पहिला चढ तर चढून गेलों.

वर गेल्यावर वरचा गार वारा लागल्यानें मात्र खूप हुशारी आली. मग एकेकाला कंठ फुटला. अंवतीभोंवतीची सृष्टिशोभा आम्हांला सुंदर भासूं लागली.

" वा वा ! खूप मजा आहे बरें का !" चिमण्या बोलला.

" गुरुजी ! खरोखरच हो इथें मौज आहे !" दत्तू फणसाळकर म्हणाला.

" आपल्याला नव्हती बुवा एवढी कल्पना !" आपटे उद्गारला.

" झाडें तरी किती प्रकारचीं आहेत ?" कांतिलालनें मत सांगितलें.

" मग गुरुजी काय उगीच सांगत होते ?" मी शहाजोगपणा केला.

" गुरुजी ! हा डाव्या हातचा किल्ला मला वाटतें विसापूर असावा, नाहीं ?" बगड्यानें प्रश्न केला. कारण आम्ही मळवलीच्या स्टेशनवर पाट्या वाचल्या होत्या.

गुरुजींनीं सांगितलें, कीं विसापूरवर तटांपलीकडे दुसरें कांहींही नाहीं, आणि आतां कोणी व्यवस्था ठेवीत नसल्यानें कांहीं दिवसांनीं ते तटही उरणार नाहींत. आम्ही त्या व्यवस्था न ठेवणाऱ्या कुणाला तरी ठेवतां येतील तितकीं नांवें ठेवीत उजव्या हाताला वळलों. आतां लोहगड आमच्या उजव्या हाताकडे अगदीं जवळ होता.

वसन्ताचें आगमन झालें असल्यामुळें सगळी सृष्टि कशी अगदीं—पण जाऊं द्या. पुढल्या पाळीला आमच्या पुस्तकांतील वसन्तागमनाचा धडा

पाठ करून मग हें वर्णन करीन. वास बरीक असा छान सुटला होता ! सगळेजण मारे जोरजोरानें श्वास घेत होते. आबाजीराव तर काय अगदीं खुलले होते.

गुरुजींनीं सांगितलें, कीं लोहगड याच नांवाचें गांव डाव्या हाताला टाकून आम्ही गडाकडे जात आहोंत. दहावीस मिनिटांत दुतर्फा आंब्याच्या झाडाच्या ऐन गडाची वाट चढूं लागलों. प्रथम आम्ही कैऱ्यांना लोभावलों खरें, पण मग रस्त्यावर चिक्कार कैऱ्या पडलेल्या पाहून आम्ही निर्लोभी बनून भराभर वर चढूं लागलों.

पहातां पहातां गडाचे दरवाजे दिसूं लागले. शिन्या ओरडला, " ओऽहो ! हे तर अगदीं गुरुजींनीं सांगितलें तसे एकाच्या डोक्यावर एक आहेत ! "

" शनवारवाड्याच्या दरवाजासारखे आहेत हे. " चिमण्या म्हणाला.

दरवाजे आवाक्यांत आल्यावर मग आम्हांला विशेष जोर आला. भराभर माकडांसारख्या उड्या मारीत आम्ही पहिला दरवाजा तर गांठला. दरवाजा कशाचा ! दरवाजेश्वरच तो ! त्याची मजबूत बांधणी, मोठमोठाले दगड, त्याची कमान, या सगळ्यांचें भरपूर कौतुक करीत आम्ही हवा खात दरवाजांत बसलों. या दरवाजाचें नांव ' गणेश दरवाजा ' असल्याची माहिती गुरुजींनीं पुरविली.

दोन मिनिटांनीं आम्ही वर निघालों. आमच्या डाव्या हाताला तट होता, अन् त्या तटाला भोकें होतीं. शिनूच्या मताप्रमाणें तीं भोकें खालून वर वारा येण्याकरितां असावींत. सृष्टिनिरीक्षणाकडे त्यांचा उपयोग होत असावा, असें माझें मत पडलें. शत्रूवर नजर ठेवण्याकरतां तीं भोकें पाडलीं असावींत, असें बगड्या म्हणाला. पण गुरुजींनीं सांगितलें, कीं तीं भोकें बंदुकीचा मारा करण्यासाठीं आहेत.

पांच मिनिटें वर चढल्यावर ' हनुमान दरवाजा ' आला. त्याचेंही कौतुक करीत आम्ही पुढें चाललों, तों वरचा ' नाना दरवाजा ' येऊन ठेपला,

म्हणजे आम्ही त्यांत जाऊन ठेपलों. त्या दरवाजाला असलेलें लोखंडी दार शिवाजी महाराजांपासूनचें आहे, अशी माहिती गोगटेनें पुरविली.

आंत जातांक्षणीं इमारती लागल्या दिसायला! लगेच आम्ही बुरुजावर चढून एकंदर शोभा अवलोकूं लागलों. खालचे दरवाजे आणि तट एखाद्या नागमोडीसारखे छानदार दिसत होते. लोहगड गांवही अगदीं छोटेसें दिसत होतें. भोंवतालची झाडी–पण जाऊं द्या. तें वर्णन अनेक वेळां येणार असल्यानें थोडें थोडें केलेलें बरें.

आम्हां सगळ्यांना एका जागीं उभें करून चव्हाण गुरुजी म्हणाले,

" ते पहा गड्यांनो! पश्चिमेकडे तो ' तुंग ' आणि पलीकडे तो ' तिकोना ' किल्ला. तो दक्षिणेकडे ' विसापूर '. हा ' लोहगड ' नाना फडणविसांचा फार आवडता किल्ला. ते अनेक वेळां यावर येऊन राहात. या किल्ल्या-करितां अनेक युद्धें झालीं. घाटाच्या ऐन माथ्यावर असल्यानें या किल्ल्याचें त्या वेळीं खूप महत्त्व होतें. ज्याला त्याला वाटायचें, कीं हा किल्ला आपल्या ताब्यांत हवा.

" मुंबईला गोरा साहेब राहायला अन् व्यापार करायला लागल्यापासून तर या किल्ल्याचें महत्त्व खूपच वाढलें. दोन चार वेळां तरी मराठ्यांकडून इंग्रजांकडे अन् इंग्रजांकडून परत मराठ्यांकडे अशा या किल्ल्याच्या किल्ल्या वाऱ्या करीत होत्या.

" चला आतां. तें पहा जवळच, औरंगजेबाच्या मुलीचें थडगें. "

औरंगजेबाच्या मुलीचें थडगें म्हटल्याबरोबर आम्ही सगळे उधळतच थडग्याकडे निघालों, पण एक भिकार घुमटी अन् आंत दोन कबरी, या पलीकडे तिथें कांहीं नसलेलें पाहून आम्ही नाकें मुरडीतच बाहेर पडलों.

" आतां सगळ्यांनीं माझ्याबरोबर चलायचें बरें का?" चव्हाणांनीं बजावलें. आम्ही त्यांना निरनिराळे प्रश्न करीत त्यांच्या मागोमाग पूर्वेकडे डाव्या हातानें निघालों, ते एका थंडगार पाण्याच्या टाक्याजवळ जाऊन

उभे राहिलों.

अहाहा ! तहान तर अशी लागली होती ! पाणीही असें चविष्ट होतें, कीं तांब्या तांब्या पाणी बसवलें एकेकानें पोटांत. आणखीही आठदहा तळीं होतीं. पण त्या सगळ्यांचें पाणी भिकार होतें. शेजारीं एक-दोन देवळेंही होतीं. पण आतां त्या देवांची प्रतिष्ठा कुणाला ? म्हणून मग मारुती आणि शंकर हे देव आपापल्या जागेवरून उठून येऊन एकमेकांशेजारीं गप्पा मारीत बसले होते.

गुरुजी म्हणाले, कीं दक्षिणेच्या अंगाला एक पाणी नसलेलें तळें आणि एक पीर आहे. पिराचें आणि आमचें भांडण नसल्यामुळें आम्ही जातां जातां त्या पिरालाही भेट दिली. तसेंच उत्तरेकडे एक खूप मोठी कोरडी विहीर आहे, तीहि पाहून गडाच्या पूर्व टोंकावर आलों.

आतां मात्र खरी मजा होती दुतर्फा तटानें बांधून काढलेली अर्धा मैल लांबीची एक चिंचोळी नाली लांववर पसरली होती, अन् तिच्या टोंकावर एक बुरूज होता. उतरायचा रस्ता अवघड होता. पण आम्ही मर्द मराठ्यांचे बच्चे असल्यामुळें घाबरून गेल्याचें मुळींच न दाखवितां कसे तरी कांपत खालीं उतरलों.

खालीं उतरल्यावर उजव्या तटावरून जातांना अशी कांहीं सुंदर वनशोभा दिसली म्हणून सांगूं ! काय वाटेल तें झालें, तरी या वनशोभेचें वर्णन मला केलेंच पाहिजे. डोंगराच्या पोटाशीं जवळ जवळ मैलभर लांबीचा पट्टा झाडांनीं नुसता भरून गेला होता. अगदीं एवढीशीही जागा मोकळी नाहीं. अन् रंग तरी किती सांगूं ! फिकट हिरवा, नुसता हिरवा, गडद हिरवा, दाट हिरवा, काळसर हिरवा, तांबूस, शेंदरी या सगळ्या रंगांचें ऑइल-पेन्टचे डबे जणुं काय कुणी वरून खालीं सांडून दिले होते !

आम्ही टोंकावर जाऊन पोहोंचलों. तिथें गेल्यावर चव्हाण गुरुजी तेथून दिसणाऱ्या वलवणच्या तळ्याकडे पहात उभे राहिले, आणि मग म्हणाले,

" बरें का मित्रांनो ! या टोंकाचें नांव विंचूकांटा. खालीं एकदां नजर टाका. हें आमचें रणक्षेत्र. इथें आमचे पूर्वज अनेक लढाया लढले. अनेकदां प्राण पणाला लावून त्यांनीं शत्रूशीं याच ठिकाणीं निकराची झुंज केली. ही खालची सगळी जमीन त्यांच्या रक्तानें अनेकदां ओली झाली आहे. या खालीं दिसणाऱ्या ओढ्यांचें पाणी अनेकदां त्यांच्या रक्तानें लाल झालें आहे. या इथून दिसणाऱ्या आकाशांत अनेकदां त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं धुळीचे लोट उसळले आहेत. या खालीं असलेल्या खडकांवर कदाचित् अजूनहि त्यांच्या टापांच्या खुणा उमटल्या असतील !

" पण आतां ? आतां काप गेलें, भोकें राहिलीं ! शौर्य मावळलें; उदासवाणें, केविलवाणें जगणें शिल्लक राहिलें आहे. पराक्रम गेला, आणि नुसता मुजोरपणा बाकी राहिला आहे ! आणि राहिल्या आहेत त्या काळच्या अंधुक अंधुक आठवणी ! "

किती तरी वेळ गुरुजी बोलत होते, आणि आम्ही आठ-दहा बारकीं पोरें ऐकत होतों !

## अभ्यास

१. तुम्हीं एखादें नाटक केलें आहे काय ? केलें असेल तर त्यांतील गंमती लिहा.

२. आबाच्या मोटारीसारख्या तुमच्या धाकट्या भावानें केलेल्या एखाद्या गंमतीचें वर्णन करा.

३. तुम्ही एखाद्या टेकडीवर चढला असाल, तर टेकडीखालचें दृश्य पाहून तुम्हांला काय वाटलें ?

# फणसाचे गरे

परिचय

लोहगड पाहून सुरक्षित परत आल्यामुळें या मुलांना रायगड पाहायची परवानगी काढतांना कांहीं फारशी अडचण पडत नाहीं. उन्हाळ्यांत मुलांना इकडे धाडून द्यावें, म्हणजे अनायासें त्यांना रायगड पाहतां येईल, असें महाडहून अप्पाच्या मामांचें पत्र आल्यानें तर आणखीच मजा होते. आपापली तयारी करून मुलें चव्हाणांबरोबर महाडला रवाना होतात.

कांहीं म्हणा तुम्ही. पण जेव्हां आम्हीं चव्हाण गुरुजींबरोबर रायगड पाहायचें ठरविलें, तेव्हां बरीक आम्हांला आमच्या लोहगडावरील स्वारी-इतका त्रास कांहीं झाला नाहीं.

कारण असें कीं, आपलीं हीं दिवटीं बाळें जर चव्हाणांच्याबरोबर गेलीं, तर बिन हातपाय मोडतां आणि बिन तुटतांफुटतां सुरक्षितपणें परत येऊं शकतात, अशी आमच्या वडील मंडळींची खात्री पटली होती.

त्यानंतर बगड्या आजारी पडला, तेव्हां चव्हाणांनीं त्याच्याकरितां जी धांवाधांव केली, तिच्यामुळें बण्डोपंत चव्हाणांच्यावर फार खूष झाले. आजारी म्हणजे तसें कांहीं फारसें मोठें दुखणें झालें नव्हतें. शेवग्याच्या शेंगा काढायला बगडोपंत झाडावर चढले. खालीं उभा होतों मी.

तरी मी त्याला सांगत होतों कीं, शेवग्याच्या बारक्या फांदीवर पाय देऊं नये, असें एका पुस्तकांत लिहिलें आहे. कारण तें झाड ठिसूळ असतें. पण

माझें ऐकेल, तर मग तो बगड्या कसला !

रावांनीं दिला एका बारीक फांदीवर पाय. अन् मग राव फांदीला घेऊन आले खालीं ! मी पटकन् बाजूला झालों म्हणून बरें झालें. नाहीं तर त्याच्या धक्क्यानें माझी पांढरी स्वच्छ खादीची टोपी धुळींत पडून मळली नसती का ?

बगड्याच्या हाताला अन् मांडीला केवढें थोरलें खरचटलें ! खूप रक्त आलें. मी त्याच्यावर रागावून त्याला म्हणालों,

" बगड्या, तूं अगदींच हा आहेस कीं रे ! पडायचेंच होतें तुला, तर दहावीस शेंगा काढून मग कां नाहीं पडलास ? अन् मला अगोदर सांगितलें असतेंस, तर मीं ही खालची जागा नसती का साफ केली ? आतां हें एवढें लागलें अन् रक्त आलें, त्यामुळें किती दिवसांचें अन्न फुकट गेलें ?

" मनुष्य जें अन्न खातो, तें पोटाच्या इंजिनमध्यें जाऊन चोवीस दिवसांनीं त्याचें रक्त होतें. तें सुद्धां—अरे गाढवा ! माती काय घालतो आहेस त्याच्यावर ? थांब, मी प्रथमोपचाराचें पुस्तक घेऊन येऊन जखम झाल्यावर काय करावें तें वाचतों, अन् मग त्याप्रमाणें आपण दोघे उपाय करूं या ! हां बगड्या ! मिस्टर, डॉक्टरकडे तर जायचें नाहीं या पाळीला ! आपण शाळेंत प्रथमोपचार शिकलों, त्याचा उपयोग करून दाखवायचा ! बरी संधि आली ! "

पण अशी छान संधि आल्यावर मला तिचा उपयोग करूं देईल, मग तो बगड्या कसचा ? तो तसाच उठून लंगडत लंगडत घरांत निघून गेला.

तर या त्याच्या दुखण्यावर चव्हाणांनीं धांवपळ करून त्याचें दुखणें औषधपाणी करून बरें केलें. तेव्हांपासून मग बण्डोपंत म्हणत,

" याला म्हणावें मास्तर । मास्तर असावा चव्हाण, अन् बाकीच्यांना दाखवावी गव्हाण ! घरीं पोरें अभ्यास करतात, कीं गोट्या खेळतात, चकाट्या पिटतात कीं धिंगाणा घालतात, याची ज्यांना दखल नाहीं, ते कसले मास्तर ? ते नुसते कोटाला लावावयाचें अस्तर ! या चव्हाणांबरोबर आमच्या बगड्याला

अगदीं नर्कांत सुद्धां पाठवावयाची तयारी आहे आपली !"

नर्काच्या मानानें रायगड हा जवळ आणि माहितींतला असल्यामुळें बगड्याला तिथें पाठवायला बण्डोपंत अगदीं सहज तयार झाले. एक मुख्य प्रश्न मिटला.

आतां उरले बाकीचे लोक. पैकीं श्री. मी दाण्डेकर. यांचे वडील दादा तर माझ्याबरोबर चि. आबाला त्याच्या मोटारीसुद्धां धाडायला तयार झाले. श्रीमारुतिरायांच्या कृपेनें आणि लवाट्यांनीं माझें भविष्य चांगलें लिहिलें असल्यामुळें चव्हाणच नको म्हणाले, ती गोष्ट वेगळी. त्यांच्या मतें रायगडचा चढ अधिक असल्यानें आबांना तो चढवणार नव्हता.

अहो, चढ अधिक असल्याची गोष्ट निघाल्याबरोबर रायगडच्या स्वारींतून आमचेंहि नांव कमी होतें कीं काय अशी भीति वाटायला लागली होती ! दादा म्हणाले,

" जर आबाला गड चढवणार नसेल, तर अप्पाजीहि काय चढण्याचे दिवे लावणार आहेत कोण जाणे !"

आईनें माझ्या बाजूनें वकिली केली. " इश्श ! न चढायला काय झालें ! माझी एवढी पन्नाशी उलटायला आली, तरी मी सुद्धां चढून जाईन ! लहानपणीं पोफळीवर चढून तिला मी झोंके द्यायची, अन् दुसरी पोफळ जवळ आली, कीं पटकन् तिची झावळ धरून तिच्यावर चढून जायची वरच्या वर ! अप्पा माझाच मुलगा आहे ना !"

काय सांगूं तुम्हांला ? अशा शूर आईचा मी पुत्र आहें, हें ज्या क्षणीं मला कळलें, त्या क्षणीं माझा माझ्या पूज्य आईबद्दलचा आदर भयंकर वाढला ! ( मला माहीत आहे कीं, इथें हा " भयंकर " शब्द वाचून माझे मित्र माझ्या शुद्धलेखनाविषयीं आणि लिहिण्याविषयीं नाकें मुरडतील. पण आपण ज्या अर्थानें " ती बर्फी मला भयंकर आवडली, " हें वाक्य म्हणतों, त्याच अर्थानें माझें वाक्य मनांत दोनचार वेळां म्हणून पाहावें, अशी माझी

शिफारस आहे. ) दादाही या आईच्या भाषणावर थोडेसे कुरकुरत बाहेर गेले.

पण धन्य त्या लवाट्यांची ! दोनच दिवसांनीं महाडला असलेले माझे मामा श्री. शांताराम विष्णु अवळसकर यांचें दादांना पत्र येऊन थडकलें ! त्या पत्रांत त्यांनीं लिहिलें होतें,

" यंदा उन्हाळ्याच्या सुट्टींत चि. अप्पा, आबा व माई या तिघांना महाडला पाठवून द्यावें. आपण म्हणाल कीं, उन्हाळ्यांत पोरांना महाडला कशाला बोलावतां ? तर हें आपलें कारण प्रत्येक पाळीला ठरलेलें आहे. पावसाळ्यांत कोंकणांत पाऊस फार, हिंवाळ्यांत महाडला थंडी जबरदस्त आणि उन्हाळ्याबद्दल तर बिचाऱ्या महाडचें नाव बद्दूच आहे !

" तरी चि. सौ. चीही मुलांनीं इथें यावें अशी इच्छा असल्यानें आपण मुलांस पाठवून द्यावें. दुसरें असें कीं, मी कांहीं ऐतिहासिक कागदपत्रांच्या शोधांत रायगड खोऱ्यांत जायच्या विचारांत आहें. अप्पालाही बरोबर घेऊन जाईन म्हणतों रायगड पहायला. काय करतां तें कळवावें. "

आतां बोला ! टाळी द्या आतां ! लवाट्यांवर माझा विश्वास आहे तो कांहीं उगाच नाहीं ! तर चव्हाणांच्या रायगड–स्वारीला आईचा पाठपुरावा आणि मामांचें पत्र, अशा दोन सरदारांनीं ससैन्य मदत केल्यामुळें ती स्वारी यशस्वी झाली, हें सांगणें नकोच.

शिन्याच्या वडिलांनीं आम्ही दोघेजण निघालेले पाहून त्याला परवानगी दिली. दत्तु फणसाळकरानें रुसून फुगून आणि आईजवळ आमरण प्रायोपवेशनाचा धाक घालून परवानगी मिळविली. मात्र त्याचे वडील त्याला यंदां क्रिकेटचा सगळा सेट घेऊन देणार होते तो मिळणार नाहीं, असें त्यांनीं त्याला बजावलें. जेव्हां दत्त्यानें येऊन ही बातमी आम्हांला सांगितली तेव्हां कोयनेलवांचून क्रिकेटचा मलेरिया गेल्याबद्दल आम्ही मनांतल्या मनांत मारुतिरायाला नमस्कार केला. एकेका पैशाची खडिसाखरही एकमेकांत वांटण्याचें मीं आणि बगड्यानें मारुतिरायाजवळ कबूल केलें.

आतां दुकानदाराजवळ आम्ही एक एक पैशाची खडिसाखर मागितल्या-बरोबर त्यानें तुच्छतेनें आम्हांकडे पाहून तो पैसा चिंच लावून घासून कंपासच्या पेटींत ठेवून देण्याविषयीं सुचविलें. बरें, अधिक किमतीची खडिसाखर घ्यावी, तर मारुतिराय रागावले असते ! म्हणून मग आम्हीं तो बेत शेवटीं रहित केला.

जिथें आम्ही तिथें चिमण्या, हेंही ठरलेलेंच असल्यामुळें त्यानेंही या स्वारीवर जाण्याची सिद्धता केली. खर्चाबद्दल त्याचे वडील थोडे कुरकुरले, पण मग त्यांनीं परवानगी दिली.

कदम अगोदर नाहीं म्हणत होता. पण मी रागारागानें त्याला म्हणालों, " अरे शिवरायाच्या वंशजा ! तूं मर्द मराठा असून रायगडावर स्वारी करायला नाहीं म्हणावेंस ना ! तुझें शौर्य काय फक्त ' रामजोशी ' पाहून त्यांतल्या लावण्या म्हणण्यांतच खर्च होणार ? तूं तर या स्वारींतल्या एका सरदाराचा पार्ट करावास. तो अभ्यासाचें निमित्त सांगून नाशिकला जाऊन तिथें शिनेमे पहात आणि चिवडा खात वेळ काढणार काय रे ? धिक्कार असो तुला !"

ज्या क्षणीं हें माझें आवेशयुक्त भाषण संपलें, त्या क्षणीं कदमची छाती फुरफुरली, दण्ड फुगले, मुठी करकरल्या, दांत आवळले गेले, आणि तो म्हणाला—" अप्पा ! ऐक माझी भीषण प्रतिज्ञा ! काय होईल तें होवो ! या जन्मांत पुनः ' रामजोशी ' पहायला न मिळाला तरी हरकत नाहीं मिष्टर ! पण हा कदम तुमच्याबरोबर नक्की रायगडावर येणार ! "

त्यानंतर माधव शिंदे तर काय ! रायगडचें नांव ऐकल्याबरोबर महादजी शिंद्यांचा तो शूर वंशज आमच्या या स्वारींतला एक सैनिक म्हणून यायला तयार झाला !

शिदू माळी मात्र नुसताच पाहिलवान ! सदूभाऊंना नुसतें रायगडवर जाऊं का असे विचारायचेंही धैर्य होईना त्याला ! शेवटीं बगड्या व मी

दोघेजण त्याला घेऊन सदूभाऊंकडे निघालों.

जातांना मीं शिदूचा उत्साह वाढविण्याकरतां जें भाषण केलें त्याचा थोडासा नमुना पुढें देत आहें.

" अरे शिवा, तूं घाबरतोस काय असा? चांगला दणकून विचार वडिलांना ! काय? नाहीं म्हणतोस? हद्द ! मित्रा कुठला ! अच्छा पठे ! तुझ्याकरतां हम विचारेंगे तुमारे वाडिलोंकू ! अरे वेळेवर उपयोगी पडत नाहीं, मग तो मित्र कसला ! जर तुला सदूभाऊ नाहीं म्हणाले, तर मग आम्हीही तुझ्याबरोबर उपास करूं....आजचा दिवस ! "

आम्ही दोघे नुकतेंच जेवण आटोपून घराबाहेर पडलों होतों, हें येथें नमूद करून ठेवणें अत्यावश्यक आहे.

पण आमच्यावर उपवासाची पाळीच आली नाहीं. मित्राकरितां आम्हांला सदूभाऊंनीं एवढाही स्वार्थत्याग करूं दिला नाहीं.

आम्ही तालमींत गेलों, तेव्हां सदूभाऊ जोर काढीत होते. आम्हा दोघांना पुढें करून शिद्या मागेंच राहिला. हें पाहून बगड्या पुढें झाला आणि म्हणाला,

" एक काम आहे सदूभाऊ ! "

" काय रे बगड्या? " सदूभाऊ घाम पुशीत म्हणाले.

" आम्ही जाणार आहोंत— "

" रायगडावर. " मी वाक्य पुरें केलें. कारण आम्ही महाडला माझ्या मामांच्या घरीं उतरणार असल्यानें या स्वारीचें सगळें श्रेय मीं घ्यावें, हें अगदीं स्वाभाविक होतें. पण बगड्याला पुढें पुढें मिरवायची संवय आहे, त्याला कोण काय करणार? मी घाईघाईनें पुढें बोलूं लागलों,

" हो. रायगडावर जाणार आहोंत आम्ही, सहा-सातजण. बरोबर आहेत आमचे चव्हाण गुरुजी. तर तुम्ही शिदबाला आमच्याबरोबर पाठवा. न पाठवलेंत, तर आम्ही आज दिवसभर— "

" कंदी निगनार तुम्ही? " सदूभाऊंनीं मधेंच माझें भाषण पुरें न होऊं

देतां विचारलें.

" दहा बारा दिवसांनीं. उन्हाळ्याच्या सुट्टींत." मी म्हणालों.

" घेऊन जा ! या पोराला जरा वाईच धीट करा तुमी ! लई भित्रा ! कंदीबी एक सबूद बोलायचा न्हाई ! खर्चोया काय लागल त्ये माज्यापून मागून घ्या ! "

झालें बहुधा सगळें. आम्ही तिघे लढाई जिंकल्यागत फुशारक्या मारीत बाहेर पडतोंय, तों रतन न्हावी येऊन आम्हांला म्हणाला,

" काय अप्पा ! लई विच्छा होती तुमाबरुबर येन्याची. पण काही जुगत न्हाई गड्या ! "

" कां रे ? " मी त्याला विचारून त्याच्यासमोर कोणत्या प्रकारचें भाषण करावें, तें ठरवूं लागलों.

" माज्या बानंबी सांगितलं जा म्हनून. पन्— "

" आतां पण काय ? " बगड्यानें विचारलें.

" पण जरा पैसे कमी पडल्यात. "

" किती आहेत तुझ्याजवळ ? "

" माज्याजवळ चार रुपये अन् सात आने हायेत; लई दिसाचे म्यां जुगवून ठेवलेले. पन येच्या बिगर माज्या बाजवळबी पैसा न्हाई. "

आतां शिदूला चढला जोर. तो बगड्याला म्हणाला, " बगड्या, माझ्याजवळ मामानें खाऊकरतां दिलेले दोन रुपये आहेत. "

" ते तुझे दोन दे अप्पाजवळ. अन् रतन, तूंही सात आणे ठेव आपल्याजवळ अन् बाकीचे चार रुपये दे अप्पाला. बाकीच्यांचें पाहूं मी अन् अप्पा."

मग आम्ही चार विजयी वीर चव्हाण गुरुजींकडे जाऊन त्यांना हें सगळें वृत्त कथन केलें. त्यांना माझ्या मामाच्या पत्राची गोष्ट सांगितल्याबरोबर ते म्हणाले, " अरे ! अवळसकर म्हणजे पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळांत निबंध वाचतात ते तर नव्हेत ? "

"हो ना ! तेच ते !" मला स्वर्ग केवळ इंचभरच उरला असेल, हें सांगण्याची आवश्यकता नाहींच. कारण माझ्या मित्रांसमोर धडधडीत आमचे गुरुजी माझ्या मामांची प्रसिद्धि सांगत होते !

"ते मला ओळखत नसतील, पण मी त्यांना ओळखतों. चला ! खूप छान झालें. आतां रायगड पहायला खूप मजा येईल ! इतिहासाचा मोठा नादी मनुष्य आहे बरें का तो ! आतां अप्पा, बगड्या, निघायचा दिवसच काय तो ठरवायचा. तुमच्या परीक्षा संपल्याच आहेत. दहा बारा दिवसांत शाळेला सुट्टी लागेल. मी उद्यां तुझ्या घरीं येतों अप्पा, अन् मग दिवस ठरवून टाकूं."

दुसरे दिवशीं दादा, बण्डोपन्त आणि चव्हाण गुरुजी, असे पंच बसून आमचा दिन-निर्णय झाला. दादांनीं पुण्याला आतोबांना पत्र घालून आमच्या महाडच्या शिटा रिझर्व करून ठेवायला सांगितलें, अन् महाडला आमची तुकडी येत असल्याचें कळविलें.

माई अन् आबाची गंमत तर कांहीं विचारूंच नका. माईनें महाडला गेल्यावर किती फणस खायचे, त्याच्या किती अठुळ्या पुण्याला भाजींत घालण्याकरितां आणायच्या, मामीकडून पोह्यांचे पापड किती आणायचे, वाल अन् पावटे किती आणायचे, हा सगळा हिशेब आईला विचारून करून ठेवला.

आबा महाडला गेला होता, तेव्हां अगदीं लहान होता. त्यामुळें त्यानें मला महाडसंबंधीं प्रश्न विचारायला सुरुवात केली. मी माझ्या रायगड-स्वारीच्या तयारींत गुंतलों असल्यामुळें त्याला धुडकावून लावता झालों. म्हणून मग तो माईजवळ गेला. माईलाही महाडची माहिती तितपतच होती. तिनें त्याला देतां आलीं तितकीं उत्तरें दिलीं, अन् मग पुढील उत्तर देऊन त्याची बोळवण केली.

"आबू ! बेटा, तूं शहाणा ना ? आपल्याला महाडला जायचें ना ? मग

तयारी नको का करायला ? आपली मामेबहीण मंदा आहे ना तिथें ? तिला माझ्या भावलीचे सगळे कपडे दाखवायला हवेत ना ?"

आबाच्या अंगावर माईबाईनीं शहाणपणाचा अभ्रा चढविल्यामुळें त्याला या सर्व गोष्टी कबूल करणें भागच होतें. तो म्हणाला,

" अन् मग तूं माझीं सगळीं बुकें घेशील ना तुझ्या पिशवींत ? मी मामांना वाचून दाखविणार आहें."

" हो ! घेईल बरें ! मग तूं आईकडे जा बघूं !"

तात्पर्य, सगळ्या अडचणी निवारण करण्याचें जें एकमेव स्थान आमची आई, तिच्याकडे माईनें आबाचें तें शुष्ककाष्ठ सोंपवून दिलें.

मग आबा आईजवळ गेला. आई डाळ निवडीत बसली होती. तिच्या खांद्यावर कोपर रोवून आबानें तिच्यावर पुढीलप्रमाणें प्रश्नांची सरबत्ती केली.

" आई, महाडाला समुद्र आहे ना ग ?"

" समुद्र खूप मोठा असतो ना ग ?"

" तूं कधीं समुद्रांत पोहली होतीस का ?"

" मंदा माझी मामेबहीण आहे ना ग ?"

" मामेबहीण म्हणजे सख्खी बहीण ना ग ?"

" मामानें आपल्या मुलाचें नांव अंशुमाली कां ग ठेवलें ?"

" फणस आपल्या पेरूच्या झाडाला कां लागत नाहींत ग ?"

आईनें या प्रश्नांपैकीं कांहींचीं उत्तरें "हो," आणि बाकीच्यांचीं "नाहीं," अशीं दिलीं.

शेवटीं तो दिवस उजाडला ! सकाळपासून माझे मैतर पन्नास वेळां तरी माझ्याकडे आणि बगड्याकडे येऊन गेले. माझे मामा आमच्याबरोबर रायगडावर येणार असल्यामुळें या स्वारीचें पुढारीपण साहजिकच माझ्याकडे आलें होतें. बगड्याही मलाच पुढारी मानूं लागला होता. मग मीहि उदार मनानें आमच्या तुकडीच्या रक्षकप्रमुखाचें काम बगड्याकडे देऊन टाकलें.

सकाळपासून त्या मैतरांच्या प्रश्नांचीं उत्तरें देतां देतां माझा जीव अगदीं मेटाकुटीला आला होता. आतां मी करूं तरी काय काय? या प्रश्नांचीं उत्तरें देऊं कीं, दादांच्या सूचना लक्षांत ठेवूं, कीं आईचे निरोप ऐकूं, कीं वारंवार मला विचारायला येणाऱ्या आबाला आणि माईला धुडकावून लावूं?

त्या दिवशीं चव्हाण गुरुजी आमच्याकडेच जेवायला होते. आईनें माझी आवडती केळफुलाची भाजी आणि शिरा केला होता. पोरें एवढ्या दूर जाणार म्हणून आईला थोडें वाईट वाटत होतें पण मी तिला निरनिराळीं उदाहरणें देऊन "घाबरूं नकोस, मी आहें," असा धीर देत होतों.

दुपारीं दोन वाजले. पुण्याच्या मोटारची वेळ झाली. दादांनीं मोटार घरासमोर बोलावली होती. बगड्या, शिन्या, दत्तू, चिमण्या, कदम, शिंदू, रतन आणि माधव शिंदे हे सगळे आपापल्या वळकट्या घेऊन आमच्या घरीं एकत्र झाले होते. यांची वडील मंडळी आणि आयाहि आमच्या घरीं आल्या होत्या. चव्हाण गुरुजी सगळ्यांना निश्चित राहण्याविषयीं सांगत होते.

मोटार आली. आईनें आम्हां सगळ्यांच्या हातावर दहीं दिलें. आम्ही बारा शिटा मोटारींत आरूढ झालों, आणि शिवाजीमहाराजांच्या जयजयकारांत आमचें सैन्य रायगडावर स्वारी करण्याकरितां निघालें.

त्या रात्रीं आम्ही पुण्यास मुक्काम केला. आतोबांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं भोरमार्गें महाडाला जाणाऱ्या मोटारीच्या शिटा रिझर्व करून ठेवल्या होत्या.

पहांटे पांचला उठवून आत्याबाईनें आम्हां सगळ्यांना प्रातर्विधि उरकण्यास फर्माविलें. आमचा रक्षकप्रमुख बगड्या होता. त्यानें नंबर लावून दिले त्याप्रमाणें आम्ही शौचविधि उरकून मुखप्रक्षालन संपविलें. नंतर आत्याबाईनें केलेली उकडपेंडी एक एक बशी दाबून आम्ही स्वारगेटावर

जाण्यास सिद्ध झालों.

रमेशनें सायकलवर आबा आणि माईला बसविलें आणि पाहतां पाहतां तो दिसेनासा झाला. बगड्यानें सगळ्यांच्या वळकट्या एका ओळींत ठेवायला सांगितल्या. आणि मग 'एक, दोन, तीन' म्हटल्याबरोबर त्या उचलायचा हुकूम दिला. त्यानंतर त्यानें आगे बढोचा हुकूम सोडला. आतोबा आणि आत्याबाई मोठ्या कौतुकानें बगड्याच्या आज्ञा ऐकत राहिलीं.

आमची तुकडी बगड्याच्या पुढारीपणाखालीं स्वारगेटाकडे चालूं लागली. अर्थात् मी त्या तुकडींत न मिसळतां शिष्टासारखा सगळ्यांच्या पुढें चालत होतों.

स्वारगेटवर जाऊन पहातों, तो तिथें चव्हाण गुरुजी, रमेश, माई, आबा, ही मंडळी अगोदरच पोहोंचून आमची वाट पहात होती. आबा आणि माई हीं दोघें चांगलीं छानदार गुरुजींच्या वळकटीवर बसून आम्हांला लवकर चालण्याबद्दल सूचना देत होती! म्हणजे आम्ही एवढें मैलभर वळकट्या बोडक्यावर घेऊन पददी करीत इथवर आलों, तें कुठेंच गेलें! मी त्यांना वात्रट कीं असें कांहीं तरी म्हणणार होतों, पण एवढ्यांत मोटार आल्यामुळें तें तसेंच राहिलें.

शिटा रिझर्व असल्यामुळें आम्ही सगळे चांगली छानदार जागा मिळवून बसलों. आबा चव्हाण गुरुजींच्या जवळ बसला. माई माझ्याजवळ बसली. बरोबर साडेसात वाजतां आमची मोटार फुर्रर्र करून सुरू झाली.

वाटेंत पद्मावती, कात्रजचा घाट, कात्रजचा तलाव, शिवापूर इत्यादि इतिहासप्रसिद्ध ठिकाणांची माहिती गुरुजींच्या तोंडून ऐकत आम्ही भोर गांठलें. भोरला गुरुजींनीं आम्हांकरितां काकड्या आणि कालिंगडें खरेदी केलीं. मी माझ्या कालिंगडाचा वरचा तांबडा भाग खाऊन झाल्यावर मग खालच्या तांवूस भागासह माझी सगळी खाप माईला देऊन माझें भगिनीप्रेम

सिद्ध केलें. आजच्या काळांत माझा हा स्वार्थत्याग नमूद करून ठेवण्यासारखा आहे.

भोर सोडल्यावर थोड्या वेळानें आमच्या मोटारनें वरंध घाटांत प्रवेश केला. तिथली वनश्री पाहून मात्र आम्ही अगदीं थक्कच झालों ! त्या वनश्री-पुढें आमच्या भद्रेश्वराजवळची वनश्री म्हणजे कार्लेकर सर्कसच्या शंकर सिंहापुढें आमच्या बगड्याच्या खुर्चीतला ढेंकूण ! चकित मनानें न बोलतां सगळेजण ती झाडी पाहूं लागलों. काय एकेक डोंगर तरी ! काय कठीण तो घाट ! किती बिकट त्याचें वळण ! एका बाजूला जणूं आतां अंगावर कोसळणार असला कडा अन् दुसऱ्या बाजूला डोळे भिरभिरवणारी दरी !

घाट उतरायला लागल्यावर गुरुजींनीं खालीं खूप दूरवर अन् खोलवर पसरलेल्या कोंणणावरून बोटें दाखवून प्रचंडगड, राजगड, प्रतापगड हे किल्ले दाखविले. आम्हांला केवळ डोंगर दिसले, किल्ले दिसलेच नाहींत. तरी इतरांसमोर फजिती होऊं नये, म्हणून प्रत्येकजण ' हो, हो ' म्हणत होता.

बारा वाजतां आमची मोटार महाडमध्यें जाऊन पोहोंचली. आमचें स्वागत करण्याकरतां आमचे मामा स्टँडवर हजर होते.

## अभ्यास

१. बगड्या झाडावरून पडला हें पाहून अप्पा त्याच्यासमोर व्याख्यान देऊं लागला. तुम्हीं काय केलें असतेंत ?

२. अप्पाच्या आईसारखी तुमच्या आईच्या लहाणपणची एखादी गोष्ट सांगतां येईल का तुम्हांला ?

३. तुम्ही कामांत गुंतलेले असतां तुमचा धाकटा भाऊ जर तुम्हांला प्रश्न विचारूं लागला, तर तुम्ही काय कराल ?

# दोनशें केक

**परिचय** अप्पाच्या मामांच्या घरीं पोहोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं हे मैतर महाडशेजारचीं लेणीं पहायला जातात. त्या दिवशीं कोंझरच्या मोटारीनें रायगडच्या पायथ्याशीं तीं मुलें पोहोंचतात. बरोबर अप्पाचे मामा आहेत.

आमचा सगळा मेळा मामांच्या घरीं जाऊन पोहोंचल्यावर मग काय विचारतां! मामांचें लहानसें घर म्हणजे अगदीं गोकुळ झालें म्हणानात का! आमच्या मामीला मुलांचा भारी लळा. तिचींच सहा मुलें. त्यांत आमचा ताफाच्या ताफा जाऊन थडकला! मग तर तिला आम्हांला कुठें ठेवूं अन् कुठें नाहीं असें झालें.

माईबाई आणि मामाकन्यका मंदा या दोघी मामांच्या अंशुमालीला घेऊन पाळण्यावर जाऊन बसल्या, आणि त्यांनीं जी गोष्टीला सुरुवात केली, त्या गोष्टींत शाळेंतल्या बाई किती वाईट आणि किती चांगल्या आहेत, शेजारच्या पोरी कशा फाजील आहेत, मंगळागौरीच्या रात्रीं आपण किती गाणीं म्हटलीं, भोंडल्याच्या दिवशीं आपण कोणता नैवेद्य ठेवून पोरींना कसें फसवलें, इत्यादि वॅगनभर गोष्टी सांगून झाल्या. त्या कार्ट्या—पण बिचाऱ्या मंदेला आजच कार्टी कसें म्हणूं! त्या मुली ज्या एकदां पाळण्याला गोचिडीसारख्या चिकटून बसल्या, त्या जाम उठेचनात!

आबाजीराव तर सोनगांवचे म्हणजे पुण्याच्या शेजारचे! त्यानें मामाच्या

मुलांना भोंवतालीं गोळा करून ऐशा कांहीं गोष्टी सुनवायला प्रारंभ केला म्हणून सांगूं ! पुण्याच्या फ्लशिंगच्या संडासाचें वर्णन करून त्यानें महाडच्या एकंदर व्यवस्थेवर पुढीलप्रमाणें शेरा दिला :—

" हाट् ! आमच्या आत्याबाईकडे कसे छान संडास आहेत ! पांढऱ्या दगडाच्या पायठण्या, खालीं सगळीकडे पांढरें गुळगुळीत ! अन् आंतच मुळीं नळ ! किल्ली फिरवली, कीं मिष्टर, लागेल तितकें पाणी घ्या तुम्ही ! आंघोळ का करा ना ! नाहीं तर तुमच्या इथें ! भरभर सगळा वाराच वारा चहूंकडून ! अन् आमच्या सोनगांवसारखेंच शेताच्या कडेला बसायचें ! महाड कांहीं पुण्यासारखें चांगलें नाहीं ! "

मामांचीं मुलें ओशाळी होऊन आपल्या महाडची बाजू सांभाळण्याकरितां म्हणालीं, " पण आमच्या महाडजवळ गुहा कशा आहेत डोंगराला ! "

बगड्याचें भूवर्णन ऐकून आबा अर्धवट तयार झाला होता. तो पटकन् म्हणाला, " वा ! आमच्या सोनगांवच्या डोंगराला वेरूळचीं अन् आजिंठ्याचीं लेणीं आहेत म्हटलें ! "

" पण आमच्या इकडचे फणस..." मामांचा शरद चिरडीला येऊन म्हणाला.

" आमच्या पुण्याचीं केळीं अन् संत्रीं ! " आबाजवळ उत्तर तयार होतें.

आतां अटीतटीचा सामना सुरू झाला. महाडकरांना कांहीं तरी पुण्यापेक्षां वरचढ सांगणें भागच होतें. नाहीं तर महाडचें नाक खालीं झालें असतें. महाडकरांचें भूगोलाचें ज्ञान अकटोपासून विकटोपर्यंत असल्यानें पुणें जिल्ह्यांतल्या सोनगांवच्या शेजारच्या डोंगराला वेरूळचीं अन् आजिंठ्याचीं लेणीं असणें त्यांनीं निमूटपणें मानून घेतलें होतें.

एकदम शरद् अंगीं वारा भरल्यासारखा उभा राहून म्हणाला,

" अहो मिष्टर ! आमच्या महाडसारखी खाडी आहे का तुमच्या सोनगांवला नाहीं तर पुण्याला ? "

सगळ्या मुलांना वाटलें कीं आतां आबाची जिरली. पण किती केलें तरी आबा माझा भाऊच होता. तो म्हणाला,

" वा वा ! म्हटलें आमची इंद्रायणी नदी तुमच्या खाडीपेक्षां, गंगेपेक्षां, यमुनेपेक्षां, समुद्रापेक्षां मोठी आहे ! "

परत महाडकरांचें पारडें खालीं झालें. मी जवळच उभा होतों. मी आबाला म्हणालों, " अरे आबा, पुण्याचा शनवारवाडा—"

" अप्पा ! " महाडकर शरद् आणि मधू एकदम ओरडले, " लहान पोरांत मोठ्यानें बोलायचें नाहीं म्हटलें ! "

" नाहीं तर नाहीं रे अप्पा ! " आबा अगदीं एखाद्या शूर वीरासारखा मला आश्वासन देत आणि मांडी ठोकीत म्हणाला, " जाऊं दे ! मी एकटाच पुरें आहे या भातखाऊंना ! कोंकणांत भाताशिवाय दुसरें मिळतें काय ? "

माझ्या भावाचा तो पराक्रम पाहून मी अगदीं खूष झालों. आजपर्यंतचे सगळे गुन्हे मी आबाला मनांतल्या मनांत अगदीं माफ करून टाकले.

पण शरद् ओरडला, " अहो घाटावरचे भाकरीभाऊ ! सरळ सांगा कीं तुमच्या पुण्याचें ! अप्पानें सांगितलेला रविवारवाडा कीं गुरुवारवाडा बाद झाला. तो धरायचा नाहीं. "

" नाहींतर नाहीं. आमच्या पुण्यासारखी आगगाडी कुठें आहे महाडला ?" आबानें प्रश्न केला, अन् तो विजयी वीरासारखा सर्वांकडे बघूं लागला. दोन मिनिटें कोणी कांहीं बोललें नाहीं. आबा चेकाळून ओरडला, " अहो महाडकर ! बोला ना आतां ! आतां कां भागूबाईसारखे—"

" हां ! शिव्या देऊं नकोस ! तुला काय भांडायचें तें सरळ सरळ भांड ! " मामापुत्र मधू गंभीरपणें म्हणाला.

ही गोष्ट मलाही मान्य होती. मीही त्याप्रमाणें आबाला सूचना केली. तो म्हणाला,

" ब ऽ रं ! नाहीं देत शिव्या ! बोला ना ! आगगाडी आहे का

महाडला ? ”

तेवढ्यांत बगड्या येऊन हळूच शरद्‌जवळ बसला, आणि त्याच्या कानाशीं लागला. लागलीच शरद्‌ ओरडला,

“ नाहीं आगगाडी आमच्या महाडला. पण आमच्यासारखा रायगड ! ”

हा प्रश्न मात्र बिनतोड होता. म्हणून मग मी त्या युद्धांत पडलों.

“ अहो ! रायगड नसला तरी सिंहगड आहे ! ” मी म्हणालों.

“ अप्पाजी, राय मोठा कीं सिंह मोठा ? ” शरद्‌नें विचारलें.

“ सिंह मोठा. तो रायाला फाडून खातो. ” मी उत्तर दिलें.

“ मुळींच नाहीं. रायच मोठा. तो सिंहाला गोळी घालून मारतो. अन्‌ शिवाय रायगडावर शिवाजीमहाराज गादीवर बसले. तुमच्या सिंहगडावर बसले का ? ”

बगड्या इथें नसता, तर रायगडाच्या गादीवर बसून झाल्यावर शिवाजी-महाराज सिंहगड, लोहगड, तुंग, तिकोना या गडांवरही गादीवर बसले अशी थाप मारली असती. पण आपली बाजू हरत्येशी पाहून शेवटीं मीं समेट केला.

“ मधू, शरद्‌ ! तुमच्याकडे रायगड आहे, आमच्याकडे आगगाडी. चला, बरोबरी झाली. ”

तीं पोरेंही अगदीं हरायला येऊन ठेपलीं असल्यानें त्यांनीं हा समेट मान्य केला.

आमचे मामा आणि चव्हाण गुरुजी यांची तर अशी कांहीं दोस्ती जुळली ! मामांनीं आपला पानसुपारीचा सरंजाम काढला. तो मध्यें घेऊन मामांनीं हातांत एक सुपारी घेतली, आणि तिला अडाकित्यानें गोंजारीत त्यांनीं इतिहासाचें मोहोंजो-दोडो उकरून काढायला केला प्रारंभ !

आमचे चव्हाण गुरुजीही कांहीं कमी नव्हते ! त्यांनीं पोर्तुगीजांच्या स्वाऱ्या, जंजिऱ्याचे हबशी, कुलाब्याचे आंगरे, या मंडळींविषयीं नाना-

प्रकारचे प्रश्न विचारायला केली सुरुवात.

मामांना खूप दिवसांनीं असला विचारणारा भेटला होता. यामुळें तेही हौसेनें सांगायला लागले. मग जुनीं पत्रें आलीं, करारनामे आले, मजहर आले, ताम्रपट आले. मामा म्हणाले,

" अलीकडे किनई चव्हाण ! मोडी लिपी लोपत चालली बघा ! नाहीं तर भाषणांचे रिपोर्ट घ्यायला ही मोडी लिपी ऐशी फक्कड आहे म्हणून सांगूं ! पण पोरांना मोडींत सहीही करतां येत नाहीं अलीकडे ! मजा काय होते सांगूं ?

" एक मोडी पत्र आलें वाचायला. तें बाजीराव पेशव्यांच्या वकिलाचें होतें. त्यांत एक वाक्य असें होतें : " श्रीमंतांजवळ ते समयीं दोनशें लोक होते. " एक विद्वान् बसले वाचायला. त्यांनीं काय वाचलें माहीत आहे का ? "

यानंतर मामांनीं तंबाखू बनवली. तिची फकी अलगत तोंडांत ठेवून देऊन मग त्यांनीं तंबाखूची डबी बंद केली, मग अडकित्ता एका बाजूला ठेवून दिला. नंतर लवंगाच्या डबींतला कचरा काढून टाकला.

चव्हाण गुरुजी म्हणाले, " काय वाचलें ? "

बगड्या, मी, चिमण्या, शिंदे अशीं पोरें भोंवतीं बसलों होतों. आमच्या-कडे बघत मामांनीं आपल्या तोंडांतला तमाखूपाक सांभाळीत विचारलें, " कॉय वाचलें असेल ? "

मला कांहीं सुचलें नाहीं. बगड्याला कांहीं सुचलें नाहीं. कोणालाच कांहीं सुचलें नाहीं. म्हणून मग आम्ही मामांच्या तोंडाकडे पहात बसलों.

मग मामा उठले. त्यांनीं तंबाखूची पिंक बाहेर झोंकून दिली. मग जागेवर परत बसत आणि हंसत ते म्हणाले, " काय वाचलें असेल ? "

पण कोणीच कांहीं बोलत नाहीं, असें पाहून ते म्हणाले, " त्यानें वाचलेंन्, ' श्रीमंतांजवळ ते समयीं दोनशें केक होते ! ' तो मला म्हणाला,

' लोक होते, असें वाचण्यापेक्षां केक होते ' असें वाचण्यांत अधिक मौज आहे. केकचा अर्थ होतो मोर. तेव्हा श्रीमंतांजवळ दोनशें मोर होते, हें वर्णन अधिक कुतूहल निर्माण करणारें आहे. केकचा दुसरा अर्थ साहेबाची खायची वस्तु."

" मग तर काय ! श्रीमंत साहेबाबरोबर जेवत होते, असाही शोध लावतां येईल ! हो तर काय ! दोनशें केकस् बरोबर वागवणारा मनुष्य साहेबाबरोबर जेवत असलाच पाहिजे ! ' आतां बोला ! आहे कीं नाहीं मजा ? "

हें इतिहाससंशोधनांतलें पांडित्य ऐकून मलाही इतिहाससंशोधन करायची इच्छा निर्माण झाली, हें इथें नमूद करणें आवश्यक आहे.

रात्रीं आम्ही सगळे अंगणांतल्या चांदण्यांत जेवायला बसलों. मामी कौतुकानें आम्हा सगळ्यांना वाढीत होती. मंदा आणि माई या दोघीही उगीच मोठेपणानें हातीं मीठ-चटणी घेऊन लुडबुडत होत्या.

जेवण अगदीं साधें होतें. भात, पावट्यांची उसळ, ताक आणि पोह्यांचे पापड. पण मामीचें अगत्य किती होतें ! सगळेजण एकमेकांना आग्रह करकरून जेवलों. पावट्यांची उसळ आम्हांपैकीं अनेकांनीं कधीं खाल्ली नव्हती.

चव्हाण तें पाहून म्हणाले, " रतन, जरा सावकाश खा बरें का कोंकणचा मेवा ! रात्रीची वेळ आहे ! "

मी आणि बगड्या हें ऐकून खूप हंसलों. बाकीच्यांना आम्ही कां हंसलों हें कळलेंच नाहीं. त्यांच्या लक्षांत ती गोष्ट रात्रीं रतनला बेकीकरतां बाहेर जावें लागलें तेव्हां आली.

रात्रीं नऊ वाजतां मामांनीं अंगणांत एक मोठें जाजम अंथरून दिलें, अन् त्यावर आमच्या फौजेनें आपापल्या वळकट्या सोडल्या. मामा, मधू, शरद, आबा, गुरुजी ही सगळी मंडळी आमच्यांतच झोंपली.

वर स्वच्छ आकाश होतें, अन् त्यांत खंडीभर चांदण्या. त्यांच्याकडे

पाहून एकेकजण कविता करूं लागला.

“कनी, देवाच्या घरीं घराला चुना देताहेत, त्याचे थेंब उडाले आहेत हे.” चिमण्याची कविता.

“तसें नव्हे कांहीं! वर गोपालकृष्ण गोपालकाला करतो आहे, त्यांतल्या लाह्या पसरल्या आहेत चहूंकडे.” बगड्या.

“नाहीं तर देवाच्या घरचा लोहार तापलेलं लोखांड ठोकीत असेल, त्याच्या ठिनग्या उडाल्या असतील.” रतन.

प्रत्येकानें कांहीं तरी कल्पना केली, म्हणून मग मलाही बोलणें भागच होतें.

“अरे, यशोदामाई ताक करत्ये आहे वर. घुसळतां घुसळतां थेंब उडाले, अन् ते आकाशांत चिकटून राहिले.” मी काव्य प्रसवलों.

तोंच मामांनीं हुकूम सोडला, “ऐकलेंत पोरांनो, पहांटे लवकर उठून गुहा पाहायला जायचें आहे. झोंपा आतां. आळीमिळी गुपचिळी!”

आतां झोंपणें भागच होतें. पहांटे उठलों, शौचमुखमार्जन आटोपलें. तों मामीनें मागच्या अंगणांत ओळीने चवणीचीं दोन दोन पानें टांचून मांडलीं होतीं. मंदा म्हणाली,

“अप्पा, बगड्या, चिमण्या, सगळे पातळ भात खायला चला.”

पटापट जागेकरितां भांडत आम्ही सगळे पानावर बसलों. भांडणांमुळेंच आपला समाज अधोगतीला गेला आहे, असें भाषण मी करणार होतों; पण एकतर त्या भांडणांत माझेही हात थोडेसे बरबटले होते. अन् दुसरें, मामीनें शिजत असतांच मेतकूट अन् तूपमीठ घातलेला पातळ भात वाढायला आणला.

काय चव होती म्हणून सांगूं त्या भाताला! मी तर म्हणालों कीं, “कोणी आपल्याला लाख रुपये दिले तरीसुद्धां आपण हा भात टाकून दुसरें कांहीं खाणार नाहीं.”

माझें हें मत माझ्या मित्रांना पसंत पडलें नाहीं, ही गोष्ट वेगळी. बगड्याचें अन् चिमण्याचें म्हणणें असें होतें कीं, "तुला लाख रुपयेच कशाला द्यायला पाहिजेत? पांच रुपये दिले तरीसुद्धां तूं दिवसभर उपाशी रहायला सांगितलें कीं राहशील."

खाणीं उरकल्यावर मग आमची फौज चव्हाणगुरुजींच्या पुढारीपणाखालीं अन् मामांच्या वाटाडेपणाखालीं महाड गांवांतून मिरवत खाडीवर जाऊन पोहोंचली. खाडींत एक-दोन गलबतें अन् चार सहा बारक्या नावा उभ्या होत्या. रतन, शिंदे, कदम, दत्तू या मंडळींनीं कधीं गलबतें पाहिलीं नसल्यानें त्यांना त्यांचें मोठें कौतुक वाटलें. पण मी नाक मुरडून म्हणालों,

"एवढें कौतुक करण्यासारखें काय आहे त्यांत? एक एक लाख माणसें बसूं शकतील, अशा मोठाल्या बोटी लागतात आमच्या दाभोळला! अन् त्या कांहीं नुसत्या पाण्यांतूनच चालत नाहींत! बोटींच्या बाहेर चाकें असतात अडकवलेलीं. त्यांना म्हणतात 'लाइफ-बेल्ट.' तीं चाकें जोडलीं बोटींना कीं त्या रस्त्यावरसुद्धां भराऽरा पळायला लागतात!"

मी पुरवीत असलेली ही माहिती ऐकून मामा आणि चव्हाणगुरुजी मोठे प्रसन्न झाले. हें मीं ते मोठमोठ्यानें हंसत होते, यावरून ताडलें.

बंदरावरून मग आम्ही पश्चिमेकडे असलेलें एक छोटेंसें गांव ओलांडून पलीकडला डोंगर चढूं लागलों. वाटेंत शेतकरी आपलीं शेतें भाजीत होते. मी कदमाला म्हणालों,

"बघ! कोकणी शेतकरी किती मेहनत करतो! जमीन भाजल्यानें तींत भात फार चांगलें येतें! पण तुम्हा घाटावरच्या लोकांना कधीं मेहनतच करायला नको! तुम्हीही अशा जमिनी भाजून त्यांत कापूस अन् गहूं पेरीत जाल, तर कापसाच्या एकेका वेलाला चारच पावली कापूस लागेल!"

कदमनें कापसाचें पीक कधीं केलें आणि पाहिलें नसल्यानें त्याला

माझा मुद्दा मान्य झाला.

तोंच गुहा आल्या. किती तरी गुहा होत्या. आमच्या कोसलाईच्या डोंगरासारख्याच होत्या त्या. पण कांहीं मात्र मोठमोठाल्या होत्या. एक तर खूपच मोठी होती. तींत कोनाडे होते मोठमोठाले. आम्ही पटापट धांवत कोनाड्यांतून जाऊन बसलों. एवढेंसें बोललें, कीं खूप मोठा आवाज व्हायचा.

आवाजाचा तो प्रतिध्वनि ऐकण्याकरितां म्हणून मी हळूच तोंडांतून मोठा आवाज काढला. माझें पाहून बगड्यानें आरडायला सुरुवात केली अन् आम्ही दोघे पुढारीच ओरडूं लागल्यावर बाकीचे कशाला गप्प राहतील? त्या सगळ्यांनीं आमच्या आवाजांत आपापले आवाज मिसळून दिले!

पांच मिनिटें सगळी गुहा आमच्या आवाजांनीं दणाणून गेली! मामा अन् चव्हाण हे दोघे कानांवर हात ठेवून बसून राहिले. चव्हाण गुरुजी "गप्प रहा" असा आम्हांला उपदेश करीत होते, पण आमच्या त्या रणवाद्यांच्या गजरांत तो उपदेश ऐकूं येईल तर त्याचें पालन करायचें ना?

प्रत्येक जण अगदीं मोकळ्या मनानें अन् मोकळ्या आवाजानें ओरडत होता. एकदां दम संपला, कीं परत मग सुरुवात करावयाची. मंत्रपुष्पांजलीची सुधारलेली आवृत्तीच म्हणानात का?

माई आणि मंदा माझ्या शेजारीं उभ्या राहून कानांत बोटें घालून माझ्याकडे पाहात 'पुरे करा' म्हणून किंचाळत होत्या. पण ऐसा मजा सुरू असल्यावर या कार्ट्यांचें ऐकतो कोण?

शेवटीं मामा उठून बाहेर गेले, आणि त्यांनीं बाहेरून कांहीं तरी वस्तु चिमटींत आणली. माझ्याजवळ येऊन त्यांनीं माझ्या पसरलेल्या मुखांत ती टाकली. तशी 'थूऽथूऽथू' करीत मी एकदम थांबलों!

माती होती ती. माझी ही फजिती पाहून मग इतर सगळेही हंसत थांबले. आम्ही सगळे थांबल्यावर गुरुजी म्हणाले,

" दोनचार वर्षें सोनगांवला होळी धुमाकुळानें साजरी होत नाहीं, ती सगळी कसर पोरांनीं पांच मिनिटांत काढून टाकली ! "

" छेऽऽहो चव्हाण ! हीं सगळीं पोरें रणवाद्यें चांगलीं छान वाजवितील ! " मामांनीं सुपारी फोडीत अभिप्राय दिला.

" तोंच आबाला कसली तरी हुक्की आली. अन् तो चिमण्याला ओढीत कोपऱ्यांत गेला. एका मिनिटानें तो त्याच्याबरोबर परतत मामांना म्हणाला,

" मामा ! हें किनई मोठें थेटर आहे ! "

" बरें ! मग ? नाटक करायचा विचार आहे कीं काय तुझा ? "

" सगळें नाहीं कांहीं ! थोडेंसेंच ! चल चिमण्या, तूं तिकडून यायचेंस बरें का ! मामा, मी तानाजी, बरें का ? "

मग आबा मधील पटांगणांत छाती काढून इकडे तिकडे बघत फिरूं लागला. मध्येंच त्यानें ओठांवर हात फिरविला, मग तो म्हणाला,

" हा सिंहगड तर जिंकून झाला ! आतां त्या उदयभानूला मारला कीं काम संपलें. अरे ! तो उदयभानूच येतो आहे वाटतें ! "

कमरेवर डावा हात ठेवून चिमण्या रंगभूमीवर आला. त्याच्याकडे रोखून पाहात तानाजी म्हणजे आबा म्हणाला, " कोण तो ? उदयभानू ? "

" हो ! उदयभानू ! " उत्तर मिळालें.

" अरे उदयभानू, तुझें नांव काय ? "

" माझें नांव ? उदयभानू ! "

" असें ? तर मग हो युद्धास तयार ! "

मग एक मिनिटभर दोघांचें हाताच्या तरवारींनीं युद्ध झालें. आबा सांभाळून खालीं पडत म्हणाला, " अरे, अरे ! मी मेलों ! माझा जीव गेला ! " मग त्यानें आपली जीभ बाहेर काढून डोळे मिटले अन् थोडेसे

हातपाय झाडले.

हें पाहून उदयभानू म्हणाला, " अरेरे ! आतां मी तरी जगून काय करूं ? " असें म्हणत त्यानें हातांत नसलेलें पिस्तुल आपल्या छातीकडे रोखून तोंडानें ' ठो ! ' असा बार काढीत हळूच शरीर खालीं टाकून दिलें !

हंसतां हंसतां आमची पुरेवाट झाली. परत फिरतांना मामांनीं कोंकणांतल्या नाटकांच्या खूप गंमती सांगितल्या. एका स्त्रीपार्ट्यानें काम करण्यापूर्वीं अट घातली कीं, आपण आपल्या भरगच्च मिशा काढणार नाहीं. दुसरा कोणी स्त्रीपार्टी नसल्यानें मग सुभद्रेचें काम त्याच्याकडेच द्यावें लागलें. नाटक झालें, तेव्हां ही मिशावाली सुभद्रा लुगडें नेसून स्टेजवर जेव्हां लाजूं लागली तेव्हां खूपच हंशा पिकला.

घरीं परतल्यावर स्नानें व जेवणें उरकलीं. दुपारीं परत गप्पा झाल्या. सायंकाळीं चारला आम्ही आमच्या वळकट्या तिथेंच ठेवून आणि एकेका पिशवींत तांब्या, चादर, लंगोट, स्मरणवही, पेन्सिल असें सामान घेऊन मोटरस्टँडकडे निघालों.

आबानें आणि माईनें थोडी कुरकुर केली. पण पुढील पाळीला त्यांना नेण्याचें वचन मामांनीं दिल्यावर मग तीं दोघें तिथेंच राहिलीं. त्यांच्या जोडीला म्हणून मंदा, मधू अन् शरदू हीं मुलेंही घरींच थांबलीं.

आम्ही अकरा शिटा कोंझरच्या मोटरींत जाऊन बसलों. मोटरींत खूप गर्दी होती. आमच्याबरोबर एका पासिंजरच्या बकऱ्याही आमच्याच मोटरीनें कोंझरला येणार होत्या. आमची बडबड, बकऱ्यांचें बेंबटणें, हें सगळें चालू असतांच मोटार निघाली.

धक्के खात आणि एकमेकांच्या अंगांवर बळेंच पडत आम्ही एका तासानें मोटार थांबल्यावर खालीं उतरूं लागलों. एखाद्या गारुड्याच्या पोतडींतून भराभरा कोंबडीचीं पिलें बाहेर पडावींत, तसे त्या वीस सीटच्या मोटारींतून

आम्ही एकुणपन्नास माणसें आणि तीन बकऱ्या बाहेर पडलों.

बाहेर आल्यावर आम्हीं भोंवतालीं पाहिलें. अहाहा ! शेजारून गांधारी नदी वाहात होती, अन् आमच्या चारी बाजूंना आकाशांत भोंकें पाडीत डोंगराचीं शिखरें उनाड पोरांसारखीं आकाशांत वाढत होतीं !

## अभ्यास

१. तुमचें देशावरचें गांव आणि मुंबई यांची तुलना करा.

२. आकाशांतल्या चांदण्यांवर तुम्हांला काय कल्पना सुचतात ?

३. अप्पानें बोटी रस्त्यावर पळवायची जी माहिती सांगितली, ती वाचून तुम्हांला मोटारी आकाशांतून उडवायची कल्पना सुचली काय ? करा बरें तिचें वर्णन !

# करवंदांची जाळी

परिचय

कोंझरहून लगेच निघून तीं मुलें रायगडाच्या अगदीं पायथ्याशीं असणाऱ्या पाचाडला पोहोंचतात. त्या रात्रीं तिथेंच एका देवळाच्या अंगणांत मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं पहांटे उठून हे सगळे गडी रायगडाच्या अलीकडील खिंड उतरून ऐन चढाजवळ जाऊन पोहोंचतात.

आमच्या उजव्या हाताला चार सहा उंच डोंगर दाटी करून उभे होते. डाव्या हाताला एक घर इथें तर दुसरें घर तिथें, असें रानभर पसरलेलें कोंझर, अन् त्याच्या शेजारून एखाद्या अवखळ पोरीसारखी पिंगा घालीत धांवणारी गांधारी नदी.

आतां बरीक आम्हांला ऐन मावळांत आल्यासारखें वाटूं लागलें. एवढा वेळ पेट्रोलच्या घाणीनें अगदीं नको जीव झाला होता. पण आतां तो डोंगराचा वारा पिऊन एकेकाची कळी खुलायला लागली.

बगड्या म्हणाला, " अप्पा, डोंगर चढतांना आपल्याजवळ एकेक काठी पाहिजे. "

" हो गड्या ! काठी जरूर पाहिजे बरें का ! " चव्हाणांनीं पुस्ती जोडली.

भोंवतालीं सगळें रानच पसरलें होतें, अन् त्यांत गुरुजींची संमति ! लगेच आम्ही चहूं दिशांना उधळलों. मी आणि कदम एका कळकीच्या बेटाजवळ

पोहोंचलों. कदमनें खिशांतला भला थोरला चाकू काढला. पण मी त्याला म्हणालों,

"अरे ! काय सबंध बांबू का काढणार आहेस? एवढीशी हातांत धरायला काठी काढायची. तिला चाकू कशाला अन् कुऱ्हाड कशाला?"

पण कदमनें मजकडे लक्ष न देतां चाकूनें एक काठी कापायला सुरुवात केली. मीही एक मजबूतशी काठी हातानें मोडूं लागलों. पण बांबू बराच चिवट असतो, असें मला आढळून आलें. म्हणून मग मी ती काठी सोडून तीहून बारीक असलेली दुसरी काठी मोडायच्या उद्योगांत मग्न झालों– पण शेवटीं मला तोही नाद सोडून द्यावा लागला.

मग मी एक बारकीशी छडीच काढून समाधान मानायचें ठरविलें. म्हणून एक हिरवी छडी धरून पिरगळूं लागलों. तों तो पिरगळा माझ्या हातून सुटून ती छडी माझ्या गालाला थोडा जोरानें स्पर्श करून गेली !

मी गाल चोळीत बाजूला सरलेला पाहून कापलेली काठी चाकूनें साफ करीत उभा राहिलेला कदम मला म्हणाला,

"कां रे अप्पा? काय झालें?"

"जाऊं दे झालें ! कळकाची काठी कांहीं तेवढीशी मजबूत नसते. मी दुसरी कसली तरी काढीन !"

कदमनें हंसत आपली काठी माझ्या हातीं दिली, आणि मला कोल्हा व द्राक्षें, ही गोष्ट सांगत तो दुसरी काठी काढूं लागला. एकूण तात्पर्य काय, कीं कदम हा मुलगा परोपकारी असल्यामुळें चांगला आहे.

आम्ही सगळे काठ्या घेऊन एकत्र झालों. मग मामा म्हणाले,

"ऐकलेंत का गड्यांनो ! हा उजव्या हाताला डोंगर दिसतो ना तो रायगडचा डोंगर !"

आम्हांला किती आनंद झाला ! ज्या रायगडावर आमचे छत्रपति गादीवर बसले, ज्यावर त्यांनीं आपल्याला राज्याभिषेक करून घेतला, त्यांची

राजधानी म्हणून जो किल्ला सगळ्या महाराष्ट्राचें तीर्थ बनला, त्या रायगडाच्या अगदीं पायथ्याशीं आम्ही सगळे वीर उभे आहोंत ! आणखी काय पाहिजे माणसाला !

" मग मामा, वर महाराजांचें सिंहासन असेल नाहीं ? " मी कुतूहलानें प्रश्न केला.

" हो तर ! सिंहासन आहे, राजसभा आहे, सगळें कांहीं आहे ! "

" ओहो ! राजसभाही आहे तर ! " चिमण्या म्हणाला, " काय रे अप्पा, मग सरदारांच्या बसायच्या खुर्च्याही असतील ! "

" नव्हे रे ! त्या वेळीं सरदार कांहीं साहेबासारखे खुर्च्यांवर बसत नसत ! " मी माझें मत सांगितलें. पण कशावर बसत, हे कुण्या शहाण्याला माहीत होतें ?

" मग कशावर बसत होते ? " चिमण्यानें विचारलें.

माझें पुढारीपण अगदीं फुकट जायला आलें होतें, तोंच मामा माझ्या बाजूनें धांवले. " बरें का अप्पा, त्या काळीं सरदार-दरकदार, अमीर-उमराव, राजे-महाराजे, ही सगळीच मंडळी खुरमांड्या घालून बसायची. आजच्यासारख्या त्या काळीं इस्त्रीच्या विजारी नव्हत्या. मांडचोळणे हें त्या वेळचें नेसूंचें वस्त्र. त्यामुळें मांडचोळणी चोळवटून जायची भीति नाहीं. "

" अन् छत्रपतींच्या दरबारांत तर काय मजाच होती. त्यांचे कोंकणी दर्यावर्दी सरदार तर सरळ लंगोट्या लावून दरबारांत यायचे ! "

" हट् ! लंगोट्या लावून कसे येतील ? मामा तुमचें आपलें कांहीं तरीच ! " म्हणून मी थोडासा लाजलों. माझें पाहून बाकी पोरेंही तोंडावर हात ठेवून फिदीफिदी हंसूं लागलीं. हंसायचें नाहीं तर काय ! अहो, तो दरबार आहे ! कांहीं चेष्टा नव्हे महाराज ! मोठाले बाप्ये कोंकणांत नुसत्या लंगोट्या लावून हिंडतात, हें मीं पाहिलें आहे. पण दरबारांतहि तसेंच यायचें ! अन् मग उद्यां बाजारांतही हे लंगोट्या लावून येतील !

"अरे पण ! तूं काय लाजतो आहेस ! लंगोट्या लावून येणारे येत, त्यांना पाहणारे पाहात. त्यांना कोणाला लाज वाटत नसे. अन् तूं कां तुझी लाज उगीच खर्च करतोय्स ?" मामा हंसत म्हणाले.

मग मीं लाजणें बंद केलें. डाव्या हाताकडे बोट दाखवून मामा म्हणाले, "त्या खोऱ्यांतून गांधारी नदी वाहते. या सगळ्या रायगड खोऱ्याचें पाणी घेऊन ती समुद्राकडे धांवत असते. इकडून जाते गांधारी, अन् प्रतापगड खोऱ्यांतून येते सावित्रीं. या दोघींचा संगम होतो महाडजवळ. अन् एखाद्या वेळीं पावसाळ्यांत या दोघी तुडुंब भरल्या, म्हणजे महाडची जी मजा होते ! अरे सगळा गांव भरतो पाण्यानें. गांवांतून नावा चालायला लागतात ! आमच्या घरून ओकांच्या घरीं जायचें असेल तर पटकन् नावेंत बसायचें अन् जायचें. त्यांच्या घरून डॉ. चितळ्यांकडे जायचें तेंसुद्धां मजेंत होडी वल्हवत !"

"अन् बाजारांतून भाजी आणायची असेल तर ?" चिमण्यानें कुतूहलानें विचारलें.

"तीसुद्धां होडींतून ! एवढें का समजत नाहीं तुला ? अगदींच वेडेपणा करतोस तूं कधींकधीं !" मी चिमण्यावर फैर झाडली.

"अन् मग मामा, माशे धरायला दूर जावं लागत नसल ? अंगणांतच गळ टाकून बसलं कीं माशेच माशे !" रतननें तोंडाला सुटलेल्या पाण्याचा घोट गिळून विचारलें.

"अरे गळ तरी कशाला टाकायला पाहिजे ?" वगड्या उत्तरला, "ते मासे मुळीं घरांतल्या भाजीच्या टोपलींतच येऊन पडतात !"

आम्ही सगळे पहिला चढ चढूं लागलों. करवंदें चिक्कार पिकलीं होतीं खरीं पण आम्हांला लवकर जायचें असल्यानें आम्हांला तीं आंबट वाटलीं. दुतर्फा खूप खूप झाडें होतीं. आंबा, धावडा, चवणी, कोकंब, फणस अशीं किती तरी. मामा भराभर त्यांचीं नांवें सांगत होते. मी तीं नांवें माझ्या

स्मरणवहींत टिपूनही घेत होतों, पण ती स्मरणवहीच कुठें तरी हरवल्यानें आतां कांहीं इलाज नाहीं.

या पाळीला आमच्यांत दमणारे कोणी नव्हते. त्यामुळें भराभर आम्ही वर चढत होतों. मामा अन् चव्हाण गुरुजी सारखे कांहीं तरी बोलत होते. पण मधून मधून करवंदांची जाळी अगदीं जवळ वाटेंतच उभी राही. आम्ही कांहीं जाळीकडे जात नव्हतों. पण जर तीच मध्यें येऊं लागली तर मग काय इलाज उरला ?

यामुळें नाइलाजानें आम्हांला करवंदें काढावीं लागत. त्यामुळें मामा अन् चव्हाण पुढें जात. मग आम्ही एकमेकांना " अरे, तुला पळायला काय झालें ? " असें विचारीत पळत असूं. मामा आणि चव्हाण जी इतिहासाची चर्चा करीत ती आम्हांला ऐकायला मिळत नसे. एखादी चांगली गोष्ट कुणी सांगत असला तर ती ऐकावी, पुढें कधीं तरी उपयोग होतो. पण या पोरांना काय सांगावें !

अंदाजें मैलभर चढून गेल्यावर समोरून एक मावळा येऊन आम्हांपाशीं थांबला. आम्हांला पाहून तो म्हणाला,

" आवलसकरांनो ! आज मोटार लई लवकर आली जनूं ! कंदी उशीर करती, तर कंदी टाइमावर येती ! हे मोटार डाइवर लई खराब ! दारू पिऊन लास होत्यात, अन् मंग गाडी हांकत्यात ! "

मोटारच्या अनियमितपणावर एवढें व्याख्यान दिल्यावर तो थांबला. मामा म्हणाले, " अरे शिरपत, तूं येता दिसेनास, म्हणून मग निघालों झालों आम्ही. माझी चिठ्ठी पोहोंचली ना ? सगळी व्यवस्था केली आहे ना ?"

" व्हय तर ! सगळी येवस्था फसकिलास करून मंग तुमच्याकडं निघालों नव्हं का ! "

मग तोही आमच्याबरोबर परत फिरला. सबंध रस्ताभर पाऊलवाट होती. कधीं चढ कमी, तर कधीं अधिक. पण सगळा रस्ता बहुधा शेतांतून

अन् मुरुमाटींतून होता. साडेसहाच्या अंदाजांत आम्ही दोन चार शेतें मागें टाकून जरा मोकळ्यावर आलों, तो रायगडचे तट दिसायला लागले !

" तो पहा रायगड " गुरुजी म्हणाले.

आम्ही सगळ्यांनी गुपचूप एकमेकांना कळूं न देतां त्या पवित्र तीर्थाला नमस्कार केले. आतां थोड्याच वेळांत आपण रायगडावर असणार, या कल्पनेनें आम्ही सगळे आनंदून गेलों.

मामा डावीकडे हात दाखवून म्हणाले,

" हें गांव दिसतें ना डाव्या हाताला, तें पाचाड. इथें आईसाहेब जिजाबाई राहात असत. गडावरची थंड हवा त्यांना सहन व्हायची नाहीं म्हणून मग छत्रपतींनीं त्यांना इथें वाडा बांधून दिला. आतां कांहीं राहिलें नाहीं वाड्याचें. केवळ तट राहिले आहेत, अन् एक पडकी विहीर. गांवाच्या पलीकडे एका ओढ्याच्या कांठीं ती मायमाउली आपल्या समाधींत विश्रांती घेत्येय. जन्मभर जीं स्वप्नें तिनें पाहिलींन्, तीं अगदीं तिच्या डोळ्यांदेखत खरीं झालीं !

" म्हणून मोठ्या कौतुकानें हंसत हंसत तिनें प्राण सोडला ! गाढ झोपली आहे ती आतां. "

आदरानें आमचीं मस्तकें नम्र झालीं. मी म्हणालों,

" मामा, आपण जाऊं या ना वाडा अन् समाधी पाहायला ! "

" परत येतांना. आतां उशीर होईल. "

थोड्याच वेळांत आम्ही पाचाड मागें टाकून एका देवळापाशीं येऊन पोहोंचलों. एका छानदार सारवलेल्या अंगणांत आम्ही जाऊन उभे राहिलों.

" हितंच थांबायचं अवलसकरांनो ! " शिरपती म्हणाला. आम्हांला पाहिल्याबरोबर भराभर चार-सहा बारकीं लंगोटीं पोरें आमच्या शेजारीं येऊन उभीं राहिलीं.

मामा म्हणाले, " बरें का गड्यांनो ! आज रात्रीं इथेंच रहायचें. आम्ही

मोठी मंडळी रात्रींच गडावर जात असतों. पण तुम्ही मुलें आहांत अन् रात्र अधिक होईल, म्हणून आजची रात्र इथें घालवून उद्यां पहांटे लवकर उठा-वयाचें अन् झुंजूमुंजू झाल्याबरोबर निघून सूर्योदयाच्या आंत गड गांठायचा.

" आतां रात्रीं आपल्याला स्वयंपाक करायचा इथें. तर बगड्या, अप्पा, अन् रतन या तिघांनीं पाणी आणायचें. स्वयंपाकाचें कंत्राट मी आणि चव्हाण यांच्याकडे. बाकी पोरांनीं आमच्या हाताशीं असायचें. "

मी, बगड्या आणि रतन पाण्याचा हंडा घेऊन एका लंगोट्या पोरा-बरोबर झऱ्याकडे चालूं लागलों. झऱ्यावर पोहोंचल्यावर रतन हंडा भरूं लागला, अन् मी व बगड्या दोघेजण भोंवतालीं पाहूं लागलों.

संध्याकाळची वेळ होती. उन्हाचा ताप कमी होऊन मावळत्या सूर्याचीं किरणें आमच्यासमोर उभा असलेल्या रायगडावर पडलीं होतीं. खालीं रायगडखोऱ्याचा अर्धा भाग आमच्यासमोर पसरला होता.

मी म्हणालों, " बगड्या ! "

पण बगड्या बोलला नाही. तो रायगडाकडे पहात उभा होता. थोड्या वेळानें एकदम माझा हात धरून तो म्हणाला,

" अप्पा ! मला वाटतें, शाळाबिळा द्यावी सोडून ! कसलें कपाळाचें बीजगणित अन् भूमिति शिकण्यांत वेळ चालला आहे आपला ! जन्मांत कधीं उपयोग व्हायचा नाहीं त्या गणिताचा ! त्यापेक्षा हें गणित शिकावें. या मावळ्यांच्या प्रांतांत यावें. तसूं अन् तसूं जमीन पालथी घालावी. सगळ्या रानाची ओळख करून घ्यावी.

" आपल्याला धडे द्यायला हा रायगड उभा आहे. तो प्रतापगड आहे. या सगळ्यांकडून शिकतां येईल तितकें शिकावें. ते आपल्याला आपल्या पूर्वींच्या वैभवाच्या गोष्टी सांगतील, त्या सगळ्या ऐकाव्यात. अन् मग शरीर काटक बनलें म्हणजे सैन्यांत शिरून आपल्या या सोन्यासारख्या देशाला तें वैभव पुनः मिळवून देण्यासाठीं लढावें ! "

आतां काय करावें या बगड्याला ! चांगलें छान शिकणें सोडून देऊन याला भिकेचे डोहाळे सुचले हे ! अहो, जर हा शाळा सोडून इकडे निघून आला, तर मग बंडोपंत मला कांहीं जिवंत ठेवायचे नाहींत ! म्हणतील, " तूंच रायगडला नेऊन माझा पोरटा बिघडवलास ! "

मग बगड्याला ' हो, हो ' करीत कसा तरी पाण्याचा हंडा घेऊन आम्ही परत फिरलों. मामांना अन् गुरुजींना गुपचूप हें सगळें सांगायचा विचार होता माझा, पण मग वेळच मिळाला नाहीं.

मामा अन् चव्हाणांनीं भात-पिठलें बनवलें, आणि आम्ही सगळे पत्रावळीवर तें जेवते झालों. थोडें थकून गेलों असल्यामुळें त्या अंगणांत आपापल्या चादरींत गुंडाळून पडल्यावर आम्हांला केव्हा झोंप लागली, तें कांहीं कळलें नाहीं. म्हणून मग मामा आणि चव्हाण काय बोलत होते, तें आम्हीं ऐकलें नाहीं.

पहांटेच्या गार वाऱ्यांत हातांपायांची मुटकुळी करून एकमेकांच्या आसऱ्यानें आम्ही पडलों होतों. तोंच मामांनीं हांका मारून आम्हांला जागे केलें. थोडी थंडी वाजत असल्यानें उठावेंसें वाटेना. मामांच्या हांका सुरू होत्या, अन् " मी जागा आहें मामा ! " अशीं उत्तरें देत मी परत डोळे मिटून घेत होतों. शेवटीं जेव्हां बगड्यानें माझें पांघरूण ओढून मला उघडें केलें तेव्हां बरीक त्याच्यावर चरफडत मी उठून बसलों.

चव्हाण म्हणाले, " ऐकलेंत अप्पा, बगड्या ! आपापले तांब्ये भरून घेऊन आतां निघायचें. प्रातर्विधि वाटेंत उरकायचे. चला ! "

मग अंधारांतच एका हातीं तांब्ये, दुसऱ्या हातीं काठ्या, अन् पिशव्या खांद्यावर अडकविलेल्या, अशा थाटांत आमची पलटण ठेंचा खात शिरपतीच्या मागें निघाली. त्यानें डोक्यावरच्या पाटींत आमचा गडावरचा शिधा घेतला होता.

थोडें दूर गेल्यावर मग मामा म्हणाले, " इथें थांबा सगळे. चहूंकडे मोकळें

रान आहे, उरकून घ्या पहांटचें कार्य. ”

दहा मिनिटांत आम्ही परत आलों. आतां थोडेंथोडें दिसूं लागलें होतें. आमच्यासमोर एक अपूर्व शोभा उभी होती. खालच्या खोऱ्यावर निळसर धुकें पसरलें होतें, अन् त्या धुक्यांतून वर आल्यासारखा रायगड डौलानें आम्हांला बोलावीत होता !

“ जसा कांहीं ताकांतून डोकें वर काढणारा लोण्याचा गोळा ! ” शिदू माळी पहिल्यांदा बोलला.

आम्ही मोठ्या उत्साहानें भराभर पावलें उचलीत पाचाड मागें टाकूं लागलों. आमच्या डाव्या हाताला एक भला उंच डोंगर होता. त्याच्या सरळ लांबवर तुटलेल्या कड्याखालून आमची वाट चालली होती. रस्त्यांत मोटमोठाले दगड पसरले होते. त्या दगडांवर पाय देत आम्ही पुढें चाललों होतों.

मी म्हणालों, “ मामा, याच वाटेनें अनेक वेळां शिवाजीमहाराज गडावर चढले असतील, नाहीं ? ”

“ हो; हीच ती वाट. औरंगजेबाचें सैन्यही याच वाटेनें रायगडावर चालून गेलें होतें. ”

एका इतिहासप्रसिद्ध वाटेनें आम्ही जात असल्याची ही जाणीव झाल्यावर तर आम्ही नुसते हुरळून गेलों. मला एका गाण्याचें एक कडवें आठवलें, तें मी म्हणूं लागलों.

**शिलेदार आम्ही शिवबाचे । रणांगणीं झुंजायाचे ॥**

माझें कडवें सगळ्या फौजेला फारच आवडलें. म्हणून सगळेजण माझी साथ करूं लागले. मग काय ! जणूं काय भजनच सुरू झालें ! आमच्या काठ्या तालांत जमिनीवर आपटूं लागल्या. सगळा डोंगर आम्ही मोठ-मोठ्यानें आरडून गर्जवून सोडला.

तोंच आमचा एक शिलेदार दत्तू फणसाळकर ठेंच खाऊन पडण्याच्या बेतांत आला. चव्हाण म्हणाले,

" अहो शिलेदार ! काय घोड्यानें फेकून दिलें का ? "

ती घोड्याची कल्पना येतांक्षणींच आम्ही सगळे बेहद्द खूष झालों. काय मजा झाली असती ! सोनगांवला कुशाबा पाटलाचें एक उमदें घोडें होतें, त्यावर पाटलांच्या मुलाच्या म्हणजे मारुतीच्या कृपेनें आम्ही कधीं कधीं बसत असूं. एक-दोन वेळां त्या घोड्यानें उगीच गंमतीनें मला पाडलेंही होतें. तें घोडें जर आतां इथें असतें, तर उधळत उधळत त्याला चौखूर पळवीत मी सगळ्यांच्या आधीं रायगडावर पोहोंचलों असतों !

आम्हा सगळ्यांनाच जर घोडीं असतीं तर !– आम्ही घोडीं फेकीत एखाद्या मावळी सैन्यासारखे मुंडाशीं बांधून गडावर जाऊन दाखल झालों असतों ! दरवाजांत पहारेकऱ्यानें आम्हांला अडविलें असतें, तर आम्ही त्याला म्हणालों असतों : " एः ! अडवतोस काय आम्हांला ? आम्ही सोनगांवकर शिलेदार आहोंत ! ओळखत नाहींस आम्हांला ? चल बाजूला हो. आम्हांला छत्रपतींच्या दर्शनाला जायचं आहे. "

मग तो चपापून म्हणता, " सोनगांव कोणतें ! पुण्याशेजारचें का ? "

" हो ! " आम्ही ताठ्यानें छात्या वीत वीत फुगवीत म्हणालों असतों.

" तर मग जाऊं द्या घोडीं ! " तो म्हणाला असता !

तात्पर्य असें कीं, आमचें सोनगांव हें इतकें प्रसिद्ध आहे.

अशा कल्पनांच्या रंगांत दंग होतों, तों आम्ही रायगड आणि मघां सांगितलेला डोंगर, यांच्यामध्यें असलेल्या खिंडींत पोहोंचलों. मल्या थोरल्या धोंडीवरून चढत थोड्याच वेळांत आम्ही खिंडीच्या माथ्यावर जाऊन दाखल झालों.

खिंडीच्या पलीकडे एक गांव दिसत होतें, त्याकडे बोट दाखवून मामा म्हणाले, " तें छत्री निजामपूर ! "

तें नांव ऐकून आम्हांला बरीच गंमत वाटली. त्यावर आपसांत थोडीशी चर्चा करून झाल्यावर मग मी म्हणालों,

" म्हणजे काय मामा ? "

" सांगतों. त्याचें असें झालें– " एवढें म्हणून मामांनीं आपली चंची बाहेर काढली. तींतून एक सुपारी काढून ती कातरीत ते म्हणाले,

" एकदां छत्रपति शिवाजीराजे टकमक टोंकावर उभे होते. त्यांच्या डोक्यावर छत्री धरून त्यांचा हुजऱ्या उभा होता. छत्रपति खालच्या प्रदेशाकडे पहात होते. तोंच खूप जोराचा वारा आला, अन् त्या छत्रींत भरला.

" त्या वेळच्या छत्र्या कांहीं आजच्याइतक्या स्वस्त आणि नाजूक नसत. ती छत्री भली मोठी होती. वारा भरल्याबरोबर ती जी वर उडाली आकाशांत ! हुजऱ्याही उडाला तिच्याबरोबर !

" छत्रपति ओरडले, ' अरे ! घट्ट धर छत्रीचा दांडा ! घाबरूं नकोस ! ' दुसरें कांहींच करण्यासारखें नव्हतें. सगळेजण दुःखानें ती छत्री अन् तो हुजऱ्या, यांच्याकडे पहात होते ! थोड्या वेळानें वाऱ्याचा जोर कमी झाला, अन् ती छत्री अन् तो हुजऱ्या, अशीं दोघें या निजामपुराजवळ खालीं उतरलीं !

" एकूण अठ्ठावीसशें एकावन्न फूट, एवढ्या उंचीवरून एका नुसत्या छत्रीच्या साहाय्यानें मारलेली ती पहिली उडी होती !

" तेव्हांपासून त्या गांवाला ' छत्री निजामपूर ' हें नांव पडलें आहे. आतां उजव्या हाताला आपण वळलों कीं रायगड सुरू झाला ! "

## अभ्यास

१. छत्रपतींच्या वेळच्या सरदारांच्या पोशाखाचें तुम्हांला आणखी वर्णन करतां येईल का ? येत असेल तर करा.

२. झाडांच्या किती जातींचीं नांवें तुम्हांला सांगतां येतील ?

३. तुम्हांला शाळेंत जे विषय शिकविले जातात, त्यांच्याविषयीं तुमचें काय मत आहे ?

# किले रायगड

**परिचय** चढाला सुरुवात होते. वाटेंतील ठिकाणें पहात आणि त्यांच्या-विषयींची माहिती ऐकत हे मैतर रायगडच्या महादरवाजाजवळ जाऊन पोहोंचतात. तिथें मामा त्या मुलांच्या समोर रायगडचा तेजस्वी इतिहास उभा करतात.

उजव्या हाताला थोडें चढून गेल्यावर आम्हांला एक खूप मोठी पाटी दिसली. तीवर लिहिलें होतें,

**'किले रायगड'**

तर मग एकूण आम्ही खरोखरच रायगडच्या पायथ्याशीं उभे होतों! कारण पाटीवर तसें लिहिलेंच होतें. कुठें कधीं लिहिलेलें असल्याखेरीज माझा त्याच्यावर विश्वास बसत नाहीं. लहानपणीं एकदां आई म्हणाली, "अप्पा, ऊठ. सकाळ झाली."

पण त्या गोष्टीवर माझा कांहीं विश्वास बसेना. मी आईला म्हणालों, "तसें लिहिलें आहे का कुठें?"

शेवटीं आईनें माझें पहिलीचें पुस्तक आणून त्यांतला धडा माझ्यासमोर धरला. त्यांत लिहिलें होतें,

"रामू, ऊठ, सकाळ झाली. हा पहा दूधवाला आला."

मग मात्र मी पटकन् उठून दुधाकरतां भांडें घेऊन दाराशीं आलों. आतां बगड्या असें म्हणतो कीं, लिहिलेलें सगळें खरें नसतें. तो मला नेहमीं एक

## अभ्यास

१. छत्रपतींच्या वेळच्या सरदारांच्या पोशाखाचें तुम्हांला आणखी वर्णन करतां येईल का ? येत असेल तर करा.

२. झाडांच्या किती जातींचीं नांवें तुम्हांला सांगतां येतील ?

३. तुम्हांला शाळेंत जे विषय शिकविले जातात, त्यांच्याविषयीं तुमचें काय मत आहे ?

# किले रायगड

परिचय

चढाला सुरुवात होते. वाटेंतील ठिकाणें पहात आणि त्यांच्या-विषयींची माहिती ऐकत हे मैतर रायगडच्या महादरवाजाजवळ जाऊन पोहोंचतात. तिथें मामा त्या मुलांच्या समोर रायगडचा तेजस्वी इतिहास उभा करतात.

उजव्या हाताला थोडें चढून गेल्यावर आम्हांला एक खूप मोठी पाटी दिसली. तीवर लिहिलें होतें,

'किले रायगड'

तर मग एकूण आम्ही खरोखरच रायगडच्या पायथ्याशीं उभे होतों! कारण पाटीवर तसें लिहिलेंच होतें. कुठें कधीं लिहिलेलें असल्याखेरीज माझा त्याच्यावर विश्वास बसत नाहीं. लहानपणीं एकदां आई म्हणाली, "अप्पा, ऊठ. सकाळ झाली."

पण त्या गोष्टीवर माझा कांहीं विश्वास बसेना. मी आईला म्हणालों, "तसें लिहिलें आहे का कुठें?"

शेवटीं आईनें माझें पहिलीचें पुस्तक आणून त्यांतला धडा माझ्यासमोर धरला. त्यांत लिहिलें होतें,

"रामू, ऊठ, सकाळ झाली. हा पहा दूधवाला आला."

मग मात्र मी पटकन् उठून दुधाकरतां भांडें घेऊन दाराशीं आलों. आतां बगड्या असें म्हणतो कीं, लिहिलेलें सगळें खरें नसतें. तो मला नेहमीं एक

जाहिरात दाखवतो. तिच्यांत लिहिलें आहे, "आमचें शक्ति–मिळणामृत घेऊन पंधरा दिवसांत हनुमानासारखे शक्तिशाली बना." बगड्या म्हणतो, कीं लिहिलेलें जर सगळें खरें असतें, तर मग सगळेच पेद्रु पहिलवान हें औषध घेऊन मारुती झाले असते !

पण बगड्याला माझें मत खोडून काढायची वाईट संवय जडली आहे. अस्तु ! तर आम्ही रायगडाच्या पायथ्याशीं उभे आहोंत याविषयीं त्या पाटीमुळें माझ्या मनांत मुळींच संशय उरला नाहीं.

त्या पाटीवर आणखी खूपसें लिहिलें होतें. पण पुढें मी तें सगळें सांगणारच आहें. आतां मात्र आम्हां सगळ्यांना खूप हुरूप आला. आम्ही सगळे सकाळच्या त्या थंड वेळीं भराभर उड्या मारीत गड चढूं लागलों.

पण थोड्याच वेळांत मामा आम्हांला म्हणाले,

"ए पोरांनो ! थांबा, 'चितदरवाजा' आला."

आम्ही चहूंकडे पाहूं लागलों. पण आम्हांला दरवाजा तर काय पण एखादें लहानसें फळकूट नाहीं तर खिळाही दिसेना ! मामा म्हणाले,

"गडबडून जाऊं नका. या ठिकाणीं 'चितदरवाजा,' या नांवाचा एक दरवाजा होता. आतां त्याचें कांहींही राहिलें नाहीं. कुणाच्या तरी तोफांच्या भडिमारापुढें दरवाजा मातींत मिळून गेला. ही पहा चितदरवाजाची पाटी."

पाटी पाहिल्यावर मग मात्र आमचा विश्वास बसला. त्या नसलेल्या दरवाजाच्या उंबरठ्यावरून पलीकडे उड्या मारीत आम्ही पुढें चाललों, तों दुसरी एक पाटी लागली. तीवर लिहिलें होतें, "खूब लढा बुरूज."

मामा म्हणाले, "रायगडांतला हा एक अत्यंत महत्त्वाचा बुरूज. गडावर जायची हीच एक वाट. ही एवढी अडवली, कीं मग गडावर कुणाचा प्रवेश व्हायचा नाहीं. म्हणून हा जो पडका बुरूज दिसतो, यावर निवडक माणसें ठेवलेलीं असायचीं. अगदीं प्राणांची पर्वा न करणारीं.

"मग कुणाचा गडावर हल्ला आला, तर त्याला प्रथम त्या खडकावर

टक्कर घ्यावी लागे. इथें त्यांना शर्थीची झुंज द्यावी लागे. या पोलादी मावळ्यांचे तडाखे सहन करावे लागत. अन् यांतून जगून-वांचून पुढें गेले, तर मग पुढली बात.

" म्हणून याचें नांव ' खूब लढा बुरूज. ' तुम्ही उभे आहांत, नेमके तिथेंच अनेक वेळां खूप रक्त सांडलें आहे. "

मी पटकन् माझे दोन्ही पाय वर उचलायचा प्रयत्न केला. उगीच लोकांच्या रक्तावर पाय कशाला द्यावेत ? पण तें कांहीं बेटें जमलें नाहीं. मग मी खालीं पाहूं लागलों. तों खालची माती कांहीं तांबडी दिसेना ! मी मामांना म्हणालों,

" मामा, मग इथें माती लाल कशी झाली नाहीं ? "

मामा हंसून म्हणाले, " अरे, त्या गोष्टीला आतां दीडशें वर्षं होऊन गेलीं. दीडशें वर्षं रंग कसा राहील ? "

यावर मग कांहीं न बोलतां आम्ही पुढें चालूं लागलों. कधीं वाट डोंगराच्या उजवीकडून तर कधीं डावीकडून जाई. मध्येंच मुख्य डोंगराला अन् अलीकडच्या डोंगराला जोडणारी एक अगदीं चिंचोळी पुलासारखी वाट लागली. अगदीं जपून आपले जीव सांभाळीत पलीकडे गेल्यावर आम्ही शूरपणें मागें वळून पाहूं लागलों.

सूर्य उगवायला आल्यामुळें खालचीं खेळांतल्या घरांसारखीं घरें अन् भाताच्या सुड्या स्पष्ट दिसूं लागल्या. गुरें रानांत निघालीं होतीं. खेळांतल्या कांचेच्या गाईएवढालीं तीं अगदीं लहान लहान दिसत होतीं.

आतां रायगडचा डोंगर आमच्या उजव्या हाताला होता. वाटही पायऱ्यांची होती. त्यावर उड्या मारीत चढत आम्ही पुढें निघालों. कधीं वाट वाळलेल्या गवतामधून जायची. कधीं खडक चढावा लागे. कधीं तुटक्या पायऱ्या असत. कधीं दुतर्फा दाट झाडींतून वाट पळे

कांहीं वेळ या वाटा पायाखालून दवडल्यावर मग उजव्या हाताला

मोठा कडा अन् डाव्या हाताला खोल दरी लागली. मी सगळ्या गड्यांना म्हणालों,

"सांभाळा रे ! नाहीं तर एका मिनिटांत सरळ खालीं उतरायचेत !!" बगड्या नाक मुरडून म्हणाला,

"अप्पा, अरे चांगलें बोलावें ! भलतेंच काय बोलतोस ?"

बगड्यानें सुरुवात करायची, अन् मग इतरांच्या फैरी झडायच्या हें तर ठरलेलेंच आहे. "शुभ बोल नाऱ्या !" इत्यादि सगळ्या म्हणी म्हणून झाल्या. बरें झालें, कीं मी पक्का ( × × × ) आहें. नाहीं तर दुसरा एखादा पळून जाता.

त्या कठीण वाटेनें प्रत्येकाला हुश्शार अशा आरोळ्या देत जात असतां वाटेंत एक गुहेसारखें कांहीं तरी लागलें. माझ्यांतला इतिहाससंशोधक जागा झाला. मी पटकन् थांबून कमरेवर हात ठेवून त्या गुहेचें निरीक्षण करूं लागलों.

माझ्या कल्पनेप्रमाणें ही गुहा फार जुनी असावी. चिमण्यानेंही इतिहास-संशोधकी करायचें ठरविलें. तो म्हणाला,

"अप्पा, भीमानें गदा मारली असेल, अन् ही गुहा झाली असेल."

पण इतिहास-संशोधकाने एवढ्या जुन्या काळांत दडी मारणें त्याच्या ब्रीदाला शोभण्यासारखें नव्हतें. म्हणून मीं चिमण्याचा निषेध करून असें ठरविलें कीं, शिवाजीमहाराजांच्या पूर्वीं कुणी तरी दरोडेखोरानें ही गुहा केली असावी. मग छत्रपतींनीं त्या दरोडेखोराशीं युद्ध करून त्याच्याकडून ही गुहा घेतली असावी. पुढें मग या गुहेचें रक्षण करण्याकरतां महाराजांनीं रायगड बांधला असावा.

पण मामांनीं माझ्या या संशोधनावरून पाणी फिरविलें. ते म्हणाले,

"अरे कुठें आहे गुहा ? गुहा नाहीं ती. पावसाचें पाणी पडपडून खालचा मुरुमाड खडक झिजून गेला आहे. म्हणून गुहेसारखें तें छिद्र गेल्या

पन्नास पाऊणशें वर्षांत तयार झालें आहे."

स्वत: मामांनींच सांगितल्यामुळें मी माझा शोध मागें घेतला. आमचा थवा पुढें चालला. वाट अगदीं चिंचोळी अन् खराब होती. पण मामा म्हणाले, "तीनशें वर्षांपूर्वीं याच वाटेनें हत्ती वर चढत होते! छत्रपतींच्या राज्यारोहणाच्या वेळीं छत्रपतींची मिरवणूक हत्तीवरून निघाली होती."

हें ऐकून आम्हांला फार आश्चर्य वाटलें. हत्ती वर कसे चढत असतील, याचा आम्ही विचार करूं लागलों. दत्तू फणसाळकर म्हणाला,

"नाहीं तर पॅरॅशूटच्या टोंकाला हत्ती बांधून त्यांना विमानांतून रायगडावर उतरविलें असावें."

पण त्या वेळीं विमानेंच कुठें होतीं? मग आम्ही सगळ्यांनीं मिळून दत्तूची खूपच थट्टा केली. आतां ती सगळी इथें देत नाहीं.

चढ मात्र अधिकाधिक कठीण होऊं लागला. कुठें कुठें खडकांतून पायऱ्या खणून काढल्या होत्या, तर कुठें दगडी पायऱ्या करून बसविल्या होत्या. त्या दगडी पायऱ्यांची अशी कांहीं दुर्दशा व्हायला लागली होती!

मध्येंच थांबून खालच्या बाजूला बोट करून मामा म्हणाले,

"बरें का अप्पा, आपला रस्ता सोडून खालच्या बाजूला एक दरवाजा आहे त्याचें नांव 'नाना दरवाजा.' निजामपुराकडून यायचें झालें कीं तो दरवाजा लागतो. त्याच्याजवळ दोन-तीन खडकांत कोरलेल्या गुहा आहेत."

तो दरवाजा पाहून यावें, असें आम्हांला वाटूं लागण्याच्या आंतच आमच्यांतले बहुतेक त्या दरवाजाला विसरून गेले.

आतां आम्ही थोडे थकूं लागलों होतों. तोंच चव्हाण गुरुजी म्हणाले,

"काय शिलेदार! कुणी दमला नाहीं ना तुमच्यांतला?"

गुरुजींनीं अगदीं आमच्या मर्मावरच घाव घातला. पण आम्ही कसचे! लगेच हंसरीं तोंडें करून त्यांना म्हणालों, "छे छे गुरुजी!"

"अजून याच्या पांचपट असला रायगड चढून जाऊं!" मी घाम

पुशीत धापा टाकीत म्हणालों.

" अहो वीर ! कळली तुमची बहादुरी ! अगदीं जीव जायला आला, तरी तुम्ही कबूल करायचे नाहींत. बसा आतां खालीं. मी जरा चंची–साधना करतों. " असें म्हणत मामा खालीं बसले, अन् त्यांनीं चंची उघडली.

मग काय ! नको नको म्हणत आम्ही सगळेच खालीं बसलों. मामांनीं सांगितलें कीं, आतां ' महादरवाजा ' अगदीं जवळ आहे. हें ऐकून मात्र आमचीं तोंडें जरा प्रसन्न झालीं. परत चालूं लागल्यावर दहा मिनिटांच्या आंत आम्ही ' महादरवाजा 'च्या समोर जाऊन उभे राहिलों !

मामा म्हणाले,

" हा रायगडचा महादरवाजा ! सिंहाच्या गुहेचें प्रवेशद्वार ! ज्या दारांतून आंत शिरतांना दुष्टांच्या अंगाचें पाणी पाणी व्हायचें, बदमाष भीतीनें मरायला टेकायचे, नीचांचे प्राण अगदीं गळ्यांत येऊन थांबायचे, तें हें महाद्वार ! "

आदरानें अगदीं लवून जाऊन हळूहळू आम्ही त्या महादरवाजांत जाऊन उभे राहिलों ! भला उंच खूप मजबूत दरवाजा. त्याच्या फळ्यांना केवढाले तरी मनगटांसारखे अणकुचीदार खिळे. तो दरवाजा उघडायचा आणि लावायचा म्हटलें, तरी आमच्यासारखीं आठदहा पोरें लागायचीं !

मामा म्हणाले,

" गड्यांनो ! हा दरवाजा नीट पाहून घ्या. बोलतां आलें तर बोला याच्याशीं. तुम्ही विचाराल हा दरवाजा कसा बोलेल ? पण त्याची बोलायची एक भाषा आहे, ती भाषा जर तुम्हांला कळली तर मग हा दरवाजा धडाधडा बोलूं लागेल तुमच्याशीं एखाद्या पंडितासारखा ! हा उदासवाणा दरवाजा– त्याचे उसासे ऐकूं येतील तुम्हांला. तो आपलीं आंसवें टिपतांना कधीं कधीं त्याचा एखादा बारीकसा हुंदकाही पडेल तुमच्या कानीं.

" तुम्ही विचाराल, कीं याला उदास व्हायला झालें काय ? साधा लांकडी अन् दगडी दरवाजा हा. त्यानें उदास कशाला व्हावें ?

" गड्यांनो, तुमचा प्रश्न अगदीं बरोबर आहे, कारण या दरवाजानें जें कांहीं पाहिलें आहे, तें तुमच्या कधीं स्वप्नांतसुद्धां आलें नसेल. मग तुम्हांला याच्या दुःखाची काय कल्पना येणार ?

" सांगूं यानें काय पाहिलें आहे ? "

" हो हो मामा ! जरूर सांगा. " बावरून गेलेला बगड्या एखाद्या अधाशासारखा म्हणाला. आम्हीही सगळे तें दरवाजाचें गाणें ऐकायला उत्सुक होतों, म्हणून मामांच्या तोंडाकडे पहात उभे राहिलों.

दरवाजाकडे पाठ करून मामा उभे राहिले. ते कुणीकडे तरी पहात होते. त्यांच्या हातांत अडकित्ता आणि सुपारी होती, पण ते अडकित्त्यानें सुपारी फोडीत नव्हते. ती सुपारी मोठ्या ऐटीनें अडकित्त्याच्या डोक्यावर चढून बसली होती.

मामांनीं सुरुवात केली,

" गड्यांनो ! या दरवाजानें मोगलाई पाहिली, अंदाधुंदी पाहिली, बेबंदशाही पाहिली. त्या वेळीं हा उदासवाणा त्याच्या खऱ्या मालकाची वाट पहात उभा राहिला होता.

" मग एके दिवशीं रोजच्याप्रमाणें सूर्य उगवला. पण आजचा सूर्य निराळा होता. आजचें तेज निराळें होतें. थोड्या वेळानें पक्षी आनंदानें किलबिल करीत याच्याजवळ आले, आणि त्यांनीं त्याच्या कानांत हळूच बातमी सांगितली कीं,

" तूं ज्याची वाट पाहतोस, तो आज येणार आहे !

" दरवाजाला क्षणभर तें खरेंच वाटेना. त्याला वाटलें, एवढें चांगलें कसें होऊं शकेल ? तरी पण खरोखरच तेवढें चांगलें झालें. या दरवाजानें त्याचा खरा धनी दहावीस मावळ्यांसह एका काळ्या उंच घोडीवर बसून येतांना पाहिला !

" तो धनी आला. या दरवाजाजवळ थांबला, त्यानें आपला प्रेमानें



ओथंबलेला, आपुलकीनें भरलेला हात हळूच या दरवाजाला लावला! खळ्दिशी या दरवाजाच्या दोन सुटावलेल्या बारीक दगडी कपच्या गळून पडल्या !

" मावळे म्हणाले, ' महाराज ! बाजूला व्हा ! दरवाजा पडतो ! ' "

" नव्हे रे !" महाराज कौतुकानें हंसत म्हणाले, " दरवाजा आनंदानें रडतो ! त्याचीं आंसवें आहेत हीं ! "

" अन् मग या दरवाजानें सगळी दख्खनची दौलत रायगडावर येतांना पाहिली. दख्खन दरिद्री देश. पण ' दख्खनची दौलत ' पृथ्वीच्या मोलाची. आपल्या देशाकरितां प्राणांवर उदार झालेले मावळे वीर, हीच दख्खनची दौलत.

" रायगडावर तानाजी आला, बाजी फासलकर आला, नेताजी आला, बाजी देशपांडे आला, मुरारजी आला, अण्णाजी दत्तो आले, मोरोपन्त पिंगळे आले, कंक आले, शेलार आले, घोरपडे आले, निंबाळकर आले, जाधव आले—

" सगळ्या दख्खनचे ते मोत्याचे दाणे रायगडांत शिरतांना याच दरवाजानें त्यांना आंत घेतले.

" अनेक वेळां स्वतः शिवछत्रपति आपल्या काळ्या घोडीवर बसून अनेक मोहिमांनंतर स्वतः गेलेले, अन् त्या मोहिमांत यशस्वी होऊन परत आलेले याच दरवाजानें पाहिले !

" त्यानंतर या रायगडावर महाराजांनीं आपल्याला अभिषेक करून घेतला ! या देशाचे खरे मालक या देशावर राज्यही करूं शकतात, अभिषेकही करून घेऊं शकतात, हें जगाला दाखविण्याकरितां छत्रपतींना तो सगळा खटाटोप करावा लागला.

" त्या वेळीं तर काय ! नाना प्रकारची सामग्री या दरवाजानें वर चढविली ! लक्षावधि रुपयांचें सोनें, हिरे, मोतीं, घोडे, हत्ती, सात पवित्र

नद्यांचें पाणी, समुद्रकांठची वाळू, मोठमोठे विद्वान् पागोटीवाले पंडित, रथी, महारथी, वीर, नाना राज्यांचे वकील या दरवाजानें आंत घेतले !

" रुमालानें हात बांधून छत्रपतींना मुजरा करणारा इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन आणि नारायण शेणवीही याच दरवाजानें आंत घेतला.

" भला मोठा नजराणा घेऊन अदबीनें या गडावर आलेला गोवळ-कोंड्याचा वकील याच दरवाजांतून आंत शिरला.

" आणि मग सहस्रावधि माणसें नटून आपापल्या तरवारी सांभाळीत त्या वेळीं गडावर आलेलीं याच दरवाजांतून आंत शिरलीं.

" राजांच्या दातृत्वानें संतुष्ट होऊन खूप मोठमोठ्या दक्षिणा घेऊन अनेक ब्राह्मण याच दरवाजानें बाहेर पडले. पक्वान्नें खाऊन पोटें भरलेले अनेक गोरगरीब राजांना अनंत आशीर्वाद देत याच दरवाजांतून बाहेर आले.

" आईसाहेब जिजाबाई आनंदानें अगदीं भरून जाऊन अभिषेकानंतर डोळ्यांतून आनंदाचीं आंसवें वहावत पाचाडला जाण्यासाठीं याच दरवाजानें पालखींत बसून बाहेर पडल्या.

" याच दरवाजानें अनेकदां देशाची चिंता, विश्वाची चिंता करणारा तो बैरागी आंत घेतला. रामदास स्वामी अनेकदां गड चढून आल्यावर या दरवाजांत विश्रांतीकरितां बसले असतील !

" आणि शेवटीं औरंगाबादच्या खजिन्यावर वाघासारखी झडप घालून तो खजिना बरोबर घेऊन छत्रपति या किल्ल्यांत आले त्यांना याच दरवाजानें आंत घेतलें. परत छत्रपति बाहेर गेलेच नाहींत !

" त्यानंतर रागानें भडकलेले संभाजी राजे याच दरवाजांतून गडांत शिरले.

" त्यांच्या मरणानंतर फितूर सूर्याजी पिसाळानें याच दरवाजांतून मुकर्रबखानाला आंत घेऊन दख्खनची लाज महाराणी येसूबाई आणि बाळराजे शाहू यांना त्यांच्या स्वाधीन केलें ! येसूबाईसाहेबांनीं खानाबरोबर

जातांना याच दरवाजाच्या कानांत " येत्यें हं ! " असा निरोप आंसवें पुशीत सांगितला असेल !

" त्यानंतर स्वराज्याची चिंता करीत रात्रंदिवस मोगल सेनेशीं पाठशिवणीचा खेळ खेळणारा ' तो आधुनिक भरत '—राजाराम— याच दरवाजांतून अनेकदां आंत—बाहेर आला—गेला आहे.

" धन्याच्या जिवावरून आपल्या प्राणांची कुरवंडी करणारा खंडोबल्लाळ याच दरवाजानें अनेक वेळां आंत घेतला आहे.

" मोगलांच्या घोड्यांना पाणी पिऊं न देणारे, औरंगजेबाच्या तंबूचे कळस कलम करून आणणारे धनाजी, संताजी आपल्या रुंद मिशांना पीळ भरीत अनेकदां याच दरवाजांतून आंत शिरले आहेत.

" त्या पडत्या काळीं जिवाची शर्थ करून पोटापाण्याची चिंता न करतां स्वराज्याकरितां आपले मोलाचे प्राण कुठेंही खर्च करायची तयारी असलेलीं अनेक माणसें याच दरवाजाचा उंबरठा ओलांडून आंत आलीं आहेत.

" शाहू छत्रपतींच्या काळीं दोन-चार वेळां रणधुरंधर बाजीराव पेशव्यांनाही या दरवाजानें आंत घेतलें आहे.

" मग परत एकदां काळ बदलला. या देशाच्या धन्यांत भांडणें सुरू झालीं ! जो तो आपापल्या स्वार्थापुढें देशाच्या हिताचा विचार करीनासा झाला ! प्रत्येकजण आपल्या पोळीवर तूप ओढण्यासाठीं देशाचें हित इंग्रजांना विकायला निघाला !

" आमच्या या देशाचें कल्याण व्हावें, अशी इच्छा इंग्रजांच्या मनांत कधींच नव्हती. एक दिवस त्यांचें सैन्य किल्ल्याला गराडा घालून बसलें.

" त्यांचें सैन्य म्हणजे कांहीं सगळे गोरे नव्हते ! उलट बहुतेक सगळी भरती याच अभागी देशांतली.

" त्या सैन्यानें या किल्ल्यावर तोफा डागायला प्रारंभ केला. तोफ लागू

पडेना ! सगळे उपाय थकले. शेवटीं याच आईचा एक निमकहराम मुलगा त्यांना खुणेची जागा दाखवायला निघाला !

" शेजारच्या डोंगरावर तोफा चढविल्या गेल्या, अन् मारा अचूक लागूं पडला ! गडावरच्या दारूखान्यावर तोफेचा गोळा येऊन आदळला ! सगळा भडका उडाला ! इंग्रजांच्या तोफांनीं राजवाडा, दरबार, मनोरे, कांहीं-कांहीं म्हणून शिल्लक ठेवलें नाहीं ! सगळें पार मातींत मिळवून दिलें !

" नंतर मग इंग्रज मोठ्या डौलानें याच दरवाजानें आंत शिरले. त्यांनीं गडावर स्वच्छंद डुलणारें भगवें निशाण फरफर खालीं ओढलें, आणि एका कोपऱ्यांत फेंकून दिलें ! त्यानंतर इंग्रजांचा ' युनियन-जॅक ' दिमाखानें फडकून जगाला सांगूं लागला कीं,

" फूट, देशद्रोह, स्वार्थ, विश्वासघात, यांची पेरणी केली कीं परतंत्रता नांवाचें पीक येत असतें. अशा ठिकाणीं मी डौलानें फडकूं लागतों ! "

" मग इंग्रजांनीं आपल्या त्या काळ्या सैनिकांकरवीं गडावरच्या राहिल्या-साहिल्या इमारतीही पाडून टाकल्या !

" बरोबरच केलें त्यांनीं. अशा दुर्दैवी देशाला काय करायच्या आहेत इमारती ? कशाला हवींत स्मृतिचिन्हें ? कशाला हवा इतिहास ? कशाला पाहिजेत पूर्वींच्या वैभवाच्या आठवणी ?

" इंग्रजांनीं अगदीं बरोबर केलें ! तेंच करायला पाहिजे होतें त्यांनीं ! "

मामा थांबले. त्यांनीं त्यांच्या पापण्यांशीं जमलेलें पाणी हळूच बोटानें पुसून टाकलें. आम्ही सगळे वेड्यासारखे त्यांच्याकडे पाहात राहिलों !

## अभ्यास

१. लिहिलेलें असल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवायचा नाहीं, यामुळें अप्पाची झालेली एखादी नवीन फजिती रचून सांगा.

२. आपल्या देशांत कुठेंही कांहीं थोडेंसें अलौकिक असें देऊळ किंवा गुहा असली, कीं तिच्या मागें पांडवांचें नाहीं तर रामाचें नांव जोडण्याची आपल्या लोकांना संवय आहे. कारण सांगतां येईल का तुम्हांला ?

३. रायगडचा आणखी इतिहास शोधून काढून लिहा.

# गंगासागर

**परिचय** रायगडांत प्रवेश करून हे मैतर लोकल बोर्डानें बांधलेल्या धर्मशाळेंत मुक्काम ठोकतात. त्यानंतर 'गंगासागर तलावां'त स्नानें उरकून आणि दहींपोहे खाऊन मग हे सगळे 'मेणादरवाजा'नें वाड्याच्या अंतरंगांत शिरून सात माड्या, अंधारकोठड्या, खलबत-खाना, मनोरे हा भाग पहातात.

आमचे सगळ्यांचे चेहरे केविलवाणे झाले. तें पाहून मामा हंसले अन् म्हणाले, "अरे! तुम्ही तर सगळे अगदीं रडायला आलांत! छे, छे! रडून नाहीं भागायचें. हें सगळें ऐकून मोठेपणीं कांहीं करतां आलें तर करा. चला! दरवाजा पाहून झाला ना? आतां चलायचें."

आम्ही सगळे मामांच्या मागें निघालों. दरवाजांतून आंत शिरतांच दुतर्फा दोन देवळ्या होत्या, त्यांच्याकडे निरखून बघत आम्ही दोन्ही बाजूंच्या तटांमधून पुढें चाललों, तों समोर आपली उभी भिंत!

या भिंतीवरून का चढायचें? मग त्याकरितां शिड्या पाहिजेत. अन् शिड्यांवरून हत्ती कसे चढविले असतील? मीं मामांना विचारलें, "मामा, शिड्या कुठें आहेत?"

"कशाला?"

"वाः! शिड्या नसल्या, तर मग या भिंतीवरून चढून कसें जायचें? भुर्रदिशीं उडी मारून भिंतीवर चढायला आपण काय 'हंटरवाली'

आहोंत?"

इथें थोडेंसें सांगितलें पाहिजे. कांहीं दिवसांपूर्वी सोनगांवला एक फिरता सिनेमा आला होता. एकेक आणा तिकिट देऊन आम्ही सगळे गडी 'हंटरवाली'चा सिनेमा पाहण्याकरितां गेलों. ती हंटरवाली फार शूर होती. हातांतल्या हंटरनें ज्याला त्याला फटके मारीत ती तडातड् या माडीवरून त्या माडीवर उड्या मारायची! एकदां तर ती एका कड्याखालीं उभी होती. तिकडून आला शत्रु. तर ती "गुई ऽऽ" असा आवाज काढून एका उडींत कड्यावर जाऊन पोहोंचली!

चिमण्या म्हणाला, "हा हंटरवालीचा पार्ट मारुतीनें केला असला पाहिजे. त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणालाच अशा उड्या मारतां यायच्या नाहींत."

मी लगेच त्याचा निषेध करीत म्हणालों, "वा रे! अन् मग त्याचें शेपूट कुठें आहे?"

चिमण्याजवळ उत्तर तयार होतें. तो म्हणाला, "त्यानें आपलें शेपूट लहांन करून कमरेभोंवतीं गुंडाळून घेतलें असेल अन् मग वरून फ्रॉक नेसला असेल."

पण मारुती तर ब्रह्मचारी! तो स्त्रीपार्ट कसा करील? म्हणून मग बगड्यानें व मीं चिमण्याचें हें मत खोडून टाकलें.

मला त्या हंटरवालीचें कौतुक वाटलें. मीं तिच्यासारखा हंटर करून आबा आणि माई यांना मारलेंदेखील! तीं पोरटीं लागलीं आरडा करायला. मी त्यांच्या तोंडावर हात ठेवून म्हणालों,

"वा ऽ वा ऽऽ! हंटरवाली किती जोरानें लोकांना मारते. तरी लोक रडत नाहींत. तुम्ही रडतां कामा नये."

तेव्हां तीं पोरें गप्प बसलीं. पण हंटरवालीसारख्या उड्या मारणें कांहीं मला जमेना! खुर्चीवरून जमिनीवर उडी मला साधूं लागली. पण

जमिनीवरून खुर्चीवर कांहीं साधेना. मग एक पाट समोर ठेवून जमिनीवरून त्या पाटावरच उडी मारून पाहिली. दहा-पंधरा वेळां उड्या मारल्यावर शेवटीं तें जमलें.

मग मीं असें ठरविलें कीं, तें कांहीं नाहीं ! उड्या कशा मारायच्या तें येण्याकरितां हंटरवालीची शिकवणीच लाविली पाहिजे !

अस्तु ! तर मी हंटरवालीचें नांव काढल्याबरोबर मामा हंसून म्हणाले, "कांहीं नको हंटरवाली. आपण आतां डाव्या हाताकडे जाऊन परत वळायचें. ही समोर एक भिंत बांधून परत रस्ता डाव्या हाताला वळवण्यांत एक मजा आहे. ती एक युक्ति आहे. बाहेरून जर शत्रुसेना आली, तर ती प्रथम या भिंतीवर धडकावी. तिला सरळ गडावर येतां येऊं नये. तोंपर्यंत आपले बंदुकवाले लोक या भिंतीमागें उभे करून त्या शत्रूवर गोळीबार करावा. कळलें आतां ?"

आम्ही माना डोलवीत पुढें चाललों. थोडयाच वेळांत आम्ही गडाच्या ऐन माथ्यावर जाऊन पोहोंचलों ! ओ ऽ हो ! गडावर किती तरी इमारती दिसत होत्या ! "हें काय, तें काय ?" असे आमचे प्रश्न ऐकून मामा म्हणाले, "गडयांनो ! आतां अगोदर मुक्कामाच्या जागीं जाऊन पोहोंचूं. आपल्याला इथून उद्या सायंकाळीं निघायचें आहे. भरपूर वेळ आहे आपल्याजवळ. आपली व्यवस्था लावून घेऊं आपण अन् मग निघूं फिरायला."

ती रात्र रायगडावर काढायची, हें ऐकून तर आमचा आनंद गगनांत मावेना. तुरुतुरु मामांच्या मागें चालत, निर्गुडीच्या जाळ्यांमधून आम्ही एका कोरडया तलावाच्या बाजूनें लोकलबोर्डाच्या धर्मशाळेंत जाऊन थडकलों.

त्या कोरडया तलावाचें नांव 'हत्ती–तलाव' आहे, असें मामांनीं सांगितलें. तेव्हां मग तो कोरडा कां आहे, याचा तपास अम्हांला लागला.

हत्ती कांहीं थोडेंथोडकें पाणी पीत नाहींत. त्यांनीं या तलावांतलें सगळें पाणी पिऊन टाकलें असेल, अन् राहिलेलें सोंडांनीं ओढून उडवून दिलें असेल, असें अनुमान आम्हीं बांधलें.

शिरपतीचें म्हणणें असें पडलें कीं, तो तलाव फुटून आंतलें सगळें पाणी वाहून गेलें. पण यावर आमचा विश्वास मुळींच बसला नाहीं. फुटून वाहून जायला तलाव म्हणजे काय एखादी बालडी आहे कीं घागर? हा शिरपती नक्की कांहीं तरी थापेबाजी करीत असला पाहिजे !

धर्मशाळेजवळ पोहोंचतांच आमची उत्सुकता अधिकच वाढली. आतां तर आमच्या अगदीं समोर दोन मनोरे, एक दरवाजा, तट असें किती तरी दिसत होतें. त्या सगळ्यांच्या अलीकडे एक तळेंही होतें !

उन्हाळ्याचे दिवस. आम्ही डोंगर चढून घामाघूम झालेले. त्यांत डोळ्यांसमोर एक भलें थोरलें तळें !

असा कोणता सोनगांवकर आहे कीं, जो आतां न पोहतां स्वस्थ बसेल ? मी आमच्या मेळ्याचा पुढारी होतों म्हणून. नाहीं तर जर दुसरा कोणी पुढारी असता, तर मी त्याला बुट्टी देऊन तळ्यांत उडी ठोकून एव्हांपर्यंत पोहायला सुद्धां लागलों असतों !

एक मिनिटभर मला असें कांहीं वैराग्य आलें ! असें वाटलें, कीं ही पुढारीपणाची टोपी दुसऱ्या कोणाच्या तरी बोडक्यावर अडकवून धूम लंगोट घेऊन पळावें. पण एकदां पुढारीपण गेलें असतें, कीं त्याच्या नांवाखालीं वाटेल त्या थापा मारतां आल्या नसत्या. अन् थापा मारणें बंद झाल्यावर सगळेंच आटोपलें !

अरे ! पण हें मीं सगळें माझ्या अगदीं मनांतलेंच लिहून टाकलें कीं ! माझ्या मित्रांना अशी प्रार्थना आहे कीं, हें त्यांनीं वाचूं नये.

शिरपतीनें धर्मशाळा उघडली. आंत छानदार खोल्या होत्या. आम्ही धडाधड खोल्यांचीं दारें उघडून आंत शिरून जागेकरितां भांडूंदेखील लागलों.

मामा आणि गुरुजी हे दोघेजण शिरपतीकडून भांडीं, लांकडें वगैरे सामान काढून घेऊं लागले. नंतर त्यांनीं त्याला गडावर राहात असलेल्या धनगराकडे दूध अन् दहीं आणण्यासाठीं पाठविलें.

नंतर ' अल्युमिनम 'चीं दोन मोठालीं भांडीं बरोबर घेऊन मामा म्हणाले, " पोरांनो ! चला आतां स्नानाला ! "

उधळतच सगळेजण या पाळीला मात्र मामांच्या पुढें निघालों. एका मिनिटांत तलाव आला.

ओऽहो ! काय सुंदर पाणी ! जशी कांहीं भली मोठी कांचच आहे आमच्यापुढें ! एक बाजूला तट बांधलेला अन् तिन्ही बाजूंना खडक ! शिरपती म्हणाला कीं, सात बाजांचे सुंभ लावले तरी याच्या खोलीचा तपास लागला नाहीं. एवढें स्वच्छ अन् एवढें खोल पाणी असल्यावर आणखी काय पाहिजे ! भराभर चड्ड्या अन् सदरे फेंकले गेले; सगळेजण लंगोट कसून तयार झालों.

एका बाजूला एक मोटेचें थारोळें होतें. शिदू माळी, शिंदे, रतन अन् बगड्या हे चौघेजण त्या थारोळ्यावर जाऊन उभे राहिले, अन् शड्डू ठोकून त्यांनीं पाण्यांत उड्या फेकल्या. शिन्यानेंही तेंच केलें. मी मात्र एखाद्या सभ्य माणसासारखा हळूच पाण्यांत शिरून डुबुक डुबुक पोहूं लागलों. माझ्या पाठोपाठ आमचे बाकीचे मैतरही शिरले. एवढे मोठे आमचे मामा अन् चव्हाण गुरुजी, पण त्यांनीं सुद्धां दंड थोपटीत उड्या टाकल्या !

पाणी तर इतकें गोड अन् थंड म्हणून सांगूं ! जसें कांहीं अमृतच ! शिन्या म्हणाला, " अप्पा, आपण जन्मभर असेच पोहत राहणार ! "

शिंदे आणि रतननेंही आपल्या तशा प्रतिज्ञा जाहीर करून टाकल्या, म्हणजे आली का पीडा ! मला परत काळजी पडली. अहो, पुढाऱ्याला काळजी केलीच पाहिजे !

पण थोड्या वेळानें मामा बाहेर पडले, अन् त्यांनीं सगळ्यांना लवकर

चलण्याचा हुकूम फर्माविल्याबरोबर शिंदे, शिन्या आणि रतन बाहेर आले. चिमण्या म्हणाला, “ आतां शिन्याचें नांव बदलायला हवें. ”

“ कां रे ? ” शिदूनें विचारलें.

“ त्याचा एक जन्म संपून पुनर्जन्म झाला ! ”

तोंच शिरपती कांहीं धनगर बायांना बरोबर घेऊन परत आला. “ आंत उतरून अंगोली करायची आडर न्हाई, ” असा नियम सांगत लंगोटी लावून तोही हळूच पाण्यांत शिरला.

चव्हाण गुरुजी अन् मामा दोघेजण धनगरणींजवळचें दहीं-दूध खरेदी करण्यांत गुंतले, व आम्ही कपडे बदलून चहूंबाजूंची शोभा पहाण्यांत गुंतलों; तोंच मामा म्हणाले, “ गड्यांनो !. तुम्हांला आतां दहींपोहे दिले, तर तुम्ही दुपारीं दोन वाजेपर्यंत कळ काढाल काय ? आतां वाजले आहेत साडेआठ. आपण निघेतोंवर होतील नऊ. परत यायला वाजतील बारा. मग स्वयंपाक. चालेल का ? ”

आम्ही सगळे गड पाहण्याकरतां इतके उत्सुक झालों होतों कीं, पटकन् सगळ्यांनीं संमति देऊन टाकली. पाण्याचीं भांडीं करून आम्ही धर्मशाळेंत पोहोंचलों. चव्हाणांनीं पोहे काढून बगड्याच्या मदतीनें ते दह्यांत भिजविले. शिरपतीनें आणलेल्या पळसाच्या कोंवळ्या पानांवर आमच्यापुढें आलेले दहींपोहे आम्ही दह्याची स्तुति करीत चापले.

मग शिरपतीला स्वयंपाकाची तयारी करायला सांगून आम्ही सगळे हातांत काठ्या आणि पायांत वहाणा अशा थाटांत बाहेर पडलों. पुढें मामा, मध्यें आम्ही सगळे आणि मागें चव्हाण असा आमच्या स्वारीचा थाट होता !

परत आम्ही त्या मघांच्या तळ्याजवळ पोहोंचलों. मामा म्हणाले,

“ बरें का, याचें नांव गंगासागर ! पाणी किती थंड आणि गोड आहे, तें आपण मघाशीं पाहिलें. हा तलाव स्वतः महाराजांनीं पिण्याच्या पाण्याकरितां बांधविला. महाराज गडावर असतांना नेहमीं याचें पाणी प्यायचे.

बारा मास हें पाणी आटत नाहीं.

" अनेकांची कल्पना आहे कीं, या तळ्यांत खूप संपत्ति आहे. लोक लढायांत रायगड सोडून निघून जात, तेव्हां जवळचें सोनें या तलावांत टाकून देत. कदाचित् हें खरेंही असावें.

" म्हणून इंग्रजांनींही किल्ला घेतल्यावर मशीन लावून हें सगळें पाणी उपसावयाचा प्रयत्न केला. पण पाणी उपसलें गेलें नाहीं ! "

हें ऐकून आम्हांला फार आनंद झाला. इंग्रजांना आपलें सोनें न दिल्याबद्दल आम्ही त्या तलावाला खूप शाबासक्या दिल्या. चिमण्या तर म्हणाला, " जीते रहो पठ्ठे ! शाबास रे तलाव ! याला म्हणावें तलाव ! "

अशी त्या तलावाची स्तुति करीत आम्ही त्याच्या पूर्वेकडील बांधावरून दक्षिणेकडे निघालों. थोडेंसें चढून वर गेल्यावर आम्ही एका दरवाजाजवळ येऊन पोहोंचलों. त्याशेजारीं पाटी होती,

**' मेणा दरवाजा '**

आम्ही आश्चर्यानें अगदीं चकित झालों ! हा दरवाजा तर सरळ दगडाचा दिसतो, अन् हा म्हणे मेणाचा दरवाजा ! चिमण्यानें तर एक दगड घेऊन त्या दरवाजाला ठोकूनही पाहिलें. तों मामा म्हणाले,

" काय रे ठोकतोस चिमण्या ? "

चिमण्याच्या ऐवजीं मीं खुलासा केला, " मामा, हें मेण फार घट्ट म्हणजे अगदीं दगडासारखें घट्ट झालें आहे वाटतें ! "

खोखो हंसत मामा म्हणाले, " वेडे रे वेडे ! अरे मेणा म्हणजे पालखी. या दरवाजानें पालख्या वर वाड्यांत शिरत, म्हणून याचें नांव मेणा दरवाजा. "

आमच्या फजितीबद्दल लाजायचें कांहीं कारण नव्हतें. आम्ही सगळेच फसलों होतों. मुकाट्यानें न बोलतां आम्ही मामांच्या मागोमाग वर निघालों.

वर पोहोंचल्यावर आम्हांला डाव्या हाताला एक जागोजाग पडलेली उंच भिंत आणि उजव्या हाताला लांबच्या लांब वाडयांची रांग लागली. रांगेंत एकूण सात वाडे होते.

आम्ही पहिल्या वाड्यांत शिरलों. समोर एक मोठें घराचें जोतें होतें. माझी इतिहाससंशोधकी जागी होऊन मी प्रत्येक भागाचें निरीक्षण करूं लागलों.

तोंच चिमण्या मागच्या बाजूनें धांवत येऊन मला बोलवीत हात धरून ओढूं लागला. मी त्याच्यावर या पोरकटपणाबद्दल रागावत त्याच्याबरोबर गेलों. तो मला एका तटांत असलेल्या खोलींत घेऊन गेला, अन् एका वस्तू-कडे बोट दाखवून मला म्हणाला, " तें बघ ! "

ओ हो ! शाबास रे चिमण्या ! बरीक पोरगा मोठा चलाख आहे बरें का ! अहो, तो चक्क एक शौचकूप होता ! अगदीं पायठण्या, पाणी जाण्या-करतां नाली, मळ जाण्याकरतां छिद्र, हें सगळें एका दगडांत घडवून तिथें बसविलें होतें !

आम्ही दोघे उधळत बाहेर आलों, व सगळ्यांना ओरडून तो आपला शोध जाहीर करूं लागलों. बगड्या, शिंदे, रतन, दत्तू.... सगळे धांवत जाऊन तो शौचकूप पाहून आले. तो शौचकूपच असल्याबद्दल सगळ्यांचें एकमत झालें. हा एवढा मोठा शोध लावल्याबद्दल मी स्वतःला धन्य मानूं लागलों.

पण मामांनीं ती माझी धन्यता अगदीं विरघळून टाकली ! ते आम्हांला एकत्र बोलावून म्हणाले,

" बरें का रे अप्पा, हा इथून रागीवसा सुरू झाला. हे एका ओळीनें अगदीं सारखे सात महाल बांधले होते, त्यांचा हा अवशिष्ट राहिलेला भाग. सगळे महाल सारखे. मध्यें वाडा, मागें स्नानाची जागा, त्याच्यामागें अगदीं तटांत शौचकूप, पुढें माडी, अन् बाजूला बागेकरितां मोकळें पटांगण,

समोर तुळशीवृंदावन.

" तुम्ही कोणत्याही वाड्यांत बघा. हें सगळें सांपडेल तुम्हांला. शिवाजी महाराजांनीं आपल्या राण्यांकरितां हा भाग बांधला. एकीला कमी अन् एकीला जास्ती असें असलें, कीं उगीचच भांडणें व्हावयाचीं. म्हणूनच सगळ्यांना सारखे. महाराज मोठे चतुर. भांडणाचें कामच उरूं दिलें नाहीं त्यांनीं. चला, दुसरा वाडा पाहूं आतां."

खरेंच कीं ! याही वाड्यांत अगदीं तसेंच सगळें होतें ! एकूण शौच-कूपाचा शोध माझा नव्हे, तर...जाऊं द्या झालें. आपल्या राण्यांत भांडण न होऊं देण्याच्या महाराजांच्या त्या युक्तीची प्रशंसा करीत आम्ही एकामागून एक सातही वाडे पाहून टाकले. सगळीकडे तीच तऱ्हा.

त्रिमण्या म्हणाला, " शौचकूपाची कल्पना इंग्रजांची नव्हे तर !"

चव्हाण म्हणाले, "एवढी साधी कल्पना करायला इंग्रज कशाला पाहिजे ? तिकडे सिंध प्रांतांत बघा ! 'मोहोन्–जो–दोडो' नांवाचें पांच हजार वर्षांपूर्वीचें शहर उकरून काढलें, त्यांत सांडपाण्याची व्यवस्था आजच्या गांवांना लाजवील अशी आहे ! पण आम्हांला मुळीं संवयच झालेली ! कांहींही चांगलें दिसलें, कीं तें साहेबानें केलें !"

सातव्या वाड्यांतून बाहेर पडलों, अन् तसेच दक्षिणेकडे चाललों, तर एक दगडी उतार लागला, अन् पुढें मोकळी जागा. मामांनीं सांगितलें कीं, या मोकळ्या मैदानावर राण्या हवा खाण्याकरितां येत. म्हणून मग आम्हीही तेथली हवा खाल्ली. मी दत्तूला म्हणालों,

" दत्तू, जरा चावून खा हो हवा ! नाहींतर अपचन व्हावयाचें."

मग आम्ही आल्या रस्त्यानें परत फिरून उजव्या हातच्या एका खिंडारांतून वर शिरलों. सगळीकडे खिंडारांपलीकडे कांहींही नव्हतें. जिकडे बघावें तिकडे वाऱ्याचे अन् पाण्याचे तडाखे खात उभ्या असलेल्या पडक्या भिंती !

मामांनीं आम्हांला एका चौथऱ्याजवळ नेलें. अन् म्हणाले, " ही पहा अंधारकोठडी ! "

ओ हो ! अंधारकोठडी ! आम्हीं किती तरी ऐतिहासिक कादंबऱ्यांतून अंधारकोठड्यांविषयीं वाचलें होतें. त्यांच्या काळ्याकुट्ट भिंती, तिथला अंधार, एका मडक्यांत कैद्याला देण्यांत येणारें पाणी हें सगळें वाचून आम्हांला अंधारकोठडीविषयीं फारच कुतूहल होतें. ती अंधारकोठडी आतां आमच्यासमोर होती !

आम्ही एकमेकांना बाजूला ढकलीत आंत वांकून पाहूं लागलों. अंदाजें चाळीस फूट खोल अन् दहादहा फूट लांबीरुंदीची ती एक विहीरच होती म्हणाना !

मामा म्हणाले, " सांभाळा बरें का ! नाहीं तर एखादा गडी कमी व्हावयाचा. ही एकच नव्हे, हिच्या शेजारीं आणखी दोन आहेत.

" महाराज स्वराज्याकरतां रात्रंदिवस झटत असतां कांहीं घुबडांना तें पाहावयाचें नाहीं. त्यांनीं नीचपणाची कमाल करून महाराजांच्याच जिवावर उठावें, कांहींनीं महाराजांच्या स्वराज्यांत दरोडे घालावेत, लोकांची बायका-पोरें पळवावींत, कुणाचे खून पाडावेत.

" मग त्या राक्षसांच्याकरतां महाराजांनीं हे महाल बांधले. त्यांनीं जन्मभर इथें रहावयाचें. इथून पळून जायची सोय नाहीं अन् शेवटीं आपलीं पापें आठवीत टांचा घांशीत इथेंच मरावें. मेल्यावर मग त्यांना बाहेर काढा-वयाचें. अनेक नरपशूंना त्यांच्या पापांचें प्रायश्चित्त इथें मिळालें आहे. किती तरी दुष्टांचे मृत्यु या अंधारकोठड्यांत झाले आहेत. "

मग मात्र थोडेसें भिऊन आम्ही परत एकदां आंत डोकावून पाहिलें आणि पुढें निघालों. परत आम्ही उत्तरेकडे चाललों. आणखी कांहीं पडक्या भिंती ओलांडून एका जिन्याजवळ पोहोंचलों. त्या जिन्यानें खालीं उतरल्या-बरोबर आम्ही मनोऱ्यांत जाऊन दाखल झालों !

द्वादशकोनी, दुमजली, तळापासून उंची चाळीस फूट अशा त्या मनोऱ्याच्या दुसऱ्या मजल्यावर जाऊन आम्ही उभे राहिलों. एकूण बारा खिडक्या असल्यामुळें भांडण व्हावयाचें कांहीं कारण नव्हतें. एकेक खिडकी एकेकानें वांटून घेतली.

मामा म्हणाले, "पहा गड्यांनो ! तो गंगासागर पहा. पलीकडे गडाखालीं दिसणारें तें तळकोंकण पाहा.

"या मनोऱ्याचे पूर्वीं पांच मजले होते, पण इंग्रजांनीं कृपा केली अन् तोफांच्या भडिमारानें वरचे तीन मजले पाडून टाकले ! आम्हांला पूर्वींच्या वैभवाची आठवण होईल, असें कांहीं उरूं द्यावयाचें नाहीं, हीच त्यांची प्रतिज्ञा. कल्पना करा, कीं या मनोऱ्याला पाच मजले आहेत, आणि शेवटच्या मजल्याच्या खिडकींत शिवछत्रपति उभे राहून आपल्या स्वराज्याकडे निरखून पाहात आहेत !

"मनांत आपल्या लोकांच्या चिंतेशिवाय दुसऱ्या कशाला म्हणून जागा नाहीं. आपलीं माणसें या आपल्या देशांत सन्मानानें जगतील कशीं, या काळजीनें त्या राजाला रात्रीं झोंप येत नाहीं.

"आतां कुतुबमिनारावर उभा असलेला औरंगजेब, आणि या मनोऱ्यावर उभे असलेले शिवछत्रपति, या दोघांची तुलना करा ! आतां नको, पुढें केव्हांतरी. चला उतरा खालीं."

पांचव्या मजल्यावर उभे असलेल्या महाराजांचें चित्र डोळ्यांसमोर आणून त्याच्या धुंदींत आम्ही खालीं उतरलों. दुसरा मनोरा पाहून परत जिन्यानें वर चढून आम्ही आणखी कांहीं खिंडारें तुडवीत एका ठिकाणीं येऊन पोहोंचलों.

"या माझ्यामागें. सावकाश, धडपडाल नाहीं तर" मामा म्हणाले. आणि एका जिन्यानें ते खालीं उतरूं लागले. खालीं काळाकुट्ट अंधार होता. आम्ही चांचपडत आणि थोडेंसें भीत त्यांच्याबरोबर खालीं

उतरलों. अंदाजें पंधरा पायऱ्या उतरल्यावर आम्ही समतल जमिनीवर जाऊन पोहोंचलों.

मामांनीं आपल्या हातांतील टॉर्च पेटवला, अन् म्हणाले, " हें छत्रपतींचें तळघर, म्हणजे खलबतखाना ! "

तर मग शेवटीं आम्ही शिवछत्रपतींच्या त्या आवडत्या खलबतखान्यांत येऊन पोहोंचलों होतों ! ज्या ठिकाणीं स्वराज्याच्या वाढीचे अनेक बेत शिजले असतील, जेथें शिवछत्रपति अनेकदां एकटे येऊन विचार करीत बसले असतील,ज्या ठिकाणीं समर्थ रामदासस्वामींनीं अनेकदां समाधी लावली असेल तें हें भुयार ! अंदाजें बारा फूट रुंदी आणि वीस फूट लांबी या आकाराचें.

या भुयारांत महाराजांमागें अदबीनें अनेकदां तानाजी, नेताजी शिरले असतील ! मोरोपंत पिंगळ्यांशीं महाराजांनीं अनेक वेळां इथेंच खलबतें केलीं असतील. बाळाजी आवजीनें इथें महाराजांजवळ बसून समईच्या उजेडांत महाराजांनीं सांगितलेलीं पत्रें लिहिलीं असतील.

तो हा खलबतखाना. हें तें भुयार. हेंच तें इतिहासप्रसिद्ध ठिकाण. आतां इथें खालीं पाऊलपाऊल चिखल सांचून वाळला आहे. आतां इथें वटवाघुळें कुचकुच करीत आहेत. आतां इथें त्यांच्या लेंडयांचा खच पडला आहे. आतां इथें कुबट घाण येत आहे, आतां इथें पाऊल घालायची भीति वाटत आहे.

आम्ही एक शब्दही न बोलतां परत फिरलों. त्या उदास आठवणींनीं आमचें पोरपणही कोमेजून गेलें !

## अभ्यास

१. तुम्ही सिनेमा पाहिला आहे का ? स्टंट सिनेमांतल्या उड्या पाहून हंटर-वालीची शिकवणी लावायची अप्पाची कल्पना कशी काय वाटली ?
२. अप्पाच्या इतिहाससंशोधकीसारखी संशोधकी करून तुम्ही तुमच्या गांवांतील एखाद्या जुन्या ठिकाणाचा इतिहास सांगा बघूं !

# राजांचें सिंहासन

परिचय दुपारीं पिठलेंभाताचें जेवण उरकून हे मैतर महाराजांचा वाडा, दरबार, नगारखाना, तिथून अंधुक दिसणारा समुद्र व होळीचा माळ एवढें पाहून सायंकाळीं परत येतात.

पण तें कोमेजलेपण फार वेळ टिकलें नाही, म्हणजे मामांनीं टिकूं दिलें नाहीं. ते आमच्याकडे पाहून म्हणाले,

"हें रे काय पोरांनो ! परत केलींत का तुम्ही चौकोनी तोंडें ! हें नाहीं बुवा उपयोगाचें ! अरे रायगड पाहिला, अन् नुसतेच चौकोनी चेहरे घेऊन परत फिरलें, तर मग कसला पाहिला रायगड ? वाईट वाटावें खरें, पण त्या वाईटांतून परत चांगलें निर्माण करण्याची इच्छा व्हावी, तर तें वाईट वाटल्याचें सार्थक !

"अप्पा ! ए अप्पा ! अहो अप्पाजीराव ! अहो सरदार अप्पाजीराव, ॲ हॅ, ॲ हॅ ! अहो !"

मग मात्र मी खुदकन् हंसून थोडीशी गंमत करावी म्हणून म्हणालों,

"यस् सर !"

"अरे ! सरदारांना विंग्रजीहि येतें बरें का !"

मामा म्हणाले. अन् मग सगळेच हंसून पूर्वींसारखे झालों.

साडेअकरा वाजून गेले असल्यानें मग आम्ही परत फिरलों. स्वयंपाकाची तयारी शिरपतीनें करून ठेवली होती. आल्याबरोबर मी अन् शिंदेनें चुली

धडकाविल्या. शिंदे चुलींत आठदहा लांकडें कोंबूं लागला. मीं व्याख्यान देण्याची ती एक छानदार संधि पाहून काटकसर या विषयावर जवळजवळ अर्धा तास बोलत होतों. पण शिंद्या असा घण ! त्यानें तें सगळें ऐकून घेतल्यावर मग आणखी चारसहा लांकडें चुलींत ढोसलीं, अन् म्हणाला,

" अप्पा, तुला सरस्वती दान द्यायला आली, तर तूं तिच्याजवळ जुन्या भाषांतरपाठमालेचा पहिला भाग मागायचास ! अरे, चहूंकडे लागतील तितक्या लांकडांच्या राशी पडल्या आहेत, अन् इथें काटकसर कशाला ? "

मी त्याला काटकसरीचें महत्त्व आणखी समजाऊन देण्याच्या विचारांत होतों. पण मामा अन् बगड्या भाताचें भांडें घेऊन आल्यामुळें तें तसेंच राहिलें. पुढें कधीं तरी नीट मुद्दे काढून त्याला व्याख्यान ऐकवीन.

सगळेजण स्वयंपाकापाशीं लागूनही शेवटीं स्वयंपाक व्हायला एक वाजून गेलाच. कारण स्वयंपाक होणें आमच्या स्वाधीन नसून विस्तवाच्या स्वाधीन होतें. तोंपर्यंत सगळ्यांनीं मिळून पळसाच्या कोंवळ्या लुसलुसीत पानांच्या पत्रावळी लावल्या. मला पत्रावळ आजिबात लावतां येत नाहीं त्यामुळें रतनजवळ बसून त्याच्या पत्रावळी लावण्याची स्तुति करीत मी त्याच्याकडून पत्रावळ लावून घेतली.

जेवायला भात, कांद्याचें पिठलें आणि कैऱ्यांची चटणी, असा बेत होता. खरपूस भुका लागल्या असल्यानें सगळे भरपूर जेवलों. शिरपतीनें तर दोन पराती भात हबकाविला !

जेवणें झाल्यावर मग मामा अन् चव्हाण पानबीन खाऊन जरा आडवे झाले. आम्हीही पाहिलेल्या गोष्टींची चर्चा करीत बसलों. चिमण्या चित्रें छान काढतो. तो आपल्याबरोबर कागद, पेन्सिल, रबर हें साहित्य घेऊन आला होता. मी त्याला म्हणालों,

" चिमण्या, आपण आतां भुयार पाहिलें ना, त्याचें चित्र काढ. बाहेर पडक्या भिंती, भुयार अन् आंत शिवाजी महाराज आहेत. असें चित्र. "

थोडया वेळानें चिमण्यानें चित्र पुरें करून मला दाखवलें. मी चित्र पाहून त्याला म्हणालों,

" हें रे काय चिमण्या ! "

" काय ? "

" अरे, तूं शिवाजीमहाराज गुहेच्या तोंडाशीं काय दाखवलेस ? ते तर आंत आहेत. "

" ठीक आहे. "

चिमण्यानें पहिलें चित्र खोडून शिवाजीमहाराज आंत शिरले असून केवळ त्यांचें डोकें बाहेर आहे, असें चित्र काढलें, तेंही मला आवडलें नाहीं. मला शिवाजीराजे गुहेंत पाहिजे होते. मी म्हणालों,

" ऊं हूं ! अगदीं आंत आहेत शिवाजीराजे, असें दाखव. "

मग त्यानें अगोदर छत्रपतींचें चित्र काढून त्यावर भुयार अन् पडक्या भिंतींचें चित्र काढलें. भुयार आणि भिंती काळ्या रंगानें रंगविल्या असल्यानें शिवाजी महाराज दिसेनात. ते अगदीं सहजच होतें. कारण शिवाजीराजे गुहेंत होते. तें पाहून मात्र मी प्रसन्न झालों. लगेच तें चित्र घेऊन मी मामांकडे गेलों, अन् त्यांना म्हणालों,

" मामा, हें पहा भुयाराचें चित्र. शिवाजीमहाराज आंत आहेत. "

मामा, चित्र निरखून पहात म्हणाले,

" काय रे ? कुठें आहेत शिवाजी महाराज ? दिसत नाहींत ते ? "

आश्चर्य वाटून मी म्हणालों,

" वाः ! कसे दिसतील ? मघाशीं पहिल्या चित्रांत ते बाहेर होते. दुसऱ्या चित्रांत ते आंत जात होते. अन् हें तिसऱ्यांदा काढलेलें चित्र आहे. आतां ते नक्कीच आंत गेले आहेत. मी स्वतः त्यांना पाहिलें. आंत गेलेला माणूस बाहेरून कसा दिसेल ? "

मामा अन् चव्हाण दोघांत जो हंशा पिकला आहे म्हणून सांगूं !

या मोठ्या माणसांना कधीं कधीं किनई, आम्ही पोरांनीं समजावून सांगितलेलें कळतच नाहीं ! जाऊं द्या झालें !

साडेतीन वाजतां परत आम्ही बाहेर पडून सकाळच्याच वाटेनें त्या भुयाराच्या दक्षिणेकडे असलेल्या महाराजांच्या वाड्याकडे निघालों. वाडा म्हणजे वाड्याचा चौथरा. भला लांब रुंद. चौथऱ्याच्या भिंतींना लोखंडी कड्या अडकविल्या होत्या.

दत्तू फणसाळकर म्हणाला, " वाडा पडूं लागला, तर चहूंबाजूंना खुंट्या ठोकून या कड्यांना अन् त्या खुंट्यांना दोऱ्या बांधावयाच्या. म्हणजे मग वाडा पडावयाचा नाहीं. "

पण चव्हाणांनीं सांगितलें कीं, घोडीं बांधण्याकरितां त्या कड्या अडकविल्या आहेत.

" घोडीं पागेंत बांधावयाचीं कीं वाड्याबाहेर ? " बगड्यानें विचारलें.

" अरे, तांतडीनें कोणी घोड्यावर बसून आला, अन् त्याला वाड्यांतलें काम आटोपून लगेच परतायचें आहे. तो कशाला पागेंत घोडें बांधील ? तो या कडीलाच घोड्याचा आघाडीबंद अडकवायचा ! "

महाराजांच्या त्या वाड्याची पाहाणी करीत अन् अनुमानें बांधीत आम्हीं इकडेतिकडे हिंडूं लागलों.

चव्हाण म्हणाले, " बरें का अप्पा, शिवाजीमहाराज कसरतही करीत होते ! त्यांचा लोखंडी मल्लखांब आहे तिकडे हत्ती तलावाच्या पलीकडे. इथें कुठें तरी त्यांची व्यायामशाळाही असेल. "

" अन् महाराज टेनिस कुठें खेळत होते ? " दत्तूनें शेवटीं घाईघाईनें एका दमांत विचारून टाकलें.

हंसतां हंसतां आमची अगदीं पुरेवाट झाली. दत्तू असा कांहीं लाजला, कीं पुसूं नका. त्याच्या टेनिस अन् क्रिकेटप्रेमाची आम्ही सगळ्यांनीं ऐशी कांहीं हवेलंडी उडविली आहे ! त्यानें अगदीं मारुतिरायाची अन् विद्या-

देवीची शपथ खाऊन मजजवळ सांगितलें कीं, आपण आतां या जन्मीं क्रिकेट अन् टेनिसचें नांव घेणार नाहीं !

शिवाजीमहाराजांच्या टेनिसकोर्टाची चौकशी करणाऱ्या आम्हां विद्वान् इतिहाससंशोधकांचा तांडा त्या वाड्याच्या पडलेल्या विटांना आणि दगडांना इतिहास विचारीत चालला. एवढ्यांत मामा पूर्वेकडे वळले. पूर्वेकडील एक भिंत आम्ही ओलांडली, तों एका भल्या मोठ्या लंबचौकोनी इमारतीच्या पडक्या खिडारांत आम्ही जाऊन उभे राहिलों !

नाटकप्रिय चिमण्या ती इमारत पाहून एकदम ओरडला,

" नक्कीच हें थेटर असलें पाहिजे. "

त्याचें तें मत खोडून काढीत मी म्हणालों,

" ऊं हूं ! हें रायगडावरचें ' भाजी-मार्केट ' आहे. " मुंबईचें भायखळा भाजी-मार्केट मीं पाहिलें होतें.

शिंदे डोकें खाजवीत आणि त्या इमारतीच्या पश्चिमेच्या अंगाला असलेल्या एका चौथऱ्याकडे बोट दाखवीत म्हणाला, " अप्पा, नक्कीच हा कुस्त्यांचा भला मोठा आखाडा आहे. ती बघ पंच बसायची जागा. "

तोंच आमचें लक्ष त्या इमारतीच्या पूर्व बाजूच्या भल्या उंच भिंतीकडे अन् तिच्यांत असलेल्या भल्या उंच दरवाजाकडे गेलें. त्या दरवाजाच्यावर एक-दोन खोल्या दिसल्या आम्हांला.

ती उंच भिंत अन् तिच्या समोर असलेला चौथरा पाहून दत्तू कानांत बोट घालीत म्हणाला, " मिस्टर, कांहीं म्हणा तुम्ही ! पण नक्की सांगतों, या मोठ्या भिंतीला लावायचा पडदा. लोक सगळे या दारांतूनच आंत सोडायचे. त्या समोरच्या चौथऱ्यावर सिनेमावाला माणूस बसायचा. अन् तिथून त्यानें समोरच्या भिंतीवरच्या पडद्यावर सिनेमा दाखवायचा. नक्की ही सिनेमा पहायची जागा आहे ! लावतां बेट ? "

आम्ही कोणी कांहीं बेट लावायला तयार झालों नाहीं. पण एवढ्यांत चव्हाण गुरुजी अन् मामा मागें थबकले होते, ते आले. मामा म्हणाले,

" गड्यांनो, तुम्ही ज्या जागीं उभे अहांत, तें काय असेल ? "

आम्ही सगळ्यांनीं आपल्या कल्पना सांगितल्या. मामा हंसून म्हणाले,

" दुर्दैव तुमचें अन् माझें ! दुसरें काय ! अरे वेड्यांनो, तुम्ही छत्रपति शिवरायांना जिथें अभिषेक झाला, त्या दरबारांत उभे आहांत ! "

काय ? दरबार ! हद्द ! कांहींतरीच ! कांहींतरीच तरी कसें म्हणा ? मामा खोटें कशाला सांगतील ? पण हा दरबार ? हो ! अन् इथें ही पाटीही आहे !

आम्ही सगळे बावचळलेले पाहून मामा म्हणाले,

" गड्यांनो, असे बावचळूं नका. खरेंच इथें याच जागीं साडेतीनशें वर्षांपूर्वीं एके दिवशीं तो महाराष्ट्राचा राजा सिंहासनावर बसला ! "

अन् पश्चिमेकडे बोट दाखवून मामा म्हणाले, " शिवबाच्या शिलेदारांनो, त्या चौथऱ्यावर होतें तुमच्या त्या राजाचें सिंहासन ! करा ! मुजरे करा ! त्या पडक्या, वाऱ्यापावसाचे तडाखे खात अजूनही ताठरपणें उभ्या असलेल्या चौथऱ्याला मुजरे करा ! "

अत्यंत आदरानें आम्ही सगळे त्या सिंहासनाच्या चौथऱ्यासमोर जाऊन उभे राहिलों, अन् माना लववून आम्ही त्याला मुजरे केले !

अंदाजें पंचवीस फूट लांब, पंधरा फूट रुंद अन् चार फूट उंच असा खालचा चौथरा, त्याच्या दोन्ही बाजूंना दोन खोल्या, अन् त्याच्यावर मध्यभागीं चार फूट लांब, चार फूट रुंद अन् चार फूट उंच असा एक दुसरा दगडी चौथरा ! मामा बोलूं लागले,

" वर आकाशाचें छत ! वारा रोज हें सिंहासन झाडून काढतो ! चंद्र आणि सूर्य याचे मशालजी ! पाऊस साता समुद्रांचें पाणी आणून सतत चार महिने यावर अभिषेक करतो !

" शिवाजी महाराजांच्या पेशव्यांच्या हुजऱ्यांचीं सिंहासनें सोन्याचीं ! त्यांना हिरे जडविलेले ! त्यांच्या राखणाकरितां हातीं नागव्या तरवारी असलेले पहारेकरी ! त्या सिंहासनांपासून पन्नास पावलें दूर उभें राहून फारशी वर मान न करतां त्यांकडे पहायचें !

" अन् ज्या राजाच्या पुण्यप्रतापानें हे सगळे राजेमहाराजे आजपर्यंत जगले, अजूनही जगताहेत, ज्यानें दगडांचे देव बनविले, ज्यानें मातीच्या पुतळ्यांत जीव ओतला, त्या शिवछत्रपतीच्या सिंहासनाची ही दशा ! त्यावर कुणींही येऊन बसावें !

" कुण्याही गोऱ्या शेंवड्या साहेबानें बरोबर चार काळे लाळघोट्ये घेऊन यावे, अन् बुटांसुद्धां या चौथऱ्यावर नाचावें ! यावर चिरूट ओढावे !

" कुणाही उनाड पोरांनीं उगीच गंमत म्हणून हौशीनें रायगडावर यावें, अन् या चौथऱ्यावर बसून राधेच्या ओठांचीं डाळिंबें फोडीत, लकेऱ्या मारीत बरोबर आणलेला चिवडा अन् भजीं खावींत !

" कुणाही लंगोट्या गुराख्यानें आपलीं ढोरें वर आणून या बखळींत चरायला लावून द्यावींत, अन् आपण " चाल गो गोम्ये बंदराला " च्या आरोळ्या ठोकीत या चौथऱ्यावर हातपाय ताणून पडावें.

" कावळ्यांनीं कावकाव करीत यावर येऊन शीट टाकावी.

" कुत्र्यांनीं या चौथऱ्यावर विधि करावे.

" कोणी याचा राखणदार नाहीं. कोणी याचा पुजारी नाहीं.

" तरीही हा चौथरा ताठरपणें सगळें सोशीत मस्तवालपणें उभा आहे !

" कारण एके दिवशीं या आपल्या थोरल्या आईचा सगळ्यांत आवडता मुलगा, तिचा कंठमणी या चौथऱ्यावर सिंहासनाधिष्ठित झाला ! तो तेवढ्या मोलाचा हिरा या चौथऱ्यानें आपल्या अंगावर लावला. हा चौथरा तें अमोल लेणें लेऊन मिरवला ! पृथ्वीमोलाचा दागिना ज्यानें एकदां अंगावर घातला, त्याला आतां जगाची काय पर्वा !

" कुणीं त्यावर कांहींही केलें, तरी त्याचें मोल कमी का होतें ?

" वाल्मीकि ऋषि, त्याच्या अंगावर वारूळ वाढलें. त्याच्या केसांत पांखरांनीं घरटीं केलीं. रानांतलीं पोरें येऊन त्या वारुळाच्या भोकांत काड्या घालीत. पण रामनामाच्या धुंदींत मस्त असलेल्या वाल्मीकीजवळ या किरकोळ गोष्टींकडे लक्ष द्यायला वेळ कुठें होता ?

" तसेंच या चौथऱ्याचें. गड्यांनो ! परत एकदां याला मुजरा करा ! अन् आतां इकडे लक्ष द्या.

" या समोरच्या बाजूस एकदां त्या ' हेन्री ऑक्झेंडन 'नें—इंग्रजांच्या वकिलानें रुमालानें हात बांधून इंग्रजांकडून आणलेला नजराणा महाराजांच्या चरणीं अर्पण केला ! हीच ती जागा.

" इंग्रजांचा ताठा, घमेंड, पराक्रम, त्यांचीं गलबतें, आरमार, फौजा, बंदुका, तोफा, शिस्त, मग्रुरी या सर्वांचा तो हेन्री प्रतिनिधि होता ! या भिंतींना साक्ष ठेऊन त्यानें मराठमोळ्या, ओबडधोबड पण समुद्रासारखी खोल हिंमत असलेल्या मावळ्यांच्या राजापुढें मान वांकवली !

" इतिहासांत तुम्ही अर्काटचा वेढा, प्लासीची लढाई, कोरेगांवचें युद्ध या गोष्टी वाचल्या असतील. या सगळ्या ठिकाणीं आमचे भांडखोर, भोळे लोक इंग्रजांपुढे वांकलेले तुम्ही ऐकले असतील.

" पण हीही जागा पाहून ठेवा ! हें इतिहासांतलें अद्वितीय ठिकाण विसरूं नका !

" हा समोर दिसणारा सगळा दरबार. या दरबाराच्या भिंतींनीं सुपा-एवढालीं पागोटीं घालणारे, नांगराच्या फाळासारख्या मिशा असलेले, भिंतीसारखी छाती असणारे मर्द मराठे गादी अदबीनें त्यांच्या राजासमोर बसलेले पाहिले आहेत. निळें पाणी असलेल्या पोलादाच्या उत्कृष्ट तलवारी, पल्लेदार भाले, असलीं तुमच्या स्वप्नांतही न दिसणारीं शस्त्रें याच भिंतींनीं पाहिलीं आहेत.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.



" या भिंतींनीं बाळाजी आवजी लेखणी चालवितांना पाहिला आहे; भूषण कवि शिवाजी राजाचे प्रताप गात असलेला या भिंतींनीं ऐकला आहे. मोरोपंतांच्या सल्लामसलतीच्या वेळीं या भिंती अशाच उभ्या होत्या. गागाभट्टांचे वेदघोषही याच भिंतींच्या कानीं पडले आहेत.

" या सिंहासनाजवळ उभें राहून बोलावें, तर आवाज दरबारभर घुमत असे.

" पहा. जरा हा दरबार निरखून पहा."

आम्ही भिंतींच्या वेगवेगळ्या दगडांना कोणकोण टेकून बसला असेल याचा हिशेब करीत, दरबारभर हिंडलों. तों बगड्या पटकन् खालीं बसून ओरडून म्हणाला,

" मामा, हें पहा हो काय आहे? तांदूळ दिसताहेत बारकाले! पण हे जळलेले आहेत हो!"

मामांनीं खुलासा केला, कीं सिंहासनाच्या दुतर्फा असलेल्या खोल्यांतून पेशव्यांनीं तांदूळ भरून ठेवले होते, ते इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्यानें पेटले, अन् रानभर पसरले.

आम्ही हें ऐकतांच अधाशासारखे ते पेशवाईतले तांदूळ वेंचून घेतले.

मामा समोरच्या उंच इमारतीकडे निघत म्हणाले,

" या रे आतां नगारखाना बघायला."

आम्ही सगळे धांवत पळत अन् ' पळा पळा कोण पुढें पळे तो ' करीत नगारखान्याकडे धांवलों. बाहेर जाऊन पाहिलें, तों मोठा तीस-पसतीस फूट उंचीचा दरवाजा, अन् त्यावर वाघ-सिंहांचीं चित्रें काढलेलीं!

परत आंत आलों. त्या दरवाजाच्या दोन्ही बाजूंस दोन देवड्या होत्या. अन् एका बाजूच्या देवडीपलीकडून वर जायला रस्ता होता. एकमेकांना मागें लोटीत आम्ही वर चढूं लागलों. पुढें होता रतन. तो चार-पांच पायऱ्या वर चढून गेला, अन् मोठ्यानें ओरडून थांबला!

मग काय विचारतां? मागें फिरतां फिरतां आम्ही तर एकमेकांच्या अंगावर कोसळलों सुद्धां! भीतीनें अंगाचें अगदीं पाणी व्हायला आलें माझ्या! मला चिमण्यानें धरलेंन्, म्हणून बरें!

तोंच रतन आपल्या पायरीवर उभा राहून जोरजोरानें हंसायला लागला! काय वात्रट कारटा आहे! चांगलें बनवलेंन् कीं आम्हांला! रतनच्या मागें मी होतों. रतन हंसूं लागतांच मी सांवरलों, आणि कपाळाचा घाम पुशीत माझ्या भ्यालेल्या मित्रांना म्हणालों,

"अहा रे! म्हणे आम्ही शिवबाचे शिलेदार! एवढासा रतन ओरडला तो काय, अन् सगळे घाबरून परत पळूं काय लागलांत!"

चिमण्या तोंड वेंगाडीत म्हणाला, "माहीत आहे, माहीत आहे! अहो शूर वीर! आम्ही नुसतें भ्यालों तरी होतों, पण आपण तर बेशुद्ध पडायला आलां होतात!"

जाऊं द्या झालें! अपमान सांगावा मनाला!

आम्ही सगळे वर जाऊन पोहोंचलों. मामांनीं सांगितलें कीं, "या खोलींतच रात्रीं अन् दिवसां चौघडा झडत असे. त्या चौघडयाचा आवाज दिल्लीला औरंगजेबाच्या कानीं पडून तो दचकून उठायचा!"

पुनः दहा पायऱ्यांचा जिना होता, तो चढून आम्ही वरच्या खोलींत जाऊन पोहोंचलों. पण खोली तरी कशी म्हणावयाची तिला? कारण वरचें छप्पर उडून गेलें होतें.

रतन, शिदू, बगड्या ही मंडळी त्या खोलीच्या भिंतीवर चढली. म्हणून मग मलाहि माझें पुढारीपण टिकविण्याकरितां वर चढणें आलें. तिथें असा कांहीं भिरभिर वारा वाहात होता! माझ्याच्यानें कांहीं उभें रहावेना! म्हणून मग कांहीं निमित्त सांगून मी खालीं बसलों. तरी वारा मला खालीं लोटूं लागला. शेवटीं मी माझे दोन्ही हात छातीभोंवतीं आवळून मला घट्ट धरून ठेवलें. तेव्हां कुठें मी पडायचा वांचलों!

मामाही पाठोपाठ वर चढून आले. संध्याकाळ झाली असल्यानें पश्चिमेकडे सूर्य कलला होता, अन् अगदीं दूर एक चकचकीत रेषा दिसत होती. मामांनीं सांगितलें कीं, तो तीसपस्तीस मैल लांब असलेला समुद्र आहे.

सगळेजण कौतुकानें समुद्राकडे पाहूं लागले. मला त्या रेषेपलीकडे कांहीं दिसेना. पण चिमण्याला एक गलबत दिसलें. दत्याला दोन होड्या दिसल्या. शिनूही आपल्याला चार मचवे दिसत असल्याचें शपथेवर सांगूं लागला.

तेव्हां मग "एका लहान होडींत एक कोळी बसला असून तो आपल्याकडे पाहात गाणें म्हणत मासे मारीत असलेला मला दिसत आहे, अन् त्याचें गाणेंही चांगलें स्पष्ट ऐकूं येत आहे," अशी बातमी मलाही सांगावी लागली! सगळ्यांनींच थापेबाजी केली असल्यानें माझ्या त्या बातमीवर कोणी कांहीं बोलला नाहीं.

आम्ही रायगडावरच्या सगळ्यांत उंच भागीं, जमिनीपासून पन्नास फूट उंचीवर होतों. मामांनीं वेगवेगळ्या दिशांकडे बोटें दाखवून आम्हांला प्रतापगड, मकरंदगड, चांभारगड, राजगड, तोरणा, अशीं नांवें सांगितलीं खरीं, पण तुम्हांला अगदीं मनांतलें खरें सांगूं का?

माझ्या लक्षांत या नांवांपलीकडे कांहींच राहिलें नाहीं!

सूर्य मावळायला आला होता म्हणून आम्ही खालीं उतरलों. दरवाजानें बाहेर निघून आम्ही एका मोकळ्या जागेवर येऊन पोहोंचलों. मामा म्हणाले, "हा होळीचा माळ आहे."

मामांची चूक काढल्याबद्दल मला ऐसा आनंद झाला! मी हंसत हंसत म्हणालों,

"मामा, माळ हें नाम स्त्रीलिंगी आहे! अन् फुलांची माळ कीं होळ्यांची माळ? नाहीं तर पेपरमिंटांच्या गोळ्यांची असेल!"

पण माळ म्हणजे मैदान असा अर्थ सांगून मामांनीं माझ्या तोंडाला कुलूप घातलें. एका लहानशा देवळाजवळून आडवाटेनें कसरत करीत आम्ही मुक्कामावर परतलों.

## अभ्यास

१. तुम्हांला सरस्वती दान द्यावयाला आली, तर तुम्ही तिच्याजवळ काय मागाल ?

२. अप्पाला पाहिजे होतें तसलें चित्र तुम्हांला काढतां येईल काय ? नसेल तर कां ?

३. शिवबाच्या दरबारांत आणखी कोण कोण सरदार उपस्थित असतील ?

# शिवबांची समाधी

**परिचय** सूर्योदयापूर्वी उठून प्रभात–कृत्यें उरकल्यावर हे सगळे गडी टकमक टोंक, हिरकणी बुरूज, कुशावर्त बाजार या मार्गानें महाराजांच्या समाधीजवळ जाऊन पोहोंचतात. तिथें मामा त्यांच्यापुढें छत्रपतींच्या वेळचें चित्र उभें करून शिवबांचें गुणगान करतात. वातावरणानें भारलेलीं तीं पोरें त्या गुंगींत परत फिरतात. महाडमार्गे पुण्याहून सोनगांवीं परततात.

ती रात्र झोंपेच्या भरांत कशी गेली तें कांहीं आम्हांला कळलें नाहीं. आत्तां मधांशीं तर आम्ही सगळे एकमेकांत लाथाळी करीत झोंपलों होतों, अन् एवढ्यांत हें फटफटलें कसें ?

आतां झोंपायची सोय नव्हती, म्हणून उठलों. मामांनीं आम्हां सगळ्यांना तलावावर पिटाळलें. अर्ध्या तासांत सगळें उरकून आम्ही दूध प्यायला हजर झालों.

दूध पिणें आटोपलें, अन् सूर्य उगवण्यापूर्वींच आम्ही बाहेर पडलों. परत काल्च्या हत्तीतलावावरून उत्तरेला थोडें पुढें गेलों, तों आम्हांला एक पीर अन् त्याच्या शेजारीं एक लोखंडी खांब दिसला. चव्हाण म्हणाले, कीं तो शिवछत्रपतींचा मल्लखांब आहे. हें ऐकून शिदू, शिन्या, रतन, बगड्या या तांबडे लंगोटवाल्यांना त्यावर एकेक उडी मारायची स्फूर्ति झाली. सोनगांवीं गेल्यावर तिथें प्रौढी सांगण्याकरितां म्हणून मींही त्या खांबाला भेटून घेतलें.

पुढें कांहीं अंतरावर दोन-चार पडक्या बखळी दिसल्या मामा म्हणाले,
" हीं पहा दारूचीं कोठारें ! "

शाब्बास ! एकूण त्याही वेळीं लोक दारू पीत होते तर ! अन् केवळ रायगडकरांकरितां जर एवढीं कोठारें भरून दारू ठेवीत असतील, तर त्या वेळीं लोक दारूचा उपयोग खूपच करीत असले पाहिजेत ! रतनचा बाप दारू पीत असल्यामुळें रतनचा त्या काळचा लोकांविषयींचा आदर बराच वाढला.

" बहुधा ते लोक ' ब्रांडी ' पीत असावेत " भावी इतिहाससंशोधक श्री. मी यांनीं मत दिलें.

" छे ! त्या वेळीं ब्रांडी कुठली ? ते लोक केवडा पीत असावे. " शिंदे उद्गारला.

" अहो विद्वान ! केवडा नव्हे ! बेवडा." शिन्यानें दुरुस्ती केली.

पण मामांनीं असा खुलासा केला कीं, ही प्यायची दारू नसून उडवायची दारू. माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. उजाडून मी म्हणालों,

" असें, असें ! आतां समजलें. शिन्या, आपल्या गांवीं म्हमद्या दारूवाला नाहीं का सुईनळे, चंद्रज्योती, सूर्यज्योती हे करतो, त्या जातीची. "

पण मामांना हा माझा खुलासा न पटून ते म्हणाले, " अरे बाप्पा, मिरवणुकींत उडवायची दारू नव्हे ही. तोफा, बंदुका, गरनाळा, जेजाला यांतून शत्रूंवर मारा करण्याची दारू. "

आपलीं सगळीं संशोधनें चुकलीं, हें पाहून मी मुकाट्यानें आमच्या टोळीमागें चालूं लागलों. थोड्याच वेळांत आमची दिशा बदलून आम्ही वायव्येकडे चालून एका सुळक्यावर जाऊन पोहोंचलों. सुळक्याच्या ऐन तोंडाजवळ गेल्यावर चव्हाण मामांना म्हणाले,

" मामा, इथें थांबूं द्या पोरांना. मी एकेकाल्या कडा दाखवून आणतों. "

आम्ही सगळे उभे राहिलों. एकेकजण चव्हाण गुरुजींच्या बरोबर जाऊन